
मला भावलेला

# कॅनडा

## मनोहर
## (बी. बी. देसाई)



ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# मला भावलेला कॅनडा

प्रवासवर्णन

मनोहर (बी. बी. देसाई)

# मला भावलेला कॅनडा (प्रवासवर्णान)


## लेखक: मनोहर (बी. बी. देसाई)

६५१, 'संतोष' सुखसागर कॉलनी

गणेशपूर, बेळगाव (कर्नाटक)

ईमेल – bbdesai11@gmail.com

संपर्क क्रमांक - ९९४५७६३१२६



या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक:

ई साहित्य प्रतिष्ठान

ईलेवन्थ फ़्लोअर,
ईटर्निटी,
ईस्टर्न एक्स्प्रेस हायवे, ठाणे

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

(विनामूल्य पुस्तके मिळवण्यासाठी आपले नाव आणि गाव Whatsapp करा)

प्रकाशन : ५ मार्च २०२४

©esahity Pratishthan®2024

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

• हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

## लेखक परिचय



# मनोहर (बी. बी. देसाई)

जन्म - १ - ५ - १९५४

शिक्षण – एम. ए. बी. एड.

पत्ता – ६५१, ‘संतोष’ सुखसागर कॉलनी,
गणेशपूर, बेळगाव (कर्नाटक)

**लेखन** – पुनर्वसन (कादंबरी), मला भवलेला
कॅनडा (प्रवास वर्णन)

दैनिक सकाळ, बेळगाव वर्तातून विविध विषयावर लेखन


ज्वाला, जिव्हाळा, अमरदीप दिवाळी अंकातून कथा, कविता, लेख प्रसिध्द

**पुरस्कार** –

बेळगाव वाङ्:मय चर्चा मंडळाचा साहित्य पुरस्कार, जिव्हाळा साहित्य पुरस्कार,
मराठा संस्कृती संवर्धन संस्थेचा पुरस्कार, वर्धा येथील अग्रवाल पुस्तक
पुरस्कार (आयडियल २०१८), मळेकरणी साहित्य भुषण पुरस्कार

मनोहर (बी. बी. देसाई) यांचे ई साहित्यवरील पहिले पुस्तक.

कव्हरवर क्लिक करताच उघडेल.





माझ्या प्रवासात ज्यानी, ज्यानी योगदान दिले

माझ्या लेखन प्रपंचासाठी ज्यांनी सतत आग्रह धरला

ती माझी ...

पत्नी सौ. नंदादेवी, कन्या संतोषी, जावई अतुल,

पुत्र डॉ. संतोष, स्नुषा डॉ. पूजा

नि माझी बोलकी बाहूली नात (परी)

यांना

माझे हे प्रवास वर्णन

सविनय अर्पण !

# मनोगत

---

'मला भावलेला कॅनडा' हे मराठी साहित्य क्षेत्रातील माझे दुसरे पुस्तक! 'पुनर्वसन' या माझ्या पहिल्या कादंबरीचे मराठी साहित्य विश्वात चांगले स्वागत झाले. वाचकांचा भरभरून प्रतिसाद मिळाला. त्यातूनच प्रेरणा घेऊन मी हे दुसरे धाडस करीत आहे. कॅनडामध्ये मी जे पाहिले, दिसले, अनुभवले नि भावले त्याचे शब्दचित्रण करण्याचा माझा हा प्रयत्न आहे.

मी शिक्षकी पेशातून निवृत्त झाल्यानंतर वर्षभरातच मला उत्तर अमेरिका खंडातील कॅनडाच्या प्रवासाचा योग आला, म्हणण्यापेक्षा माझी अभियंता कन्या संतोषीने तो घडवून आनला. कॅनडा हा निसर्गाचे वरदान लाभलेला सुंदर नि वैविध्यतेने नटलेला देश! त्याच्या लोभसवाण्या रुपाची मला भुरळच पडली नि पुढे पाच वर्षात तीन वेळा कॅनडाच्या प्रवासाची संधी आली. त्याला घरगुती कारण असले तरी त्यात कॅनडाची ओढ महत्वाची होती. मी कांही पर्यटन स्थळाना भेटी दिल्या, तिथले सृष्टी सौंदर्य डोळेभरून पाहिले नि बऱ्याच गोष्टी पाहून भारावून गेलो.

मला तसा देशांतर्गत किंवा देशाबाहेरील प्रवासाचा विशेष अनुभव नव्हता. प्रवासाचा छंदही नव्हता, असता तरी परवडला नसता. भुगोलचा अभ्यास करताना नि भुगोल शिकविताना बाहेरच्या जगाचे पुस्तकी ज्ञान झाले होते इतकेच. त्या काळात विदेश दौऱ्याचा विचारसुध्दा कदाचित मुर्खपणाच ठरला असता. अभियांत्रिकी पदवी संपादन केल्यानंतर कन्या मुंबईच्या कोलगेट पाल्मोलिव्ह कंपनीत सॉफ्टवेअर अभियंता म्हणून सेवेत रुजू झाली. कंपनीच्या कामासाठी ती कधी ऑस्ट्रेलिया, कधी फ्रान्स तर कधी अमेरिकेला जात होती, विमानाने प्रवास करीत होती. त्याचे मला अभिमान नि कौतुकही वाटायचे! पुढे तिचे लग्न झाले नि नोकरीच्या निमित्ताने उभयता कॅनडात स्थाईक झाले. आज ते कॅनडाचे नागरिक आहेत.

कॅनडा हा उत्तर अमेरिका खंडातील उत्तरेला असलेला एक विस्तीर्ण देश! आकाराने मोठा असला तरी लोकसंखेच्या तुलनेत छोटाच! फारतर भारतातील एका

घटक राज्याएवढी या संपूर्ण देशाची लोकसंख्या. भौगोलिकदृष्ट्या कॅनडाचा बहूतेक भाग समशीतोष्ण व शीत कटिबंधात येतो. हिवाळयात कडाक्याची थंडी असते. उत्तरेकडचा भाग तर बर्फाने गोठतो. उन्हाळा इथे आल्हादकारक व उत्साहवर्धक ! त्यामुळे या काळात निसर्ग सौंदर्य अधिक खूलून दिसते. बहूतेक आंतरराष्ट्रीय पर्यटक याच काळात कॅनडाला भेट देतात. माझा तिन्ही वेळेचा प्रवास साधारणपणे मार्च ते जून दरम्यानच झाला. त्यामुळे बर्फाने गोठलेली धरती पहाता आली नाही. पण कडक थंडीचा अनुभव घेता आला. माझ्या पहिल्या प्रवासाचे तीन महिने मी हॅलिफॅक्स, सेंटजॉन शहर नि परिसरात घालविले. पुढील दोन वेळा अमेरिकेच्या उत्तर सीमेशेजारील व्हॅंकुव्हर नि डेल्टा शहरात मी राहिलो. हॅलिफॅक्स परिसरात हिवाळयात कडाक्याची थंडी व अधूनमधून बर्फही पडतो. व्हॅंकुव्हर परिसरात हिवाळयात कडाक्याची थंडी असली तरी बर्फाच्या बरसातीची किमया चुकूनच घडते. मात्र या शहरांशेजारील डोंगर माथ्यावर साठलेल्या बर्फाचे नयनमनोहारी दृश्य सर्वांचे मन वेधून घेते.

मी इथे जे पाहिले, अनुभवले ते कुठेतरी शब्दात व्यक्त करावे असे सारखे वाटे. त्यातच माझी कन्या संतोषी आणि जावई अतुल यांनी तर कॅनडाच्या प्रवासावर लेखन करण्याचा आग्रहच धरला. त्यातूनच हा लेखनाचा प्रपंच हाती घेतला आहे.

तिसऱ्या वेळी २५ फेब्रुवारी २०२० ला दोन महिन्यासाठी मी कॅनडात आलो. परंतू पहिल्याच आठवड्यात भारत, कॅनडासह संपूर्ण जगात कोरोनाव्हायरसने थैमान घातले. जगातील बहूतेक सर्व देशांनी कोरोनावर नियंत्रण आनण्यासाठी लॉकडाऊनचा निर्णय घेतला. त्यामुळे कुठे फिरता तर आले नाहीच, शिवाय एक प्रकारच्या दहशतीतच सर्वांना घरात कोंडून घ्यावे लागले. विमान सेवा बंद झाल्यामुळे आमचा मुक्काम दोन महिन्यावरून पुढे वाढतच गेला. त्यामुळे अंगणातील बागकाम, लेखन, वाचन नि दूरदर्शनचे कार्यक्रम पहाण्यात वेळ घालवावा लागला. त्यात एक गोष्ट चांगली घडली.... ती म्हणजे या प्रवास वर्णनाच्या लेखनाला मला वेळ देता आला.

लेखनी माझी असली तरी त्यामागे अनेकांचे हात आहेत. कळत न कळत लाभलेल्या अनेकांच्या सहकार्यातून एखाद्या कृतिचा जन्म होतो. माझ्या या प्रवासवर्णनाचेही तसेच झाले. माझी कन्या संतोषी, जावई अतूल यांच्या सहकार्याशिवाय माझा प्रवास घडलाच नसता. या लेखन प्रपंचामागेही त्यांचाच आग्रह आहे. जिला मी सतत माझी बोलकी बाहूली म्हणतो ती माझी नात (परी), माझा मुलगा डॉ. संतोष नि स्नुषा डॉ. पूजा व सतत माझ्या प्रत्येक कामात साथ देणारी माझी पत्नी सौ. नंदादेवी यांचा काहीतरी लिहित रहाण्याचा ससेमिरा या प्रवास वर्णनामागेही आहे. त्यातूनच साहित्य क्षेत्रातील प्रवास वर्णनरुपी माझे हे दुसरे आपत्य जन्माला आले.

कांही माणसं न कळत आपल्या जीवानात येऊन जातत... कधी मित्र बनून, तर कधी एका आगळ्या नात्यातून ! त्यांच्या आचार, विचारातून आपण नकळत कांही घेत असतो नि कळत, नकळत तेही आपणास कांही देऊन जातात. माझ्या गुरूस्थानी असलेले माजी आमदार गुरूवर्य परशुरामभाऊ नंदिहळ्ळी, विश्व भारत सेवा समितीचे अध्यक्ष विजय नंदिहळ्ळी, सतत लिहित रहाण्याचे प्रोत्साहन देणारे जेष्ठ लेखक कै. भिमराव गस्ती, डॉ. विनोद गायकवाड यांची प्रेरणा सतत माझ्या पाठीशी आहे. जिव्हाळा दिवाळी अंकाचे संपादक आर. के. ओऊळकर, ज्वाला व बेळगाव वार्ताचे सुहास हुद्दार, सार्वमतचे विलास बेळगावकर यांनी माझ्या प्रवास वर्णनातील कांही प्रकरणे आपल्या दिवाळी अंकात प्रसिध्द करून मला प्रोत्साहन दिले. 'मराठी सृष्टी' वेबसाईटवर क्रमश: लेख प्रसिध्द झाले. या सर्वांचे मोठे ऋण माझ्या जीवनात आहे. केवळ कृतज्ञता व्यक्त करून त्याची परतफेड करता येणार नाही.

घाई-गडबडीत हे प्रवासवर्णन पूर्ण करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे शुध्द लेखनाच्या चुका होण्याची शक्यता नाकारता येत नाही. वाचक मोठ्या मनाने त्या पोटात घालतील नि साहित्य क्षेत्रात माझ्या या प्रवास वर्णनाचे स्वागत होईल हीच अपेक्षा!

.... मनोहर (बी. बी. देसाई)

# मला भावलेला कॅनडा

... मनोहर (बी. बी. देसाई)

## अनुक्रमणिका


१. कॅनडा व्हाया लंडन ....0९

२. नायगारा..निसर्गाचा अद्भूत चमत्कार ...१८

३. मनं खुलविणारी माणसं ....२६

४. भुरळ घालणारा निसर्ग ...३५

५. संवर्धन भारतीय संस्कृतीचे ....४१

६. कॅनडातील हिंदू मंदिरे ... ५०

७. कॅनडातील भारत ... ५५

८. सीएन् टॉवर ...एक आधुनिक जगातील आश्चर्य ....६३

९. शतकाचा साक्षीदार .... ७०

१०. हॅलिफॅक्स बंदरावरील गमती-जमती...७७

११. मला भावलेले सेंटजॉन .... ८४

१२. थ्री सिस्टर्स........ ८९

१३. रिव्हर्सिंग फॉल्सची किमया ....९३

१४. फोर्ट होवे ....९६

१५. किंग्ज लँडींग .......१००

१६. भारतीय आजोबाची विदेशी नात...१०७

१७. पर्यटकांचे आकर्षण ... कॅपिलानो ब्रीज....११२

१८. धास्तीतला प्रवास ........१२०

# १. कॅनडा व्हाया लंडन




विदेशदौरा नि तोही विमानातून...! विचारच न केलेला बरा. सगळेच कल्पने पलिकडचे, स्वप्नवत वाटावे असेच!

शेजारच्या शहरात जायचे म्हटले तरी दहा वेळा विचार करावा लागायचा. खर्चाचा कधी ताळमेळ बसायचाच नाही. जग आज प्रगत झालंय, माणूस चंद्रावर जाऊन पोहोचलाय. मंगळ, शुक्राचा तो वेध घेतोय... तिथे विमानातून विदेशदौरा, ही तशी आज सामान्य गोष्टच! त्याचे आश्चर्य वाटण्याचे कारणही नव्हते. पण आम्हा सामान्य माणसांच्या दृष्टीने ही गोष्ट तशी मोठीच!

माझा एक जेष्ठ मित्र नेहमीच म्हणायचा,

‘मास्तर (मास+तर) ... मास म्हणजे महिना नि तर म्हणजे तरणारा किंवा जगणारा! महिन्याच्या पगारावर जगणारा तो मास्तर! त्याला जगताही येत नाही नि मरताही येत नाही.'

माझ्या त्या मास्तर मित्राचे बोलणे मी त्यावेळी हसण्यावारी नेले; परंतु मीही पुढे मास्तरच झालो नि त्याच्या बोलण्यातील तथ्य आता अनुभवास आले.

साधी गोष्ट सुध्दा सामान्य माणसाला कांही वेळा अवघड होते. अनेक वेळा मला त्याचा अनुभवही आला. माझ्या सौभाग्यवतींचा एखादी दुचाकी घेण्याचा नेहमीच आग्रह असायचा. परंतु प्रत्येक वेळी कांहीतरी सबब पुढे करून वेळ मारून नेत असे. एक दिवस ती सहजच म्हणाली,

‘अहो, ऐकलंत का? शेजारच्या बंड्यानं मोटरसायकल घेतलीय.... !

तिच्या बोलण्यातला रोख मी जाणून होतो. परंतु ऐकलं नसल्याचा बहाणा करून पेपर वाचण्यात मग्न असल्याचं नाटक केलं. त्यावर ती पुन्हा मोठ्यानं म्हणाली,

“असल्या गोष्टी नाहीच ऐकायला यायच्या....”

“मला कांही म्हणाली का?”

“मग बरंच झाल की! एखादा दिवस बसून जायला तरी मिळेल!”

तिच्या बोलण्याचा रोख लक्षात येऊनही कांही उमजलेच नसल्याचे भासवित मी म्हणालो. पण बायका मोठ्या बेरकी! पुरषांची ढोंगं लक्षात यायला त्यांना वेळ लागत नाही. तिचं बोलणं मी गांभिर्याने घेत नसल्याचे पाहून ती पुन्हा म्हणाली,

“अहो, तुमच्या लक्षात कसे येत नाही! मुलगी इंजिनिअर झाली; मुलगा डॉक्टर होतोय. एखादी स्कुटर तरी...?”

एका अर्थाने तिचेही बरोबर होते. शेजारी-पाजारी दिमाखात मोटारसायकलीवरून जातांना पाहून तिला तसे वाटणे स्वाभाविक होते. मास्तराला, तेही हायस्कूलमध्ये सेवा करणाऱ्या... आज दुचाकी घेणे तसे अवघड नाही. परंतु

मुलांचे शिक्षण नि शुन्यांतून संसार उभा करण्यातच अर्धे आयुष्य गेले. पोटाला चिमटा लाऊन जगत होतो. त्यात मोटारसायकलचा विचारही पेलणारा नव्हता. पण हे बोलून उपयोगाचे नव्हते, म्हणून वेळ मारून नेण्याच्या उद्देशानेच म्हणालो,

"अग, जरा धीर धर.... तुझी मुलंच तुला हवे ते घेऊन देतील."

शेजारीच बसलेल्या संतोषीने हे ऐकलं नि ती म्हणाली,

"मम्मी, जरा थांब. स्कुटरच काय तुला कार घेऊन देते."

तिचं बोलणं त्यावेळी हसण्यावारी नेलं; परंतु आज तिने ते खरं करून दाखविलंय. अभियांत्रिकी पदवीनंतर मुंबईच्या कोलगेट पाल्मोलिव्ह कंपनीत सॉफ्टवेअर इंजिनिअर म्हणून तिला नोकरी मिळाली नि आमच्या आशा पल्लवित झाल्या. पहिल्या दोन वर्षातच कारगाडी घेऊन तिने घरी पाठविली सुध्दा! आपला शब्द तिने खरा करून दाखविला. अभ्यासाबरोबरच नोकरीतही जिद्द बाळगून नि प्रामाणिक राहून तिने प्रगती साधली आहे. कॅनडातील एका कंपनीत चांगल्या पदावर ती आज काम करीत आहे. एक दिवस तिचा फोन आला,

"पप्पा, तुम्हा दोघांचही प्लेनच तिकीट बुक केलय, १८ मे रोजी तुम्हाला कॅनडाला निघायचय."

पोरवयात असतो; तर उड्या मारीत गावभर मित्रांना ही आनंदाची बातमी दिली असती. परंतु आता निवृत्तीच्या वयात तसं करणं शोभणारं नव्हतं. मन भरून आलं, डोळ्यात आनंदाश्रु तरळले. पोरीवर केलेले संस्कार कारणी लागल्याचे समाधान वाटले. लग्नापूर्वी तिने आम्हाला कारमधून फिरवलं, आपल्यालग्नानंतर ती आता विमानातून फिरविणार होती.

आकाशात पक्षाप्रमाणे घिरट्या मारणारे इवलेसे विमान मी पाहिले होते. पाखराचे पंख लावून उंचउंच उडावे नि आभाळाचा निळा पडदा फाडून दूरवर झेप घ्यावी, असे तेंव्हा सतत वाटे. पण विमानात बसायचे तर बाजुलाच; प्रत्यक्षात विमान पाहण्याचा योगही कधी आला नव्हता. संतोषी कंपनीतर्फे प्रथमच ऑस्ट्रेलियाला गेली, त्यावेळी मुंबईचं अंतरराष्ट्रीय विमानतळ, तेही बाहेरून पहायचा योग आला.

आपल्या लग्नानंतर ती कधी ऑस्ट्रेलियाला, कधी फ्रान्स, कधी अमेरिका तर कधी कॅनडा असा अधुनमधून विमान प्रवास करीत होती. मला या साऱ्या गोष्टींचे नवल वजा कौतुक वाटायचे. आज आम्हालाच प्रत्यक्ष विमान प्रवास करण्याचा योग आला होता.

***

कॅनडाला जायला अजून दोन महिन्याचा अवधी होता. विदेश दौऱ्यापेक्षाही विमान प्रवासाची मनात ओढ आणि तेवढेच औत्सुक्यही होते. ऑनलाईनवर पाठपुरावा करून या आधीच पासपोर्ट नि व्हीसाचा सोपस्कार संतोषीनेच पूर्ण करून घेतला होता. आता केवळ विमानात बसून आम्हाला आरामात कॅनडाला जायचे होते. आमच्या परिवारातच नव्हे, तर जवळच्या नातलगात संतोषीनंतर विदेशाचा प्रवास करणारे आम्हीच होतो. त्यामुळे कित्तेकानी भेटीगाठी घेऊन शुभेच्छा दिल्या. ज्यांना भेटता आले नाही, त्यांनी दूरध्वनीवरून अभिनंदन केले. सारे कसे आधीच हवेतून चालल्या सारखे वाटायचे.

१७ मे उजाडला तशी आमची घाई सुरू झाली. दुसऱ्या दिवशी सकाळी साडेसहाला मुंबईहून फ्लाईट! त्यासाठी किमान दोन तास आधीच विमानतळावर पोहोचणे आवश्यक होते. म्हणून दोन दिवस आधीच पुण्याला गेलो होतो. पाहूण्यांच्या गाठीभेटी, निरोप घेण्यात दोन दिवस निघून गेले नि १७ मे रोजी रात्री साडेआकरा वाजताच मुंबईला जायला निघालो.

विदेशाचा पहिलाच प्रवास आणि तोही विमानातून.... एक अनोखा आनंद वजा मनात धास्ती होती. विचारांच्या तंद्रीतच विमानतळ गाठले. सोबत कन्या व जावईबापू होतेच. त्यामुळे प्रवासाची भिती बाळगण्याचे कारण नव्हते .परंतु अशा नवख्या प्रवासाची आम्हाला धास्ती वाटणे स्वाभाविक होते.

विमानतळ भव्य...! नवख्या माणसाला गोंधळात टाकणारे! त्यात रात्रीची वेळ, तरीही प्रवाशांनी गजबलेले! सामान्य, गरीब प्रवाशापासून ते उच्च वर्गीय सुशिक्षित प्रवाशांनी गजबलेले बस, रेल्वे स्थानक आम्ही पाहिले होते. पण इथे

सर्वजण सुटाबुटातले.... क्वचित हिंदी... इंग्रजी बोलणारेच अधिक ! तेही डोकीवरून जाणारे!

लगेज कार्टमध्ये बॅगा टाकल्या नि आत प्रवेश करण्यासाठी रांगेत उभे राहीलो. आधीच ऑनलाईन तिकिट बुक केले होते. ई-तिकीट पाहून गेट किपरने आत जाऊ दिले. वाटले आता थेट विमानात जाऊन बसायचे! पण नाही, इथे सगळा वेगळाच प्रकार होता.

''बसमध्ये जाऊन बसायचे नि वाहकाकडून तिकिट घ्यायचे' इतकी सोपी गोष्ट इथे नव्हती. बोर्डींगपास, लगेजचे वजण, मग सोबतच्या केबीन बॅगची कस्टम अधिकाऱ्यांकडून तपासणी....! मेटल डिटेक्टरची तपासणी पार करून जाणं तर एक कसोटीच होती. हातातील घड्याळ, पेन, मोबाईल एवढेच नाही तर बूटही ट्रेमध्ये काढून ठेवले नि मेटल डिटेक्टरची चौकट पार करून मी सहीसलामत पलिकडे गेलो. परंतु सौभाग्यवती मेटल डिटेक्टर पार करून जातांना सुंईऽऽ आवाज झाला. त्याबरोबर तपास अधिकाऱ्यांनी त्यांना रोखलं! सौभाग्यवतींना ना इंग्रजीचा पत्ता, हिंदी तीही मोडकी-तोडकीच. त्याबरोबर त्या कांहीशा गोंधळल्याच; सोबत संतोषी होतीच, तिने आधीच या साऱ्या गोष्टींची कल्पना दिली होती. तिने आपल्या मम्मीला धीर दिला. एका महिला अधिकाऱ्यानी त्यांची कसून तपासणी केली, तेंव्हा त्यांच्या साडीला लावलेली पीन आढळून आली. ती काढून घेऊन तिला जाऊ दिलं. आम्हाला सगळच तसं नवलाईचं व मनाला धुगधुग लावणारं!

फ्लाईट सकाळी साडेसहा वाजताची, त्यामुळे आमच्याकडे अजून चार तासाचा अवधी होता. विमानतळाची इमारत भव्य, सुसज्य आणि आकर्षक! विद्युत रोषणाईने नटलेली दुकाने मनाला भुरळ घालीत होती. ते आगळं वेगळं दृश्य पहात फिरू लागलो. तेवढ्यात आर्ट गॅलरीने आमचे लक्ष वेधून घेतले.

कोणी अमेरिकेला जाणारे, कोणी इंग्लंड, कोणी कॅनडा, तर कोणी फ्रान्सला...! आम्ही जाणार होतो लंडनमार्गे कॅनडाला. नऊ तासाचा प्रवास नि लंडनहून पुढे हॅलिफॅक्सपर्यंत सहा तास...., मध्ये लंडनला दीड तासाचा ब्रेक! एअर इंडिया विमानाला लंडन विमानतळावर एअर कॅनडाच्या विमानाचे कनेक्शन होते.

आंतरराष्ट्रीय विमानतळावरील विविध रंगी, विविध ढंगी दृश्य मी प्रथमच पहात होतो. स्वच्छ, सुंदर, भव्य विमानतळ! मुंबईचे (भारतीय) विमानतळ असूनही विदेशी प्रवाशांचीच गर्दी अधिक! त्यांचे पोशाख, बोलण्याची स्टाईल, चालण्यातील ढब सगळेच कसे नवखे.

फ्लाईट उशीरा असलेले प्रवाशी विमानतळावरील दृश्य पहाण्यात, वस्तुची खरेदी करण्यात वेळ घालवित होते. आम्हीही असाच तासभर वेळ घालविला नि कांही वेळ वेटिंग रूममधील बाकांवर विश्रांती घेतली. पहाटे सहाच्या सुमारास एअर इंडिया विमानाचे बोर्डिंग सुरू झाले. टनेलसारख्या पॅसेजमधून आम्ही विमानात पहिले पाऊल टाकले. विमानाच्या प्रवेशव्दारावरच हवाई सुंदरीने आमचे सुहास्य स्वागत केले. त्याचा स्वीकार करून आम्ही आरक्षित जागी आसनस्थ झालो.

ऊंच आकाशातून घिरट्या मारीत जाणारं, कधीतरी स्वप्नात रूंजू घलणारं विमान! आज त्यात प्रत्यक्ष बसलो होतो. उंच भरारी घेऊन आकाशाला गवसणी घालणाऱ्या पक्षाप्रमाणे आता उंच झेप घेणार होतो. धरतीवर बरसात करणाऱ्या मेघांशी गुजगोष्टी करण्याची संधी मिळणार होती. विमानाच्या गतीपेक्षा शतपटीने मनाने गती घेतली नि कल्पनेच्या पुष्पक विमानातून ते उंच भरारी मारू लागले.

माझ्या मनाची अवस्था लहान मुलापेक्षा वेगळी नव्हती. मोठ्या कौतूकांने विमानात नजर भिरभिरत होती. आकाशात इवलेसे दिसणारे विमान प्रत्यक्षात किती भव्य, प्रवाशांनी भरगच्च भरलेले! विमानाच्या इंजीनचा सुंईऽऽ आवाज वगळता सारेच कसे शांत, नवलाईचे. एवढ्यात सीट समोरील टीव्ही स्क्रीनमधून आवाज ऐकू आला. प्रवाशांना हिंदी, इंग्रजीत आलटून-पालटून सूचना देण्यात येत होत्या. शेवटी विमान हालले, धावपट्टीवरून हळूहळू गती घेऊ लागले नि शेवटी त्याने आकाशात झेप घेतली.

खिडकीच्या बाजूला सौ. नि तिच्या शेजारी मी. विमानातून पृथ्वीवरील दृश्य पहाण्याची ओढ होतीच. मग नजर विमानात स्थिरावणार कशी? डोळे सारखे खिडकीबाहेर भिरभिरत होते. विमान उंचउंच झेपावत होते. खाली अथांग अरबी समुद्र नि वर अनंत आकाश! पहाटेच्या आंधुक प्रकाशात समुद्रातील लाटांचा

लपंडाव दिसला नाही. एक-दोन इवलीशी जहाजे संथ गतीने पाण्यावर तरंगताना दिसत होती. परंतु कांही मिनिटातच समुद्र दृष्टीआड झाला नि जमिनीवरील दृश्य नजरेच्या कक्षेत आले. घरे नकाशातील मोठ्या बिंदूप्रमाणे आणि रस्ते जाड रेषेप्रमाणे दिसत होते. मध्येच नागमोडी वळणे घेत जाणारी नदी एखाद्या सुंदर तरुणीच्या गळ्यातील मौल्यवान हाराप्रमाणे व सरोवर तिच्या कपाळावरील बिंदी प्रमाणे शोभून दिसत होते. कांही वेळाने विमान ढगापलिकडे गेले नि पृथ्वीवरील निसर्ग सौंदर्य त्याच्याआड लपले. सृष्टी सौंदर्यात रममान झालेले मन कांहीसे उदास झाले.

हजरो मैलाच्या गतीने विमान पुढे जात असल्याचे समोरच्या स्क्रीनवर दिसत होते; परंतु प्रत्यक्षात मात्र त्याची जाणीव होत नव्हती. एकाच जागी स्थीर असल्यासारखे वाटायचे. तिथे जमीनीवरील खाच-खळग्यांचे धक्के नव्हते, बसप्रमाणे प्रवाशांची रेटारेटी नव्हती. सर्वजण आपापल्या जाग्यावर शांतपणे बसून होते. कोणी समोरच्या टीव्ही स्क्रीनवर चित्रपट पहात होते, तर कोणी लघुपट पहाण्यात रमून गेले होते. विचारांच्या तंद्रीत मला केंव्हा झोप लागली, समजलेच नाही. विमानातील एअर होस्टेसने अल्पोपहारासाठी हाक मारली नि मला जाग आली. बाहेर काळोख दाटला होता. दूरवर आकाशातील तारे लुकलुकतांना दिसत होते. आसनासमोरील टीव्ही स्क्रीनवर पाहिले, विमानाने बरेच अंतर कापले होते. लंडनला पोहोचण्यास अजून चार तासाचा अवधी होता. मला पुन्हा पेंग आली.

लंडनच्या अंतरराष्ट्रीय विमानतळावर विमान उतरले त्यावेळी सकाळचे साडेनऊ (भारताच्या प्रमाण वेळेनुसार त्यावेळी रात्र होती) वाजले होते. आम्हाला पुढचे विमान पकडण्याची घाई होती. लंडनहून हॅलिफक्सला जाण्यासाठी एअर कॅनडाच्या विमानाचे कनेक्शन होते. परंतु झाले भलतेच. हॅलिफक्सचे विमान पकडण्यासाठी एका टर्मिनलवरून दुसऱ्या टर्मिनलवर जाईस्तोवर विमान निघून गेले. आमचे विमान लंडनला पोहोचण्यास कांहीसा उशीर झाला नि एअर कॅनडाच्या विमानाने वेळेत उड्डाण केले. त्यामुळेच सारा गोंधळ झाला. एअर कॅनडाच्या अधिकाऱ्यांना ही बाब निदर्शनास आणून दिल्यानंतर त्यांनी पर्यायी विमानातून

जाण्याची आमची व्यवस्था केली; परंतु त्यासाठी लंडन विमानतळावर चार तास प्रतीक्षा करावी लागली.

भारतीय प्रमाण वेळेपेक्षा इंग्लंडची प्रमाणवेळ सुमारे नऊ तास मागे होती. त्यामुळे लंडनला आलो तरी वेळेत फारसा फेरफार झाला नव्हता. मी गमतीने कन्येला म्हणालो,

''आमच्या जीवनातला एक दिवस वाढला तर...'

त्यावर ती तेवढ्याच मिस्कीलपणे म्हणाली,

''होऽ,पण परत जातांना एक दिवस कमी होणार ना....!'

लंडनचे अंतरराष्ट्रीय विमानतळ वैविध्यतेने गजबजलेले, विस्तीर्ण नि सुंदर! एका टर्मिनलवरून दुसऱ्या टर्मिनलवर जाण्यासाठी अंतर्गत रेल्वेची विशेष व्यवस्था. स्वच्छता तर वाखानण्यासारखी. विमानतळावरील चार तास बरेच कांही सांगून गेले. जगातील विविध महत्वाच्या शहरांना हवाईमार्गाने जोडणारे हे जंक्शनच जणू! जगातील विविध संस्कृती व भाषांचा इथे संगम झालेला. साऱ्यांची जगातल्या विविध शहरांना जाण्यासाठी एकच धावपळ सुरू होती. कोणी नोकरीच्या निमित्ताने, कोणी व्यापार, कोणी व्यवसाय तर कोणी प्रवासाच्या निमित्ताने येथे आलेला !

एके काळी जगावर स्वामित्व गाजविलेल्या इंग्लंड देशाची ही राजधानी, याच देशाने जगात औद्योगिक क्रांती घडवून आनली, याच देशाने विज्ञान क्षेत्रातही क्रांती केली, आमच्या देशावर दिडशे वर्षे राज्य केले. त्याच इंग्रजांच्या राजधानीत आज मी होतो. या देशाविषयी, इथल्या लोकांविषयी मनात कुतूहल वजा औत्सुक्य होते... त्यांना जाणून घेण्याचे, जगावर राज्य करण्यामागचे त्यांचे इंगित समजून घेण्याचे! परंतु इंग्लडचा प्रवास करण्याचा अजून तरी योग आला नव्हता; किमान त्यांच्या राजधानीत पाऊल ठेवण्याची संधी तरी मिळाली होती. व्हीसा नसल्याने विमानतळाबाहेर जाता येत नव्हते, याची मनात खंत होती. विमानतळावरूनच बाहेर नजर फिरवित त्यांच्या यशामागच गमक जाणून घेण्याचा प्रयत्न करीत होतो. इथली भूमी नि त्या भूमीत रहाणाऱ्या लोकांचे अवलोकन करीत होतो. त्याच नजरेतून गोऱ्या लोकांकडे पहात होतो. त्यांची बोलण्याची पध्दत, चालण्यातील ढब... परंतु

एवढ्यावर कांही उमजण्यासारखे नव्हते. स्वप्नात नसताना कॅनडाला जाण्याचा योग आला, असाच केंव्हातरी इंग्लंड फिरण्याचाही योग येईल, असे मनाचे सांत्वन केले. एवढ्यात–

“मिस्टर देसाई अँड फमिली मेंबर्स आर रिक्वेस्टेड टू कॉंटॅक्ट !'

एअर कॅनडाच्या काऊंटरवरून उद्घोषणा झाली.

चार तासानंतर टोरॅंटोला आणि तेथून पुढे हॅलिफक्सला जाण्याची एअर कॅनडाने व्यवस्था केली होती. आम्हाला कॅनडाला जाण्यास चार तास विलंब झाला. परंतु या वेळेत लंडन विमानतळावर बरंच कांही पहाता आलं, शिकता आलं. त्यामुळे विमान चुकल्याचा राग नाही, तर आनंदच वाटला.

विविध विचारांच्या तंद्रीत विमान प्रवासाचा अनोखा अनुभव घेत कॅनडातील हॅलिफक्सच्या भुमित येऊन पोहोचलो. पहिल्याच विमान प्रवासाच्या अविस्मरणीय आठवणी मनात घोळत कन्येच्या घरी आलो. नव्या जगताचा नवा प्रवास पुढे होताच.

# २. नायगारा ... निसर्गाचा एक अद्‌भुत चमत्कार !



'नायगारा' धबधबा भुगोलात वाचला होता, वर्गात शिकविला होता. तेंव्हापासून मनात हुरहूर होती .... निसर्गाची ही चमत्कृती पहायची! इच्छा असेल तर मार्ग सापडतो म्हणतात; पण ही म्हण झाली. प्रत्यक्षात इच्छित गोष्टी साध्य होतातच असे नाही. परिस्थितीच्या काटेरी सापळ्यात अडकलेल्यांना तर ते शक्यच नसतं. माझी परिस्थिती कांही यापेक्षा वेगळी नव्हती. साता समुद्रापार असलेल्या नायगाऱ्याला जायचा योग येईल हा विचारच स्वप्नवत होता. स्वप्न आणि वास्तव यात फार मोठे अंतर आहे. पण माझ्या कन्येने माझे हे स्वप्न वास्तवात आनले.

जेष्ठ कन्या –संतोषी सॉफ्टवेअर अभियंता म्हणून कॅनडाला गेली नि माझ्या इच्छेला बळकटी आली. माझ्या सेवानिवृत्तीनंतर तिने आम्हा उभय पती-पत्नीचे

कॅनडाचे तिकीट बुकही केले. वाटले 'नायगारा'ने घातलेली भुरळ आता पूर्ण होईल आणि नेमके तसेच घडले. तिचा कॅनडाला येण्या संदर्भात फोन आला नि मी तिला जणू अटच घातली...नायगारा दाखवायची !

हॅलिफॅक्सहून फ्लाईटने टोरेंटोला आलो. तेथून नायगाराला जाणाऱ्या यात्री बसचे आधीच आरक्षण केले होते. सुमारे १२१ किलोमीटर अंतरावरचे हे पर्यटन स्थळ गाठण्यासाठी साधारण दोन तास वेळ गृहीत धरला होता; पण माझे मन त्यापेक्षा अधिक वेगाने तिथे धाव घेत होते, कल्पनेच्या मनोराज्यात नायगाराचे चित्र रंगवत होते. त्यामुळे वाटेतील कोणत्याच गोष्टीत लक्ष लागत नव्हते. केंव्हा एकदा धबधब्याच्या या राजाला पहातो असे झाले होते. आपणाला हवी असलेली गोष्ट लगेच मिळाली, तर त्याचे महत्व वाटत नाही. नायगाऱ्याच्याबाबतीत तसे घडले नाही. कित्तेक वर्षानंतर ही संधी आली होती. आणखी कांही वेळ थांबण्यास काय हरकत आहे, अशी मनाची समजूत काढली. वाटेत आनखी कांही स्थळे पहात गेल्याने नायगाराला पोहोचण्यास अडीच तासाहून अधिक वेळ लागला.

बस चालकच गाईडचे काम करीत होता. कांही महत्वाच्या ठिकाणी गाडी आली की त्यांची इंग्रजीत माहिती देत होता. नोव्हास्कोशिया किंवा न्युब्रुन्सविक प्रांतात फिरतांना रस्त्याच्या दुतर्फा हिरवीगर्द जंगले पाहिली होती. शेती कुठे दिसते का? यासाठी नजर भिरभिरत होती. नायगाराला जाताना ही इच्छा पूर्ण झाली. टोरेंटो-नायगारा रस्त्याच्या दोन्ही बाजुला विस्तीर्ण सुपिक व सपाट जमीन नि त्यात हिरवीगार पीके दिसली. युएस (अमेरिके) च्या सीमेलगतचाच हा भाग. गहू, ओट, बार्ली, द्राक्षे, चेरी यासारखी पीके प्रामुख्याने येथे घेतली जातात.

वाटेतल्या हेलिकॉप्टर तळावर आमची बस कांही वेळ थांबली. हौशी प्रवाशाना येथे (अर्थात तिकिटाने) हेलिकॉप्टरमधून नायगाराचे दर्शन घडविले जाते. आमच्या पैकी कांहीनी आपली ही हौस पूर्ण करून घेतलीही. पुढे कांही अंतरावर 'वाईन टेस्टींग'चा एक अनोखा प्रकार आहे. हौशी यात्रेकरूना इथे वाईनची मोफत चव चाखावयास मिळते. अर्थात हा एक जाहीरातीचाच प्रकार असल्याचे लक्षात

येण्यास वेळ लागला नाही. विविध प्रकारच्या वाईनची माहिती व चव चाखवून ती विकत घेण्यास यात्रेकरूना प्रवृत करण्याचा यामागे उद्देश असावा.

वाईन टेस्टींगचा प्रकार पूर्ण होईस्तोवर आम्ही शेजारीच असलेल्या चेरीच्या बागेत मौज लुटली. आमच्या यात्री बसमध्ये दोन भारतीय जोडप्यांची भेट झाली... एक होते नागपूरचे मराठी नि दुसरे बंगळूरचे कानडी. विदेशात सुमारे दोन महिने राहून 'होमसिक' झालो होतो. या दोन्ही कुटूंबांची भेट होताच त्यांच्याशी बोलून मन हालके नि प्रसन्न झाले. भाषा भेदापलिकडे ही कुटूंबे आपली असल्याची मनात भावना निर्माण झाली.

आम्ही नायगारा-ऑन-दी-लेक या ओंटारिओ सरोवराच्या काठावरील शहरात येऊन पोहोचलो. इथे नायगारा नदी ओंटारिओ सरोवराला येऊन मिळते. एक ऐतिहासिक स्थळ म्हणूनही याची ख्याती आहे. नायगारा धबधब्याचे जणू हे प्रवेशद्वारच! नैसर्गिक सौंदर्याने नटलेली ही एक उद्यान नगरीच! इथली विविधरंगी टुलिफची फुलझाडे पाहून मन प्रसन्न झाले. प्रवासाचा कंटाळा कुठल्या कुठे निघून गेला. आकाशातील ताऱ्यांनाही लाजविणारी सुंदर फुले वाऱ्याच्या झुळूकीबरोबर झुलतांना पाहून मनही आनंदाने डोलू लागले. बाहेरचं निसर्ग सौंदर्य नि दुकांनांची आकर्षक सजावट पहातच रहावी अशी होती. आवडीच्या वस्तूंची खरेदी, अल्पोपहार व सुंदर निसर्ग सौंदर्याचा आनंद लुटण्यात एक तास केंव्हा निघून गेला समजलेच नाही.

धबधब्याच्या दर्शनाची ओढ नि हुरहूर होतीच. नदी काठावरील सुंदर पार्कच्या शीतल सावलीतून आमची गाडी पुढे निघाली. धबधब्याच्या आधी दर्शन घडले ते नायगारा नदीचे. एका वळणावर आमची गाडी आली नि समोर गेट बंद असलेले दिसले. गेटच्या पलिकडे अमेरिकेचा व अलिकडे कॅनडाचा ध्वज फडकत होता. दोन्ही देशांची ही सीमा असल्याचे लक्षात येण्यास वेळ लागला नाही. आमची गाडी वळण घेऊन धबधब्याच्या दिशेने पुढे निघाली. अमेरिकेत जायची ओढ होतीच पण व्हीसाचे बंधन होते. दूरून का असेना निदान अमेरिकेच्या भुमीचे दर्शन घडले, यातच समाधान मानून पुढे निघालो. नायगारा वीज प्रकल्पाच्या स्वागत

स्तंभाशेजारी आमची गाडी थांबली. वीज प्रकल्प पहायला मिळाला नाही, मात्र स्वागत स्तंभाची छायाचित्रे घेऊन आम्ही धबधब्याच्या दिशे पुढे निघालो.

***

कांही अंतरावर असतानाच धबधब्यांच्या या राजाची हाक ऐकू आली. कड्यावरून खाली उडी घेतांना मोठ्या आवाजात जणू तो साऱ्यांना बोलावित होता. आम्ही कान टवकारून ऐकू लागलो व डोळे एकवटून पाहू लागलो. दृष्टीपथात येताच पाण्याचे तीन प्रचंड प्रवाह तीन ठिकाणी खाली कोसळतांना दिसले. गाडीचा चालक वजा गाईड ध्वनीक्षेपकावरून म्हणाला,

‘‘नाऊ वुई रीचड टू दी वंडर ऑफ दी नेचर-दी नायगारा!'

त्याच्या म्हणण्याप्रमाणे निसर्गाची ही आश्चर्यकारक किमयाच होती. पार्किंगवर गाडी थांबली नि घाईघाईने ते स्वर्गीय सौंदर्य पहाण्यासाठी आम्ही जणू धावतच गेलो. समोरच अमेरिकेच्या हद्दितील दोन धबधबे कोसळत होते. उजव्या बाजूला कॅनडाच्या हद्दितील प्रचंड पाण्याचा झोत खाली उडी घेत होता. डाव्या बाजूला धनुष्याकृती पूल कॅनडा व अमेरिकेला जोडीत होता. तिन्ही धबधब्यांचे विलोभनिय दृश्य नजरेत मावत नव्हते. गाईडच्या मार्गदर्शनावरून आम्ही लिफ्टमधून कृत्रिम बोगद्यात गेलो व नदीपात्रातील होडीत बसलो. अमेरिकेचे दोन्ही धबधबे समोरच होते. उंच कड्यावरून नदी पात्रातील खडकावर ते कोसळत होते. आमची होडी तरंगत त्यांच्या अगदी जवळ गेली. धबधब्यातून उडणाऱ्या तुषारांचा अंगावर जणू वर्षावच झाला. पुढे होडीने वळण घेतले नि कॅनडाच्या हद्दितील ‘हॉर्स शू' धबधब्याच्या अगदीच जवळ नेले. धबधब्याने ‘हॉर्स शू’ नाव सार्थ बनविले होते. सुसाट उधळलेल्या घोड्याप्रमाणे पाण्याचा झोत प्रचंड वेगाने खाली कोसळत होता. घोड्याच्या टाचानी उधळलेल्या धूळीने आकाशाला गवसणी घालावी त्या प्रमाणे उधळलेल्या तुषारांची आमच्यावर मुसळधार वृष्टीच होऊ लागली. धबधब्याच्या व्यवस्थापनाने होडीत बसण्यापूर्वी दिलेल्या प्लॅस्टीक रेनकोटमुळे आम्ही भिजलो नाही. परंतु नजरेसमोर अचानक गडद धुके दाटल्या सारखे झाले. धुके जितके दाट,

तितकेच सुंदर; जितके निळसर, तितकेच निर्मळ. त्या धुक्यातून सूर्य दिवाळीतल्या आकाश दिव्यासारखा मोहक दिसत होता. परंतु धबधबा समोर असूनही ढगाआड लपल्यासारखा वाटला. त्यातूनही त्याचे न दिसणारे दृश्य कॅमऱ्यात टिपण्याची साऱ्यांची धडपड सुरू होती.

नदी पात्रातील त्या आगळ्या अनुभवानंतर आम्ही परत नदीकाठावर आलो. तेथूनच धबधब्याचे जगावेगळे सौंदर्य डोळे भरून पाहू लागलो. एव्हाना आकाश ढगाळले नि सूर्य नजरेआड झाला. स्वच्छ सूर्य प्रकाशात धबधब्याचे दृश्य रमणीय असते असे कुणीसे म्हणाले. त्यामुळे आम्हाला प्रतीक्षा होती ती स्वच्छ सूर्यप्रकाशाची! तोवर भोजन करण्याचे ठरवून नदी किनारीच असलेल्या हॉटेलमध्ये गेलो. हॉटेलच्या खीडकीतूनही धबधब्याचे दृश्य स्पष्ट दिसत होते. पोटाच्या भुकेपेक्षा नेत्रांची तृष्णा भागविण्याचाच आमचा प्रयत्न सुरू होता.

एव्हाना सायंकाळचे चार वाजून गेले. आकाश पुन्हा निरभ्र झाले. सूर्यपश्चिमेकडे झुकला होता. आम्ही नदीकाठावरून 'हॉर्सशू'च्या अगदी जवळ गेलो. सूर्यकिरण धबधब्याच्या प्रवाहावर थयथयत होते. आकाशात झेपावणाऱ्या तुषारावरून परावर्तीत होत होते. त्यामुळे जे दृश्य पहायला मिळाले, त्याचे वर्णन शब्दात करणे कठिणच! वर उडणाऱ्या तुषारातून सप्तरंगांच्या छटा उमटू लागल्या, जणू स्वर्गातली इंद्रधुनुष्ये त्या धुक्यात मिसळून एकरूप होऊन गेली होती. हे अपूर्व अद्भुत दृश्य पाहून मी मुग्ध झालो, तासभर पहातच राहीलो; परंतु ते विलोभनीय दृश्य डोळ्यात मावत नव्हते. ते अलौकिक सौंदर्य पाहून मन भरून आले.

'नायगारा'... एक नैसर्गिक चमत्कार! श्वास रोखूनच त्याच दृश्य न्याहाळावं लागतं. उन्हाळा असो वा हिवाळा ....इंद्रधनुष्याच्या सप्तरंगात त्याच्या दिसणाऱ्या विविध छटा कल्पने पलिकडच्याच होत्या. पाठ्यपुस्तकात जगातलं हे आश्चर्य वाचल होतं. आज प्रत्यक्ष पाहिलं नि अनुभवलही! जादुगार आपल्या पोतडीतून विविध चिजे बाहेर काढून प्रेक्षकांना थक्क करून सोडतो, त्याप्रमाणे; निसर्गरुपी गारूडीने आपल्या पोतडीतून बाहेर काढून सर्वांना थक्क करून सोडलेली ही अजब किमयाच होती; नव्हे आहेच! माणसाच्या बुध्दीपलिकडचाच हा चमत्कार!

जुलैच्या मध्यावर आम्ही नायगारा पहाण्यासाठी आलो होतो. कॅनडा, अमेरिकेत हा काळ उन्हाळयाचा. त्यामुळे हिवाळयातील गारठा किंवा पृथ्वीचे गोठलेले रूप पहाण्याचे भाग्य आम्हाला लाभले नाही. दुपारच्या ढगाळ वातावरणामुळे धबधब्याच्या सौंदर्याने मनाला तशी मोहीनी घातली नव्हती; परंतु चारच्या सुमारास सुर्याचे तेजस्वी किरण पाण्यावर पडू लागताच धबधब्याच्या सौंदर्याची जी उधळण झाली ती अवर्णनीय होती. नायगाराचा प्रचंड झोत उंचवट्यावरून खाली कोसळत होता. पात्रातील खडकावर आदळून निर्माण झालेले त्याचे असंख्य तुषार वरच्या प्रवाहापेक्षाही अधिक उंच झेप घेत होते. त्यांच्या मोहाने आतूर झालेले सूर्यकिरण अवेगाने त्या तुषारांचे चुंबन घेत आणि त्यातून रंगांची उधळण होई. प्रेक्षकांच्या डोळयाच पारणं फेडणारं हे दृश्य होतं. एखाद्या लावण्यवतीने आपला लांब केशसंभार खाली सोडावा नि तिच्या सौंदर्याने मोहीत झालेल्या सुर्यनारायणाने तिच्या केसात सप्तरंगी इंद्रधनुष्याची माळ माळावी असेच ते दृश्य! त्यामुळेच धबधब्याला 'रेनबोसिटी' म्हणून ओळखले जात असावे.

रात्रीच्या वेळी धबधब्याचे सौंदर्य यापेक्षाही आकर्षक असते असे कुणीसे म्हणाले. त्यामुळे आमच्या सोबत असलेले नागपूरचे जोडपे मुक्कामास राहीले. आम्ही टोरॅंटोहून संध्याकाळचेच फ्लाईटचे तिकिट बुक केल्याने थांबता येणार नव्हते. पण रात्रीच्या प्रकाश झोतात नायगाऱ्याला पहायची हुरहूर मात्र मनात कायम होती. रात्री घरी आल्यावर वेबसाईटवर, प्रकाश झोतातील धबधब्याचे चित्रिकरण शोधून काढले. दुधाची तहान ताकावर भागविण्याचाच हा प्रकार होता. पण जे पाहिले त्याने थक्क झालो. विविध रंगी प्रकाशझोत धबधब्याच्या पाण्यावर सोडल्याने सप्तरंगी इंद्रधनुष्यच खाली कोसळत असल्याचे दृश्य दिसत होते. व्हीडिओत असे तर प्रत्यक्षात..? मन कल्पना राज्यात गढून गेले.

*** मेड ऑफ दी मिस्ट - एक लोककथा**

भारतातील सर्वच प्रमुख नद्यांच्या मागे एखादी लोककथा (दंतकथा) दडलेली आहे. अशीच लोककथा नायगारा धबधब्याच्याबाबतीत असेल का याचा मी विचार करीत होतो. अमेरिका, कॅनडा ही प्रगत राष्ट्रे! विज्ञान क्षेत्रात त्यांची प्रगती

उल्लेखनिय! त्यामुळे अशा निराधार दंतकथांवर त्यांचा विश्वास नसावा, अशीच माझी भावना! त्यामुळे नदी किंवा धबधब्याबाबत अशी एखादी लोककथा प्रचलित असेल असे मला वाटले नाही. परंतु बोटीत बसून धबधब्याजवळ जाताना कुणीतरी 'मेड ऑफ दी मिस्ट' असा शब्दोच्चार केल्याचे मी ऐकले. ही 'मेड ऑफ दी मिस्ट' काय भानगड आहे हे जाणून घ्यायची ओढ लागली; अधिक चौकशीअंती ती एक लोककथा असल्याचे समजले.

लिलवल नावाच्या अमेरिकेच्या सुंदर युवतीने तारुण्यातच आपला पती गमविला. ती दु:खी झाली. एकामागून एक येणाऱ्या संक्रटांमुळे ती त्रस्त झाली. आपल्या जीवनाला अर्थ नसल्याची तिची भावना झाली. एक दिवस होडीत बसून दु:खी गीत गात ती प्रवाहाबरोबर जात होती, अचानक तिची होडी एका मोठ्या लाटेची शिकार बनली. लाटेबरोबर हेलकावे खात ती धबधब्याच्या दिशेने फेकली गेली. धबब्याच्या प्रवाहाबरोबर ती खाली कोसळणार; तोच मेघ गर्जनेची देवता (गॉड ऑफ थंडर) हिनमने तिला अलगद झेलले. तो तिला नदीच्या तळाशी असलेल्या आपल्या घरी घेऊन गेला.

हिनमदेव आणि त्यांच्या पुत्राने तिचे सांत्वन केले. त्यांच्या सहवासात ती आपलं दु:ख विसरली नि आनंदाने राहू लागली. दरम्यान देवपुत्रावर तिचे प्रेम बसले. त्या दोघांनी लग्नही केले. पुढे त्यांना एक गोंडस पुत्र झाला. त्यामुळे हिनमदेवाला अत्यानंद झाला. आपल्या नातवाला घेऊन देव पाण्याच्या प्रवाहाबरोबर सर्वत्र फिरू लागला. त्याला पाण्यातील व पाण्याबाहेरील चमत्कार दाखवू लागला.

एक दिवस एक विषारी सर्प नदीच्या पात्रात आला. नदीचे पाणी त्याने विषारी बनविले. त्यामुळे परिसरात रहाणारे लोक विषारी पाणी पीऊन आजारी पडले आणि कांही जण मरणही पावले. लोकांना ठार करून त्यावर सापाला आपली उपजिविका चालवायची होती. हिनमदेवाने ही वार्ता आपल्या सुनेला (लिलवलला) दिली. त्यामुळे ती पुन्हा दु:ख़ी झाली. लोकांना या संकटातून वाचविण्याचा ती विचार करू लागली. त्यांना धीर देण्यासाठी, या संकटातून त्यांची सुटका करण्यासाठी ती

पुन्हा नदीकाठावर जाण्याचा विचार करू लागली. तसा हिनमदेवाकडे तिने आग्रहच धरला.

एक दिवस हिनमदेवाने तिला पाण्याबाहेर नेले आणि तिच्या लोकांत नेऊन सोडले. तिने आपल्या लोकांची भेट घेतली व विषारी सर्पाची माहिती दिली. विषारी पाणी शुध्द होईपर्यंत दुसरीकडे रहाण्याचा तिने सल्ला दिला. लोक दुसरीकडे रहावयास गेले. हिनमदेवाने तिला परत आपल्या घरी नेले.

कांही दिवसानंतर तो विषारी सर्प परत गावात गेला. निर्मणुष्य झालेले गाव पाहून त्याला राग आला. क्रोधाने फुत्कारत लोकांच्या शोधार्थ तो नदीच्या काठावरून जात होता. हिनमदेवाने त्याचा आवाज ऐकला. धबधब्याच्या तुषारातून वर जाऊन कडकडाटासह त्याने सापावर वीजेचा मारा केला. त्यात सर्प गतप्राण झाला नि त्याचा मृतदेह वरच्या भागात अर्धवर्तुळाकार पडला. त्याबरोबर नदीच्या पात्रातील कांही पाणी अडवले जाऊन दुसऱ्या बाजूने वाहू लागले. एका उंचकड्यावरून ते खाली कोसळू लागले. यालाच हॉर्स शू धबधबा म्हणतात.

या प्रचंड प्रवाहात आपले घर व मुले वाहून जातील या भितीने देवाने आपल्या सुनेला व मुलाला आपल्याबरोबर येण्यासाठी हाका मारल्या. मुलगा आपली पत्नी व मुलासह देव आकाशात गेले व तेथेच राहू लागले.

धबधबा खाली कोसळताना जो मोठा आवाज करतो, तो आवाज म्हणजे हिनमदेव व त्याच्या कुटूंबाला परत येण्यासाठी धबधब्याने मारलेली हाक आहे, असे लोक मानतात.

### * 'नायगाऱ्या'चा भुगोल

सुपेरिअर, मिशीगन, ह्युरन, एरी या सरोवरांचा उपसा म्हणजेच नायगारा नदी. एरी सरोवरापासून ओंटेरिओ सरोवरापर्यंत ३५ मैल (५६ किलोमीटर) ही नदी उत्तरेला वाहत जाते. कॅनडा व अमेरिका देशांची सीमा नायगारा नदीच्या मध्यातूनच आहे. कॅनडातील ओंटेरिओ व अमेरिकेतील न्युयॉर्क राज्ये या नदीमुळे वेगळी झाली

आहेत. उत्तर अमेरिका खंडातील जलविद्युत निर्मितीचे ही नदी मुख्य स्त्रोत बनली आहे! नदी आपल्या प्रवाहाच्या अर्ध्या वाटेत आल्यानंतर उंच कड्यावरून खाली झेप घेते व नायगारा धबधबा तयार होतो. याच ठिकाणी नदीच्या दोन्ही काठावर नायगारा शहरे वसली आहेत.

कॅनडा व अमेरिकेच्या अंतरराष्ट्रीय सीमेवरील हॉर्स शू फॉल्स, अमेरिका फॉल्स, ब्रिडलव्हेल फॉल्स या तीन धबधब्याना एकत्रितपणे नायगारा धबधबा असे नाव आहे. हॉर्स शू फॉल्स कॅनडाच्या सीमेत आहे, अमेरिका फॉल्स पूर्णपणे अमेरिकेच्या हद्दीत असून तो गोट आयलॅंड बेटाने वेगळा झाला आहे. ब्रिडलव्हेल फॉल्स सुद्धा अमेरिकेच्याच भू-भागात आहे. लुना आयलॅंड बेटामुळे तो इतर धबधब्यापासून वेगळा झाला आहे.

# ३. मनं खुलविणारी माणसं!!

'नमस्कार...! कसे आहात...!'

हे आपुलकीचे शब्द माणसाचे सौजन्य आणि संस्कृती दाखवून देतात. त्यातूनच मित्रत्वाचे, स्नेहाचे नाते जडते. कॅनडाच्या भुमित पहिल्याच दिवशी मला असेच कांहीसे शब्द ऐकायला मिळाले नि मनातील त्यांच्या विषयीचे गैरसमज दूर झाले.

विदेशी नि त्यायातल्यात्यात पाश्चिमात्य संस्कृतीबद्दल माझ्या मनात गैरसमजाचं काहूर माजलं होतं. पारतंत्र्याच्या काळात भारतीयांवर गोऱ्या लोकांनी केलेल्या अन्याय, अत्याचारांमुळे त्यांच्या विषयी मनात घृणाच अधिक होती. परंतु सगळेच गोरे तसे नसतात याची अनुभूती कॅनडातील गोऱ्या लोकांच्याबाबतीत मला आली. अनेक चांगल्या, अनुकरणीय गोष्टी इथे पहायला मिळाल्या नि शिकता आल्या. त्यांची आगळी संस्कृती अनुभवता आली.

हॅलिफॅक्सच्या उपनगरी भागात बेडफोर्ड येथील टर्ननगेटवर कन्येचे घर. आमच्या अपेक्षेपेक्षाही तिने सुंदर संसार थाटलेला. सारं पाहून प्रथम दर्शनीच समाधान वाटलं. प्रवासातील ताण-तणाव, जागरण यामुळे पहिला दिवस विश्रांतीतच गेला. साडेतीन महिन्यांचा मुक्कामाचा बेत होता, त्यामुळे कॅनडातील पर्यटन स्थळांना भेट देण्याची घाई नव्हती.

पहिल्या आठवड्यात शहरातील स्थानिक स्थळांनाच भेटी दिल्या. परंतु जे कांही मनाला भावलं, ते कल्पनेपलिकडचं होतं. पाश्चिमात्य व अमेरिकन देश, त्यांची संस्कृती या विषयी मनात अनेक गैरसमज होते. पण प्रत्यक्षात मात्र वेगळाच अनुभव आला.

हिवाळा संपून नुकताच कुठे उन्हाळ्याला सुरवात झाली होती. त्यामुळे थंडीने गारठलेल्या नि गोठलेल्या धरतीचं चित्र कुठेच पहायला मिळालं नाही.

हिवाळ्यात सर्वत्र गुडघाभर साचलेला बर्फ व कापसाप्रमाणे कोसळणारा बर्फाचा पाऊस, पाने गाळलेले बोडके वृक्ष... आदी दृश्य कन्येने मोबाईलच्या व्हिडिओतून दाखविले होते. हिवाळ्यात अगदी निष्पर्ण झालेले, कित्तेक वर्षानंतर रणभुमीतून खणून काढलेल्या सांगाड्याप्रमाणे दिसणारे वृक्ष मी व्हिडिओत पाहिले होते. परंतु आता बदलत्या ऋतुबरोबर वातावरणही बदलले होते. सृष्टीचे रूप पूर्णपणे पालटले होते. सारे वृक्ष नव्या पर्णभराने आता अलंक्रृत झाले होते. उन्हाळ्याच्या उबदारपणाबरोबरच धरतीवर अधूनमधून होणाऱ्या पावसाच्या शिडकाव्यामुळे वातावरण आल्हादकारक बनले होते. धरतीमातेचे सौंदर्य खुलून दिसत होते. वृक्ष, वेलीना नवजीवन प्राप्त झाले होते. सृष्टीचं हे नवरूप पाहून मनाला प्रसन्नता वाटत होती.

संध्याकाळची वेळ. आम्ही फिरण्याच्या निमित्ताने सहज बाहेर पडलो. प्रथमदर्शनीच स्वच्छ, सुंदर रस्ते, मोकळया जागेतील हिरवळ, पिवळसर कोवळी नि हिरवीगार पाने परिधान केलेले वृक्ष .... साऱ्याच गोष्टीनी मनाला भुरळ घातली. त्यातही नवख्या लोकांनी केलेलं आदरातिथ्य पाहून ‘येथील निसर्गच भुरळ घालणारा नाही तर, माणसंही मनं खुलविणारी आहेत' याचा प्रत्यय आला. लोकांमधील शिस्त, स्वच्छता, सौजन्य, स्वावलंबन व नियमांच काटेकोरपणे पालन करण्याची वृत्ती आम्हा भारतीयांना अनुकरणीय व बरच कांही शिकविणारी होती.

घरातूनबाहेर पडून उजव्या बाजुच्या फुटपथावरून चाललो होतो, तोच समोरून येणाऱ्या सुंदर, गोऱ्यागोमट्या बाईने-

“हॅलोऽऽ! हाऊ आर यू?'

असा प्रश्न केला व आमचे सुहास्य स्वागत केले. सोबत असलेल्या माझ्या कन्येची ओळख असावी, असे वाटून मी कांहीच प्रतिक्रीया दिली नाही. कन्येनेच-

“वुई आर फाईन, .... हाऊ आर यू?”

असा तिला प्रतिसाद दिला. कांहीसे पुढे गेल्यानंतर मीच तिला विचारले,

“बाई कुणी ओळखीची आहे का?” त्यावर ती म्हणाली,

"नाही, इथे समोर आलेल्यांशी असेच सौजन्याने व आदरांने बोलतात हे लोक. आपणही त्याला असाच प्रतिसाद देणे अपेक्षित असते."

या तिच्या माहितीने मी प्रभावित झालो. भारतात कांही अपवाद वगळता ओळखीचे चेहरेसुध्दा मान वाकडी करून जाताना आपण पहातो. सौजन्य तर सोडाच त्यांच्या बोलण्यात आपुलकीचा लवलेशही नसतो.

पुढे असे अनेक अनुभव आले. त्यामुळे आदरातिथ्याच्या या गोष्टी अंगवळणी पाडवून घेणे आम्हालाही भाग पडले.

वाटेत भेटलेले लोक जुनी ओळख असल्याप्रमाणे-

"गुड मॉर्निंग, गुड इव्हनिंग, गुड डे, हाऊ आर यू? आय अँम फाईन .... "अशी आदरातिथ्य करणारी वाक्ये समयानुरूप बोलतात. त्यामुळे अनोळखीपणा नाहीसा होऊन एक प्रकारे त्यांच्याविषयी आपुलकीची भावना निर्माण होते. त्यातून त्यांचा सुसंस्कृतपणाही दिसून येतो.

***

दुसऱ्या दिवशी इथल्या लोकांचा आणखी एक अनुकरणीय पैलू समजला नि त्याचा अनुभवही आला. बेडफोर्डच्या पूर्वेला अँटलांटिक महासागराच्या किनारपट्टीवर आम्ही सहज फिरत होतो. याला महासागर म्हणण्यापेक्षा खाडी म्हणणेच योग्य ठरेल. कारण महासागराचे पाणी इथे जमीनीच्या अंतर्भागात शिरले आहे. सायंकाळचे आठ वाजले होते. सूर्य अस्ताला जात होता. (उन्हाळयात इथे रात्री नऊनंतरच अंधार पडतो.) महासागरातून वाहत येणाऱ्या वाऱ्याच्या झुळूकीमुळे शरीराला आल्हादकारक गारवा जानवत होता. अशा वेळी बीचवर कॉफीचे घुटके घेत फिरण्यात मजा कांही औरच असते, कन्येने सर्वांसाठी फ्रेंच व्हॅनिलाचे कप आनून दिले नि बीचवरच्या बाकावर बसून आम्ही त्या कॉफीची मजा लुटू लागलो. कॉफी पिऊन झाली नि मी रिकामा कागदी कप (युज अँड थ्रो) बाकड्याशेजारीच ठेऊन दिला. शेजारी बसलेल्या गोऱ्याने माझ्याकडे कांहीशा विचित्र नजरेने पाहिले. त्याच्या नजरेत नापसंतीचा भाव होता. जावईबापुंच्या लक्षात ही गोष्ट आली. त्यांनी

सर्वांचे रिकामे कप उचलले नि शेजारी असलेल्या कचरापेटीत नेऊन टाकले. मी कांहीशा प्रश्नार्थक मुद्रेने त्यांच्याकडे पहात होतो त्यावर ते म्हणाले,

"पप्पा, इथे स्वच्छतेची काटेकोरपणे काळजी घेतली जाते. डस्टबीनमध्येच कचरा टाकणे अपेक्षितच नाही तर, बंधनकारक आहे."

मी कांहीसा खजील झालो. कॉफीचा रिकामा कप तसाच टाकून माझे भारतीयत्व मी दाखवून दिले होते. भारतीयांमध्ये अनेक चांगले गुण आहेत; परंतु स्वच्छतेकडे मात्र आम्ही कधी गांभिर्याने पाहिलेच नाही. त्याचा सार्वजनिक आरोग्यावर विपरित परिणाम होत आहे. इथल्या माझ्या वर्तनाची मलाच लाज वाटली.

कॅनडातील वास्तव्यात मला स्वच्छतेच्या बाबतीत पदोपदी अनुभव आला. घराचे अंगण, सार्वजनिक ठिकाणं, रस्ते, उपहारगृहे एवढेच नाही तर स्वच्छतागृहे सुध्दा किती स्वच्छ आणि चकचकीत! कुठे कागदाची चिटोरीसुध्दा आढळून येणार नाही. शहरच नाही तर, ग्रामीण भागातही घरगुती कचरा वेळेत नेण्याची व्यवस्था स्थानिक स्वराज्य संस्था करतात. ओला कचरा, सुका कचरा स्वतंत्रपणे नेण्यात येतो. सार्वजनिक ठिकाणी लोक कचरा डस्टबीनमध्येच टाकतात. सार्वजनिक ठिकाणी थुंकण्यासही सक्त मनाई आहे. लोकांच्या सोईसाठी सार्वजनिक ठिकाणे, उपहारगृहे आदी ठिकाणी पुरुष आणि महिलांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहांची सोय आहे.

***

कन्येच्या घराच्या मागीलबाजूस बादलीतील पाण्यात गणपतीची मूर्ती ठेवलेली दिसली. प्लॅस्टर ऑफ पॅरिसची मूर्ती असल्याने ती अजून विरघळली नव्हती. मी विचारणा केली,

"दीदी, (आम्ही लाडाने तिला दीदीच म्हणतो.) मुर्तीचं बादलीतच विसर्जन केलं का?"

"हो"

“हॅलिफक्समध्ये तर मोठमोठे तलाव, सरोवरे आहेत. तिन्ही बाजूनी महासागराने वेढले आहे; मग बादलीत विसर्जन करण्याचे कारण?”

“नद्या, तालाव, महासागरात...ओला कचरा किंवा कोणत्याच गोष्टी टाकण्यास बंदी आहे. असे केल्यास तो गुन्हा ठरतो.”

“मग निर्माल्याचं विसर्जन कुठे केलं?”

“देवाचं निर्माल्य कचऱ्यात टाकणं बरं नाही; म्हणून फुले वाहीलीच नाहीत. गजाननाला भक्तीचीच फुले अर्पण केली,” ती गमतीने हसत-हसत म्हणाली.

प्रसंग साधाच असला तरी तो बरच कांही शिकविणारा होता. आपपल्या दैवतांची पूजाअर्चा करण्यास कुणाची बंदी असण्याचे कारण नव्हते; मात्र हे करताना पर्यावरणाचे प्रदुषण होणार नाही याची खबरदारी घेण्याचे मात्र येथे बंधन होते. पर्यावरण स्वच्छ व निरोगी असेल तर समाजिक आरोग्यही चांगले रहाते, या साध्या, सरळ शास्त्रीय नियमाचे इथे पालन करण्यात येते. माझी मुलगी व जावई कॅनडाचे कायम रहीवाशी झाले पण आपल्या संस्कृतीचा त्यानी विसर पडू दिला नाही. गणेशमूर्तीचे पूजन करून त्यांनी आपली परंपरा कायम राखली होती नि मुर्तीच्या विसर्जनाबाबत कॅनडाच्या नियमाचे पालनही केले होते.

मला साऱ्याच गोष्टींचं अश्चर्य वजा कौतुक वाटत होतं. आपल्या देशात पर्यावरण संरक्षण व स्वच्छते विषयी थोडी जरी जागरुकता निर्माण झाली तरी बरेच कांही साध्य होईल. विदेशातील ही स्वच्छता पाहूनच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी “स्वच्छ भारत अभियान” हाती घेतले असावे. परंतु लोकांना त्याचे महत्व पटले नि त्याचे अनुकरण झाले तर .... ? सध्यातरी कल्पनेच्या साम्राज्यातच वावरलेले बरे!

***

गमतीची वाटली तरी आणखी एक कौतुकास्पद गोष्ट मी पाहिली. इथल्या विशेषत: स्त्रीयांचे कुत्र्यावर जीवापाड प्रेम! आपल्या तान्ह्याला त्यानी कधी प्रेमाने काखेत घेऊन फिरलेले मी पाहिले नाही. पण कुत्र्यांना काखेत घेऊन त्यांना प्रेमाणे गोंजारणाऱ्या महिलांना मी पाहिले आहे.

एक दिवस हॅलिफक्समध्ये सायंकाळी आम्ही फुटपाथवरून चालत जात होतो. फूटपाथला लागून असलेल्या हिरवळीत एक गोरीबाई दोन कुत्र्यांशी खेळत होती. अचानक एका कुत्र्यांने फूटपाथशेजारीच शौच केले. लागलीच त्या महिलेने सोबत आनलेल्या प्लास्टीक पिशवित ती विष्टा भरून घेतली. आम्हाला हा प्रकार कांहीसा किळसवाना वाटला. मी कन्येला म्हणालो,

"दीदी, हा काय प्रकार आहे? चक्क त्याबाईने कुत्र्याची विष्टा पिशवित भरून घेतली...कशासाठी?"

"पप्पा, इथली स्वच्छता पहाताय ना! स्वच्छतेच्या बाबतीत इथला कायदा फार कडक आहे. कायद्याचे परिवर्तन आता इथल्या लोकांच्या संस्कारात झाले आहे."

"आता ती त्या विष्टेचे काय करणार?" माझा प्रश्न

"त्यासाठी ठेवलेल्या डस्टबीनमध्ये टाकणार!"

हा प्रकार किळसवाणा असला तरी अनुकरणीय होता. आपल्या देशात कुत्र्यांना घेऊन फिरायला जाणारे महाभाग कमी नाहीत, पण त्यांच्या विष्टेमुळे रस्त्याच्याकडेने चालत जाणेही अवघड होते.

कॅनडात उपहारगृहात जा, स्वच्छतागृहात जा, वा कुणा मित्राच्या घरी... तुम्हाला हात पुसण्यासाठी कापडी टॉवेल किंवा रुमाल मिळणार नाही. पेपर टॉवेल किंवा टिश्यु पेपर देण्यात येतील. नॉन रिसायक्लेबल गोष्टींचा वापर इथे प्रामुख्याने टाळण्यात येतो. घर आणि परिसराची स्वच्छता लोक स्वत: करतात नि रस्ते, सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता स्थानिक प्रशासन करते. किंबहूना ती त्यांची नैतिक आणि कायदेशीर जबाबदारीच आहे. आपल्या देशात कांही वेगळे नियम नाहीत. परंतु त्याची अंमलबजावणी किती प्रामाणिकपणे केली जाते, हा महत्वाचा विषय आहे. आम्हाला आमच्या हक्कांची जाणीव आहे; परंतु आमच्या कर्तव्याची नाही. कॅनडात प्रशासन आणि नागरिक आपापली जबाबदारी प्रामाणिकपणे व कर्तव्याच्या भावनेतून पार पाडतात. म्हणूनच तिथे कमालीची स्वच्छता आहे. "शहरात कचरा

दाखवा नि एक हजार डॉलर मिळवा" असा सरकारने फलक लावला तरी कचरा सापडणे महा कठीण!

***

कन्या आणि जावई दोघेही कंपनीत नोकरीला ....घरचे काम आटोपून कामावर जायचे म्हणजे त्यांची चांगलीच ओढा-ताण व्हायची. त्यामुळे मीच एक दिवस तिला म्हणालो,

"दोघेही नोकरीला जाता. घरकामासाठी एखादी बाई का पहात नाही?" त्यावर ती म्हणाली,

"इथे कोणी कामवाली बाई मिळत नाही. स्वत:ची कामे स्वत:च करावी लागतात."

"मग तुमच्या ऑफिसमध्ये कोणी शिपाई तरी आहे की नाही?"

"नाही, कंपनीतील वरिष्ठ अधिकारी असोत की कनिष्ठ कर्मचारी ... साऱ्याना स्वत:ची कामे स्वत:च करावी लागतात. आठवड्यातून एकवेळ क्लिनर येऊन साफसफाई करुन जाते!"

मला या गोष्टीचे कौतुक वाटले. मी कॅनडातील कांही कंपन्या, संस्थाना भेट दिली. शिपाई (प्युन) हा प्रकार मला कुठेच आढळला नाही. साध्या लिपीकापासून ते वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत सर्वजण स्वत:ची कामे स्वत:च करीत होते. त्यांच्याकडून स्वसाह्यतेचा हा बोध घेण्यासारखा आहे. नाहीतर आपल्याकडे आराम खुर्चीत बसून शिपाई किंवा कनिष्ठ कर्मचाऱ्यांना हुकूम सोडणारे अधिकारी कमी नाहीत. कामापेक्षा अधिकार गाजविणारेच अधिक! कॅनडात पदानुसार वेतनात जरूर तफावत आहे; परंतु कामात कुठेच उच्च, नीच हा भेद नाही. आपल्याकडील पदानुसार "सर, साहेब... "असे संबोधन तिथे मुळीच नाही. एकमेकाशी बोलतांना "मि. जॉर्ज, मिस अंजू ..." असे नावानेच बोलविण्याचा प्रघात आहे. त्यामुळे वरिष्ठ, कनिष्ठ अशी भावना कुणाच्याच मनात निर्माण होत नाही. "आम्ही सारे सेवक" याच भावनेतून सारे जण कार्य करतात. ही बाब निश्चितच कौतुकास्पद आहे.

इथल्या साऱ्याच उपहारगृहात कोणी वेटर आढळणार नाहीत. बहूतेक ठिकाणी ‘‘सेल्फ सर्व्हीस’’चाच प्रकार आहे. खाद्य पदार्थांचा आस्वाद घेतल्यानंतर कागदी प्लेटस्, कागदी कप, टिश्यूपेपर ... साऱ्या वस्तू ग्राहकांनीच तिथे ठेवलेल्या कचरा पेटीत टाकाव्या लागतात. उपहारगृहात स्वच्छता राखण्याची जबाबदारी उपहारगृहाच्या चालकांबरोबरच ग्राहकांवरही आहे. आपल्याकडेही सेल्फ सर्व्हीस उपहारगृहे आहेत, पण ती पैसे देऊन चहा किंवा खाद्य पदार्थ घेण्या पुरतीच, स्वच्छतेशी ग्राहकांचे कांही देणेघेणे नाही किंबहूना कर्तव्याच्या भावनेतून कोणी ती राखण्याचा प्रयत्नही करीत नाही.

घर आणि परिसराच्या स्वच्छतेने तर मी भाराऊनच गेलो होतो. मुख्य रस्त्यापासून घरापर्यंत चार चाकी गाड्या जाण्यासाठी प्रत्येक घरासमोर डांबरी रस्ता, मोकळया जागेत लॉन लाऊन हिरवळीची देखभाल करण्यात येत असल्याने परिसर स्वच्छ व सुंदर बनलेला. क्रीडांगण, मोकळी जागा, सार्वजनिक उद्यान ... सर्वच ठिकाणी सुदर हिरवळ! सारेच कसे विलोभनीय दृश्य ! जमीनीवरील हे तृण वेळोवेळी मशीनने छाटण्यात येत असल्याने जमिनीवर हिरवा गालिच्या पसरावा असे सुंदर व मनोवेधक दृश्य! परिणामी रस्ते किंवा परिसरात कुठेच धूळ नाही, दुर्गंधीचा लवलेशही नाही. डास किंवा इतर उपद्रवी किटकांचा पत्ताच नाही. परिणामी लोकांचे आरोग्यही अधिक सुदृढ! त्यामुळे गोऱ्या, गोमट्या लोकांचे देखणेपण अधिक खूलून दिसते. त्यांना नैसर्गिक सौंदर्य लाभल्याने अलंकार परिधान करण्याची गरजच नाही.

आम्ही कॅनडातील कांही खेड्यातही गेलो. सुविधांच्या बाबतीत शहर आणि ग्रामीण भाग यात विशेष फरक जाणवला नाही. प्रत्येक गावात डांबरी रस्ते, पिण्याच्या पाण्याची सुविधा, शाळा, आरोग्य या मुलभूत गोष्टी उपलब्ध करून दिल्या आहेत. ‘लोकसंख्या कमी, साधने अधिक' अशी इथली परिस्थिती! त्यामुळे बहुसंख्य लोक सुखी जीवन जगताना आढळून येतात.

# ४. भुरळ घालणारा निसर्ग



कॅनडा वैविध्यतेने नटलेला देश. या नव्या जगताने अल्पावधीत प्रगती साधली ती निसर्गाचा वरदहस्त लाभल्यामुळेच! सुशिक्षित लोक, त्यांची वैज्ञानिकदृष्टी नि नैसर्गिक साधन संपत्तीची विपुलता यामुळेच हा देश सर्वांगिण क्षेत्रात प्रगत झाला. उत्तर अमेरिका खंडातील या संपन्न देशात आज पर्यटन करीत होतो. निसर्ग सौंदर्याने मनाला मोहीनी घातली होती. एका बाजुला अटलांटिक व दुसऱ्या बाजूला अथांग पसरलेला पॅसिफीक महासागर, देशांतर्गत नद्यांचे व सरोवरांचे पसरलेले जाळे, हिरव्या गर्द वृक्षानी नटलेली अरण्ये, मनाला भुरळ घालणारी विविध रंगी उद्याने, या साऱ्यांचा मुक्रूटमणी नायगारा... सगळ्याच गोष्टी कशा एकापेक्षा एक सुंदर, मनाला वेड लावणाऱ्या!

कॅनडाचे चित्रित केलेले एक वेगळे रूप कन्येने व्हिडिओच्या माध्यमातून दाखविले होते. कडाक्याच्या हिवाळ्यात कापसाप्रमाणे पडणारा बर्फाचा पाऊस, सर्वत्र भुमिवर संगमरवराप्रमाणे साचलेला बर्फ, मौल्यवान वस्त्रांचा त्याग करून रुक्ष

संन्याशाप्रमाणे पाने गाळून उभे असलेले वृक्ष, बर्फाच्च्याच ढिगाऱ्यांतून डोकेवर काढून पहाणारी घरे.... सारे कसे ओल्या वाळवंटासारखेच! अशा परिस्थितीत लोकांचे जीवनमान कसे असेल, या विचारानेच मन कासाविस होई. या वातावरणाला नवखी असलेली माझी कन्या, जावई कसे रहात असतील? ....ही बेचैनी मनाला सतत सतावित होती. बर्फाळ वातावरणात मानवी जीवन सुसह्य होण्यासाठी केलेल्या मानव निर्मित उपाययोजनाही मी व्हिडिओत पाहिल्या होत्या. पण मनाची अस्वस्थता कमी होत नव्हती.

गारठून टाकणारा हिवाळा मानवणार नाही, म्हणून कन्येने आम्हाला उन्हाळ्यात बोलाऊन घेतले होते. आम्ही कॅनडात आलो, त्यावेळी मे महिना होता. हिवाळा संपून नुकताच कुठे उन्हाळ्याला सुरवात झाली होती. वृक्ष, वेलीना नवे जीवन प्राप्त होत होते, नवी पालवी फुटत होती. सृष्टी नवे रूप धारण करीत होती. धरतीवर पसरलेला हिरवा मखमली गालिचा, वृक्ष-वेलींवरील कोवळी नाजूक पाने व विविध रंगी फूले.... मन मोहीत करीत होती. नव वधूप्रमाणे वस्त्रालंकारात नटलेली सृष्टी आपल्या अनोख्या सौंदर्याने साऱ्यांनाच भुरळ घालीत होती. उन्हाळा असला तरी त्याची दाहकता कुठेच जाणवत नव्हती. वसंत ऋतुच जणू आनंदाने खिदळत होता, बहरत होता, साऱ्यांना स्वर्गीय आनंदाची अनुभूती देत होता. या विलोभनीय सौंदर्यांने आमची मने खुलली, प्रसन्न झाली.

कॅनडा विस्ताराने जगात दुसऱ्या क्रमांकाचा देश! पण लोकसंख्या तशी विरळच. बहूसंख्य लोक शहरात रहाणारे. छोट्याछोट्या गावांचे सुध्दा सुविधांमुळे शहरीकरण झालेले! दोन गावात सुमारे ५० ते १०० किलोमीटरचे अंतर! पण रस्ते कसे सुंदर, भव्य नि सुस्थितीत! दुतर्फा सुंदर हिरवीगार पसरलेली सृष्टी! त्यामुळे प्रवासाला एक आगळीच मौज वाटायची!

***

असेच एक सृष्टीसौंदर्य आम्ही पहावयास गेलो नि बेभानच झालो. निसर्ग देवतेने केलेल्या सौंदर्याची उधळण मनाला मोहविणारी होती. स्वर्गीय सौंदर्याचे दर्शन

घडविणाऱ्या या ठिकाणाचे नाव होते ट्रुरोचे व्हीक्टोरिया पार्क! हॅलिफॅक्स पासून कारने जायचे तर दीड तासाचा प्रवास! आम्ही तिथे पोहोचलो नि प्रथम दर्शनीच ट्रुरोच्या शिरपेचात गुंफलेला हा मौल्यवान पाचू पाहून थक्क झालो.

दोन्ही बाजूला हिरवेगार उंच कडे नि मध्येच खोल दरी! त्यातून झुळूझुळू वाहत, अवखळपणे उड्या मारत, खिदळत येणारा निर्झर, त्याच्या बाजूनेच नागमोडी वळणे घेत जाणारी पायवाट ... निसर्गाचा हा अदभूत चमत्कार पहात स्वर्गीय सौंदर्याचा आनंद लुटत चाललेले पर्यटक... आम्हीही त्यात सामिल झालो! ४०० एकर प्रदेशात विस्तारलेला पार्क पाहताना पाय थकले तरी नेत्रांची नि मनाची तहान भागत नव्हती. अनामिक ओढीने पुढेपुढे जात होतो, निसर्ग सौंदर्याची भुरळ मनाला वेड लावित होती. निसर्गाचे सौंदर्यामृत पिऊन मन बेधुंद होत होते. अथांग सौंदर्याचा खजिना चारी दिशांना पसरला होता.

पर्वत राजाच्या कटिखांद्यावरून रुळत, कुठे अवखळपणे उड्या घेत, तर कुठे नागमोडी वळणे घेत निर्झर लाडीकपणे खिदळत होता. जेवढे अद्भुत तेवढेच आकर्षक व मनमोहक दृश्य! एका ठिकाणी तर निर्झराने चक्क खाली झेप घेतली नि तितक्याच अलगतपणे पर्वतराजाने त्याला आपल्या ओंजळीत झेलले... ठेचाळून खाली पडणाऱ्या बाळाला आईने अलगत झेलावे तसेच!

त्यामुळेच ईथे धबधब्यांचे रमणीय दृश्य निर्माण झाले आहे. त्यातून चौफेर उडणाऱ्या तुषारांवर सुर्यकिरण पडून सप्तरंगाची उधळण होत असलेली दिसली नि हे विलोभनिय दृश्य आम्ही पहातच राहिलो. त्यात वेळ केंव्हा निघून गेला, समजलेच नाही. धबधब्याच्या खाली खोलगट भागात पाणी साठल्याने त्याला सुंदर तळ्याचे स्वरुप आले आहे. तळे खडकाळ असल्याने पाणी काचेसारखे स्वच्छ! आरशात दिसावे तसे आमचे प्रतिबिंब पाण्यात स्पष्ट दिसत होते. तळ्यात माशाप्रमाणे तरंगणाऱ्या गोऱ्या, गोमट्या बालकांनी आमचे लक्ष वेधून घेतले. दोन-तीन वर्षांची सुंदर गोजीरवाणी मुले पाण्यात पोहतांना पाहून मौज नि तितकेच कौतुक वाटले. ईतक्या कोवळया वयात बाळाना पाण्यात सोडणाऱ्या मातांचा प्रथमदर्शनी राग आला. परतु नंतर त्यांचे नवल वाटले. बाल वयात पोहण्याची कला अवगत व्हावी,

या उद्देशाबरोबरच, बालपणीच त्यांच्यामध्ये साहसीवृत्ती निर्माण करण्याचा त्यांचा प्रयत्न कौतुकास्पद होता. गोरे लोक दिसायला नाजूक असले तरी खेळात नि युध्दातही इतके पराक्रमी कसे याचे रहस्य मला आता उकलले.

ओढ्याच्या दोन्ही बाजुला उंचच उंच कडे; त्यावरील आकाशाला गवसणी घालणाऱ्या हिरव्यागार वृक्षांनी आमचे लक्ष वेधून घेतले. ना कुठे पक्षांचा किलबिलाट, ना जंगली प्राण्यांचा सुळसुळाट! एखादी खार माणसांच्या भितीने सरसर झाडावर चढतांना दिसे. एखाद-दुसरा कावळा आकाशात उंच घिरट्या घालतांना दिसायचा. पण त्याची काव-कावही कधी ऐकायला मिळायची नाही. टेकडीच्या पायथ्याशी स्वच्छंदपणे हिरवळीवर बागडणारी हरणांची पाडसं आम्ही पाहिली होती. याशिवाय अन्य कोणत्याच प्राण्याचे आम्हाला दर्शन झाले नाही.

वृक्षांच्या दाटीतूनच वाट काढीत नागमोडी वळणे घेत गेलेल्या कृत्रिम लाकडी जीन्यावरून आम्ही वर,वर जात होतो. खाली खोल दरी व वर वृक्षराजीने नटलेला उंचचउंच कडा.... मनाचा थरकाप व्हायचा. परंतु निसर्गाची अजब किमया पाहून मन भांबाऊन गेले होते. नकळत पावले जीन्यावरून माथ्याच्या दिशेने पुढेपुढे जात होती. निसर्ग सौंदर्याच्या मोहीनीमुळे शारीरिक थकवा जाणवत नव्हता. आकाश निरभ्र होते. डोकीवर सूर्य तळपत होता. परंतु वृक्षांच्या गर्द पानानी तप्त किरणांना रोखून, आमच्यावर शितल सावलीची जणू बरसातच केली होती.

पार्कमधील निसर्ग सौंदर्याचा आनंद लूटत आम्ही होली बायबल हिलवर आलो. नावाप्रमाणे हे एक पवित्र व ऐतिहासिक ठिकाण! येथे एक विहीर दिसली. विहीर साधीच; पण तिचे नाव होते 'होलीवेल' म्हणजे पवित्र विहीर! नावावरून या मागे कांही ईतिहास असावा हे मी जाणले. आमच्या बाजूलाच प्रवाशांना गाईड माहिती देत होता. कॅनडातील आदिवासी लोक प्राचिन काळी या पवित्र ठिकाणी यायचे, आपल्या मुलांचे बाप्तिस्मा (baptism) करायचे व त्यांना शुभेच्छा द्यायचे, असा काहीसा इतिहास आहे. मला बाप्तिस्मा शब्द नवीनच होता, त्याच्या विधीची माहितीही नव्हती. त्यामुळे त्याविषयी अधिक जाणून घेण्याची ओढ लागली. गाईडला या विषयी विचारले. त्यावर तो म्हणाला, बाप्तिस्मा हा एक संस्कार आहे.

सर्वच ख्रिश्चन संप्रदायात तो सामान्य आहे. कॅथोलिक चर्चमध्ये, कॅथोलिक विश्वात मुलांचे स्वागत करण्यासाठी आणि त्यांना मूळ पापांपासून मुक्त करण्यासाठी नवजात बालकांना बाप्तिस्मा दिला जातो. ... बाप्तिस्मा म्हणजे पापापासून मुक्ती असे ख्रिश्चन संप्रदायात मानले जाते. हाच धार्मिक विधी या पवित्र विहिरीवर येऊन पूर्वीपासून केला जात असे. त्यामुळे या विहिरीला होली वेल म्हणून ओळखण्यात येत होते.

गाईडने दिलेल्या माहितीवरून ख्रिश्चन समाजातील हा एक धार्मिक विधी असल्याची माहिती झाली. अर्थात सृष्टी सौंदर्याबरोबर पार्कला ऐतिहासिक, धार्मिक सौंदर्याची जोड लाभल्याने प्रेक्षकांचे हे आकर्षण ठरलेले आहे.

व्हिक्टोरिया पार्कमधील दरी, ओढ्याचे पात्र, दोन्ही बाजूच्या उंच टेकड्या, पठार यावर जीव वैविध्य असल्याचे मी वाचले होते. मात्र पाण्यात तरंगणारे मासे, समुद्रावरून घिरट्या घालणारे समुद्र पक्षी (सीबर्डस्), क्वचितच कावकाव करणारे कावळे, चिवचिवाट न करणाऱ्या चिमण्या, निर्भीड नि मुक्तपणे फिरणारी हरणाची पाडसे, सरसर झाडावर चढणाऱ्या खारी या शिवाय अन्य प्राणी, पक्षांचे आम्हाला प्रवासात कुठेच दर्शन घडले नाही. येथे पाईन, हेमलॉक या प्रमुख वृक्षांबरोबरच अन्य वृक्षांचे वैविध्य आहे. छायाचित्रकार, पक्षीनिरिक्षक, निसर्ग प्रेमी व आमच्यासारख्या सामान्य पर्यटकांना वेड लावणारे निसर्ग सौंदर्य येथे आहे. दरी, डोंगर, नदी, सरोवरे ....त्यांचे रंग, रूप, आकार सारेच कसे मनाला भावणारे!

या नैसर्गिक सौंदर्याच्या जोडीलाच पर्यटकांच्या करमणुकीसाठी पार्क व्यवस्थापनाने कांही करमणुकीची साधने उपलब्ध केली आहेत. पार्कच्या प्रवेशद्वारावरच टेनीस कोर्ट, स्वीमिंग पूल, लीग बॉल फिल्ड, क्लब, क्रीडांगण, वाटरस्प्रे पार्क, बॅंडशेल, पिकनिक टेबल ... साऱ्याच गोष्टी कशा मनाला वेड लावणाऱ्या!

पार्कच्या प्रवेशव्दारवरच मुलांचे मनोवेधक कार्यक्रम सुरू होते. शेजारीच लहान मुलांची मडरेस (चिखलातून धावण्याची स्पर्धा) व त्याच्या बाजूला मोठ्यांची फूटबॉल स्पर्धा सुरू होती. तसा फुटबॉलचा खेळ आम्हाला नवीन नव्हता, परंतु चिमुकल्यांच्या मडरेसने आमचे लक्ष वेधले. पायाखाली चिखल, डोकीवर

जाळीसारखे पातळ कापड, त्यावर आयोजकांचा पाण्याचा मारा या साऱ्या दिव्यातून मुलांनी पळत जायचे ... मोठी कसोटीच होती. त्यात पाच वर्षाखालील पोरं .... त्यांना स्पर्धेच्या अर्थाची अजून उमजही आलेली नसावी, परंतु स्पर्धा जिंकण्याच्या जिद्दिने गुडघाभर चिखलातून ती जीव पणाला लावून धावत होती.... चिखलात तडफडत होती, पडत होती, पण पुन्हा उठून तेवढ्याच ईर्षेने धावत होती. बाजूलाच त्यांचे पालक ओरडून त्यांना प्रोत्साहन देत होते. गोरी-गोमटी, दिसायला नाजूक वाटणारी पोरं.... धावतांना चिखलाने माखली तरी त्याचे त्यांना भान नव्हते ... जिंकण्यासाठी ती आपली शक्ती पणाला लावित होती. गोरे, गोमटे, शरीराने नाजूक दिसणारे अमेरिका, युरोपमधील खेळाडू ऑलिंपिक स्पर्धेत पुढे कसे? याचे गुढ मला आता उलघडले. बालपणापासूनच त्यांच्यावर तसे संस्कार करण्यात येतात, त्यांच्यामध्ये ईर्षा, जिद्द निर्माण करण्यात येते, म्हणूनच ती पुढे विविध क्षेत्रात चमकतात. आपले व आपल्या देशाचेही नाव उज्वल करतात. जगात लोकसंख्येत आघाडी घेतलेले आम्ही भारतीय, खेळात सर्वात मागे पडतो. अमेरिका, युरोपच्या गोऱ्या लोकांचा हा आदर्श समोर ठेऊन आमच्या तरूणानीही अशीच जिद्द, देशाभिमान बाळगला तर.... मनात विचार येऊन गेला.

निसर्गाचा चमत्कार नि लोकांमधील कला-कौशल्य पाहून आम्ही स्वत:लाच हरवून गेलो. तेवढ्यात कोणीतरी म्हणाले,

पोटाबिटाला कांही खाणार की, असेच पहात रहाणार.... ! मी हातातील घड्याळात पाहिले. दुपारचे अडीच वाजून गेले होते. तहान-भूक हरपून आम्ही वेड्यासारखे पहातच होतो. निसर्गाने नि तिथल्या माणसांनीही आमचा चांगलाच विरंगुळा केला होता. मन मारून आम्ही बाहेर पडलो, मोकळया मैदानात जागोजागी पिकनिक टेबल व त्याच्या सभोती बसण्यासाठी बाकांची मांडणी केलेली होती. पार्क पाहून आलेले पर्यटक सोबत आनलेला अल्पोपहार घेत होते. आम्हीही एक डायनिंग टेबल गाठला, तेथे बसून अल्पोपहार खाल्ला नि अविस्मरणीय गोष्टी मनात साठवून घरी परतलो.

***

कॅनडामधील पार्क ही निसर्गाची देणगी आहे. कॅनडाने त्यांचे उत्तमरित्या जतन आणि संवर्धन केले आहे. दूरून डोंगर साजरे.... अशी आपल्याकडे म्हण आहे. परंतु येथील पार्क दुरूनच नाही, तर जवळूनही चांगले, मनाला भुरळ घालणारे आहेत. बहूतेक पार्कना समुद्र किनारा भिडल्याने त्यांचे सौंदर्य अधीक खुलून दिसते. या निसर्गदत्त देणगीत पार्कच्या व्यवस्थापनाने आपल्या कल्पकतेने अधिक भर घातल्याने ते अधिक सुंदर आणि मनोरंजक बनले आहेत. आरोग्यदायी, सुंदर व स्वच्छ वातावरणामुळे येथील पार्क्स लोकांच्या विरंगुळयाचे, करमणुकीचे माध्यम बनले आहेत. त्यामुळेच देश-विदेशातील पर्यटक मोठ्या संख्येने या पार्ककडे आकर्षित होताना दिसतात.

हॅलिफॅक्स शेजारील पॉईंट प्लीझंट पार्क, सेंटजॉन येथील रॉकवुड पार्क, आयर्विंग नेचर पार्क, व्हॅंकुव्हर येथील स्टॅनली पार्क, क्वीन एलिझाबेथ पार्क, बेलकेरा पार्क आदी पार्कना मी भेट दिली. प्रत्येक पार्कचे वेगळे असे वैशिष्ट्य आहे. पार्कमुळे कॅनडाच्या सौंदर्यात आणि समृध्दीतही भर पडली आहे, हेच खरे!



व्हॅंकुव्हरमधील स्टॅनली पार्क

# ५. संवर्धन भारतीय संस्कृतीचे



'हॅलो फ्रेंडस्!

'वुई आर इंडियन्स अँड हॅव प्राऊड टूबी इंडियन्स!'

हे वाक्य होतं हॅलिफक्समधील 'इंडिया फेस्टीव्हल' कार्यक्रमातलं. मी ते ऐकलं नि छाती अभिमानाने भरून आली. कार्यक्रमाच्या सुरवातीलाच सूत्रसंचालक बोलत होता. त्याचे ते शब्द केवळ शब्द नव्हते; तर स्वदेश प्रेमाने भारलेला मंत्रोच्चार होता, भारतीय असल्याचा त्यात गर्व होता, त्यात होती भारतीय संस्कृतीची महती! ज्या शिकागो शहरात स्वामी विवेकानंदांनी, 'हिंदुत्व हा एक संस्कार आहे, जगण्याची एक जीवन पद्धती आहे, बंधुत्वाचा एक साक्षात्कार आहे' हे जगाला पटवून दिलं, त्याच अमेरिका खंडातल्या एका दुसऱ्या शहरात

'गर्वसे कहो, हम भारतीय है'

असेच जणु ती व्यक्ती अभिमानाने सांगत होती. कॅनडातील अनेक गोष्टी मला भावल्या, अनेक गोष्टींनी भुरळ घातली, त्या पाहून मी प्रभावित झालो, परंतु भारतीयत्वाचा अभिमान मनांतून यत्किंचितही कमी झाला नव्हता. जिथे जाईन, तिथे भारतीयत्व शोधण्याचा प्रयत्न करीत होतो.

एक दिवस हॅलिफॅक्स फोर्ट पहाण्यासाठी जात असता, रस्त्याच्या बाजुला इंडिया फेस्टीव्हल कार्यक्रमाची लावलेली जाहिरात वाचली नि मनाला स्वाभाविक ओढ लागली... मायभुमीपासून दूर आलेल्या या अनिवासी भारतीयांना भेटण्याची, त्याना जाणून घेण्याची नि स्वदेशाविषयीच्या त्यांच्या भावना समजून घेण्याची! मी कन्येकडे तसे बोललो. कार्यक्रम रविवारीच होता, त्यामुळे आम्हाला कार्यक्रमाला घेऊन जाण्यात त्यांना कोणती अडचण नव्हती.

ठरल्याप्रमाणे आम्ही कार्यक्रमस्थळी येऊन दाखल झालो. प्रथमदर्शनी भारतातच आल्यासारखे वाटले. तीन महिने कॅनडात होतो. घरचे लोक वगळता क्वचितच भारतीय लोकांची भेट व्हायची. बाहेर फिरायला गेलो की ,'हाय,....हॅलो!' शब्दांची कानाना आता सवय झाली होती. गोरे लोक वाटेत भेटायचे, कॅनडाच्या इंग्रजीत बोलायचे. त्यातील बरेचसे डोकीवरून जायचे .परंतु जमेल तसा मी माझ्या इंग्रजीत त्यांच्याशी संवाद साधायचो. त्यांच्या एका गोष्टीने मला भुरळ घातली नि ती म्हणजे त्यांचे सौजन्य! गोऱ्या अनोळखी व्यक्तीसुध्दा आमच्याशी 'हाय!...हौऊ आर यु?' असे हटकून बोलायच्या. त्यामुळे त्यांच्याविषयी मनात न कळत आपुलकीची भावना निर्माण झाली होती. नाहीतर आपल्याकडे...! ओळखीची माणसंही मान वाकडीकरून जातांना आपण पहातोच की!

रोज येता-जाता कानावर पडणारे इंग्रजी शब्द, समोर येणारे गोरे चेहरे ...मी कांहीसा होमसिक बनलो होतो. इंडिया फेस्टीव्हल कार्यक्रमात त्यावर इलाज सापडला. बऱ्याच दिवसानंतर आपली माणसं भेटली. आपण विदेशात जातो, तेंव्हा भारताच्या सगळ्याच प्रांतातील तिथे रहाणारी माणसं आपली वाटतात. मन न कळत प्रसन्न झाले. आपल्या लोकांत आल्यासारखे वाटले. हो, आपलेच ते! कित्तेक वर्षे मायभूमीपासून दूर राहूनही ते आपली संस्कृती विसरले नव्हते. भारतीय संस्कारांचे ते जतन करीत होते.

तब्बल तीन महिन्यानंतर भारतीय वेशभुषेतील लोक मी पहात होतो. कित्तेक वर्षे विदेशात राहिल्याने विदेशी संस्कृतीत एकरूप झालेले लोकही कार्यक्रमाच्या निमित्ताने हटकून भारतीय वेशभुषेत आले होते. कोणी साडी परिधान केली होती,

कोणी पंजाबी पोशाख घातला होता, कोणी गुजराथी, कोणी तमिळ.... .पण भारतीयत्वाच्या जाणीवेने ते आज एकत्र आले होते. 'विविधतेत एकता; हीच आमची विशेषत:' हे तत्व ते विदेशातही जतन करीत होते.

हॅलिफॅक्समध्ये स्थायिक झालेल्या भारतीय लोकांनी एकत्र येऊन कार्यक्रमाचे आयोजन केले होते. व्यासपीठावर भारताच्या तिरंग्याच्या जोडीला कॅनडाचा राष्ट्रीयध्वजही लावला होता. आपल्या मायदेशाबरोबरच ज्या देशात आपण वास्तव्य करतो, जिथे आपण सेवा बजावतो, त्या देशाचाही तेवढाच अभिमान बाळगण्यात दुमत होण्याचं कारण नव्हतं.

भव्यसभागृह, त्यात समोरच्या बाजूला व्यासपीठ. व्यासपीठासमोर प्रेक्षकांसाठी मांडलेल्या खुर्च्या, दोन्ही बाजुला भारतीय वस्तू व खाद्य पदार्थांचे प्रदर्शन वजा विक्री! सगळेच कांही भारतातल्या सारखे. खुर्च्यांवर बहूसंख्येने भारतीय लोक बसले होते. गोऱ्या लोकांची उपस्थितीही लक्षणीय होती. भारतीयांमध्ये कोणी मराठी, कोणी तमिळ, कोणी गुजराथी... त्यात पंजाबींची संख्या अधिक. धर्म, जात, प्रांत, भाषाभेद बाजूला ठेऊन भारतीयत्वाच्या धाग्याने ते एकत्र आले होते. सर्वांना उत्कंठा होती कार्यक्रम पहाण्याची.

'वुई आर इंडियन्स'

या वाक्यावर साऱ्यांनी टाळयांचा कडकडाट केला. त्यात होता देशाभिमान, देशप्रेम नि भारतीय असल्याचा गर्व! भारतातील कला, संस्कृती, परंपरा यावर अँकरिंग करणारी व्यक्ती बरच कांही बोलली. कित्येक वर्षापासून हे लोक देशापासून दूर आहेत; परंतु आपल्या मायभुमीला ते विसरले नाहीत, याचा मला सार्थ अभिमानही वाटला.

भारतीय संस्कृतीचं दर्शन घडविणारे एकामागून एक कार्यक्रम सुरू झाले. मी मन लाऊन पहात होतो, एकाग्रतेने ऐकत होतो. भारतात अशा कार्यक्रमाचे तसे महत्व वाटले नसते; परंतु सातासमुद्रापलिकडे गोऱ्यांच्या साम्राज्यात त्याचे प्रदर्शन घडत होते, ही बाब निश्चितच कौतुकास्पद होती. जुन्या लोकांना आपल्या कला, संस्कृती

व परंपरांची माहिती आहे; परंतु त्यांची नवी पिढी मात्र या सगळ्या गोष्टीपासून अनभिज्ञच! बालपणापासून त्यांच्यावर कॅनेडियन संस्कृतीचा प्रभाव पडलेला. त्यातूनही त्यांच्या मनावर आपली संस्कृती बिंबविण्याची त्यांची ही एक धडपड! अशा कार्यक्रमांचे आयोजन करून आपण भारतीय आहोत याची नव्या पीढीला जाणीव करून देण्याचा त्यांचा हा एक प्रयत्न होता.

हिंदी, पंजाबी, तमिळ... भारतीय भाषातील एका मागून एक कार्यक्रम व्यासपीठावर सादर होऊ लागले; मुलींच्या नृत्याने तर भारतीयांचेच नव्हे तर उपस्थित गोऱ्या लोकांचेही चांगलेच मनोरंजन झाले. भारतीय नृत्यप्रकार, गायन, बासरी व व्हायोलिन वादन... एकापेक्षा एक सरस कार्यक्रम सादर करून मुला-मुलीनी भारतीय संस्कृतीचे दर्शन घडविले. कित्तेक वर्षे विदेशात राहूनही आपली कला-संस्कृती त्यांनी जतन केली होती. पण एक गोष्ट खटकली, ती म्हणजे इंग्रजी भाषेच्या प्रभावाची. हिंदीत किंवा स्वत:च्या मायबोलीत ते क्वचितच बोलत. संस्कृती भारतीय; परंतु भाषा मात्र विदेशी अशी त्यांची स्थिती! अर्थात हे बरोबरही होते. भारतातील प्रादेशिक भाषेत शिक्षण देणाऱ्या तिथे शाळाच नाहीत. शिवाय त्यांच्या करियरच्यादृष्टीने त्याचा उपयोगही होणार नव्हता. त्यामुळे इंग्रजी माध्यमाशिवाय त्यांच्याकडे पर्यायच नाही. कांही कुटूंबे घरात मातृभाषेत बोलतात. त्यातून नव्या पीढीला आपल्या मातृ भाषेचे थोडेफार ज्ञान झाले असेल तेवढेच! परंतु बहूसंख्य भारतीयांची इंग्रजी हीच आता मातृभाषा बनली आहे.

कार्यक्रमाच्या ठिकाणी नागपूरचे एक मराठी कुटूंब भेटले. त्यांच्यासोबत त्यांची दोन मुलेही होती. २५ वर्षापासून ते कॅनडातच रहात आहेत.

‘आम्हाला मराठी येते; परंतु आमच्या मुलांना मराठी समजतही नाही. आमच्याशी त्यांचा संवाद इंग्रजीतूनच चालतो.' ते म्हणाले.

बऱ्याच कुटूंबांची हीच अवस्था आहे. परंतु माझ्या व्हॅंकुव्हरच्या भेटीत मला परिस्थिती कांहीशी वेगळी वाटली. मला तिथले मातृभाषेच्या संवर्धनाचे उपक्रम पाहून कौतुक वाटले. व्हॅंकुव्हरसह सरी व डेल्टा उपनगरी भागात भारतीयांची संख्या

लक्षणीय आहे. येथे मराठी, हिंदी, पंजाबी भाषा शिकविण्याचे खासगी वर्ग चालतात. इथल्या मराठी मंडळाने आठवड्यातून दोन दिवस मराठीची शाळाही चालविली आहे.

हॅलिफॅक्समधील परिस्थिती काहीशी वेगळी होती. त्यांच्यावर इंग्रजी भाषेचाच प्रभाव अधिक. भारतीय भाषांचे तोकडे ज्ञान असूनही कार्यक्रम बसविण्यासाठी त्यांनी घेतलेले परिश्रम कौतुकास्पद होते.

व्यासपीठावरील कार्यक्रम आता अंतिम टप्यात आले होते. माझं लक्ष वेधून घेतलं ते भारतीय वेशभुषेच्या प्रात्यक्षिक कार्यक्रमाने. गोऱ्या लोकांना भारतीय साडीचे मोठे कौतूक! त्याचे प्रत्यंतर आम्ही फिरत असतांना अनेकवेळा मला आले होते. आम्ही फिरायला गेलो असता सौभाग्यवतींची साडी पाहून-

'ओऽ, ब्युटीफुल, व्हेरी नाईस!'

असे गोऱ्यांचे उद्गार ऐकले होते. इंडिया फेस्टीव्हल कार्यक्रमांत गोऱ्या महिलेला साडी परिधान करण्याचा एक अनोखा कार्यक्रम आयोजकांनी मोठ्या कल्पकतेने आयोजित केला होता. निमंत्रित गोरी महिला व्यासपीठावर आली. एका भारतीय महिलेने साडी आणि साडीचे प्रकार याविषयी इंग्रजीतूनच माहिती दिली. साडी परिधान करण्याची पध्दत सांगत तिने गोऱ्या बाईला साडी नेसविली.मुळातच सुंदर असलेल्या त्या गोऱ्या महिलेचं सौंदर्य भारतीय साडीत अधिक खुलून दिसत होतं. त्या महिलेलाही साडीचे तेवढेच नवल वाटले असावे. समोरच्या प्रेक्षकांना भारतीय पध्दतीने हात जोडून तिने'नमस्कार' केला. उपस्थितांनी टाळया वाजवून तिचे कौतुक केले. फॅशन शोत सुंदर मॉडेलने साडीचे प्रदर्शन करीत ठुमकत, ठुमकत जावे, तशी ती व्यासपीठावरून खाली उतरली.

साडी... स्त्रीचे सौंदर्य खुलविणारा एक अलंकार, तर फेटा पुरूषाच्या पराक्रमाची बहार! मग तो मराठमोळा केसरी मर्दानी फेटा असो, गुजराती वा मोरपंख़ी पंजाबी! फेटा घातला की पुरूषाचा भारदस्तपणा वाढतो. साडीच्या प्रात्यक्षिकानंतर फेटा बांधण्याचा कार्यक्रम झाला. एका गोऱ्या पुरूषाला व्यासपीठावर बोलाऊन

त्याला फेटा बांधण्यात आला. परंतु हा मराठमोळा फेटा नव्हता, तो होता पंजाबी! त्यामुळे मन कांहीसे नाराज झाले; परंतु किमान एक भारतीय कलाविष्कार गोऱ्या लोकांपुढे सादर केला गेल्याचा सार्थ अभिमान वाटला. फेटाधारी गोरा रुबाबात व्यासपीठावर फिरून खाली उतरला नि प्रेक्षकांनी त्याचंही टाळयांच्या गजरात कौतुक केलं.

अजूनही कार्यक्रम बाकी होता. रात्रीचे साडेआठ वाजले होते. उन्हाळयात तिथे रात्री नऊ वाजेपर्यंत लख्ख प्रकश दिसतो नि पहाटे चार वाजताच संधीप्रकाश दिसू लागतो. आम्हाला आता घरी परतने भाग होते. सभागृहाच्या दोन्ही बाजूला विविध भारतीय वस्तूनी स्टॉल सजले होते. एका बाजुला भारतीय पध्दतीचे तयार कपडे, साड्या, बांगड्या, विभुषणे, खेळण्या... एक ना अनेक! स्टॉलमधून वस्तूंचे प्रदर्शन वजा विक्री सुरू होती. दुसऱ्या बाजुला भारतीय खाद्यपदार्थ तयार करून त्यांची विक्री करण्यात येत होती. कामधंद्याच्या निमित्ताने भारतातून आलेले लोक आता अनिवासी भारतीय बनले होते.

भारतीय स्वातंत्र्य दिन व प्रजासत्ताक दिनही येथील अनिवासी भारतीय तेवढ्याच स्वाभिमानाने व उत्साहात साजरा करतात. या निमित्ताने विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करून भारतीय संस्कृतिचे दर्शन घडवितात. हॅलिफॅक्समध्ये स्वातंत्र्य दिनाच्या कार्यक्रमात उपस्थित राहून विदेशात रहाणाऱ्या स्वदेशी नागरिकांचा देशाभिमान प्रत्यक्ष पाहण्याची संधी मिळाली. परदेशात राहूनही या लोकांनी स्वदेश प्रेम टिकवून ठेवले आहे, हे पाहून त्यांचे कौतुक वाटले. आपली मातृभूमी कित्तेक कोस दूर असूनही मातृभूमीचे ऋण हे लोक विसरलेले नाहीत.

जन्मभूमीप्रमाणेच कर्मभूमीवरही त्यांची तेवढीच निष्ठा, प्रेम आहे आणि ते असलेच पाहिजे. ज्या भूमीने आम्हाला आधार दिला, उदरनिर्वाहाचे साधन मिळवून दिले, त्याच्याशी आम्ही कृतघ्न रहाणार नाही, असे सांगून १ जुलैचा कॅनडा दिनही तेवढ्याच उत्साहात आम्ही साजरा करतो, असे परमोद नावाच्या कॅनडास्थित मूळ पंजाबच्या एका अभियंत्याने सांगितले. त्यांच्या या जन्मभूमी आणि कर्मभूमीच्या प्रेम, स्वाभिमानाला सलाम !

# ६. कॅनडातील हिंदू मंदिरे




अध्यात्म ही भारतीयांची शक्ती, मानसिक स्वास्थ्य व आत्मिक बळ प्राप्त करून 0देणारे माध्यम!! जगात वैज्ञानिक क्रांती झाली तरी भारतीयांनी आपली अध्यात्माची परंपरा सोडलेली नाही. कॅनडात आलेल्या बहुसंख्य लोकांमध्ये पदवीधर, त्यातही तांत्रिक शिक्षण घेतलेल्यांची संख्या अधिक... नोकरीच्या निमित्ताने त्यांनी देश सोडला; परंतु आपली अध्यात्माची परंपरा त्यांनी कायम जतन केली.

मंदिर म्हणजे भारतीय संस्कृती आणि संस्काराचे केंद्र! भारतीय लोक जिथे, जिथे गेले तिथे त्यांनी मंदिरे उभारली, आपल्या देव-देवतांची प्रतिष्ठापना केली. आपल्या धार्मिक, आध्यात्मिक परंपरा जपल्या.

कॅनडात भारतीयांची संख्या तर लक्षणीय! त्यामुळे हिंदू मंदिर नाही असे शहर क्वचितच आढळेल.

कॅनडात आल्यापासून मंदिरात जाण्याचा योग आला नव्हता. त्यात सौभाग्यवती धार्मिक वृत्तीच्या. दर संकष्टीला मंदिरात जाऊन गणेशाचे दर्शन घेण्याचा

त्यांचा परिपाठ कायम होता. आता कॅनडात आल्यानंतर त्यात खंड पडेल, अशी त्यांना धास्ती वाटली.

'इथे कुठे गणेशाचे मंदिर आहे का?' तिने कन्येकडे सहज चौकशी केली. जावईबापूनी ते ऐकले नि लागलीच ते म्हणाले,

'मम्मी, उद्या आपण सारेच मंदिरात जाऊ. रविवारी इथल्या हिंदू मंदिरातून विशेष कार्यक्रम असतो.

जावईबापू व कन्या यांनाही रविवारची सुट्टी होती. ठरल्याप्रमाणे आम्ही हॅलिफॅक्समधील मंदिराशेजारी आलो. आपल्याकडे मंदिर म्हटले की त्याचा शोभून दिसणारा कळस व ईमारतीचा नमूनाही विशिष्ट्य प्रकारचा असतो. त्यामुळे हे मंदिर आहे हे कोणाला सांगावे लागत नाही; परंतु इथल्या मंदिराला कळस नव्हता किंवा भारतातल्या प्रमाणे मंदिराचा साज नव्हता. मात्र सुंदर, नीटनेटकी ईमारत मन वेधून घेणारी होती.

मंदिरासमोर स्वामी विवेकानंद यांचा पुतळा होता. अमेरिका, कॅनडातील लोकात स्वामी विवेकानंदांबद्दल आदराची भावना आहे. स्वामीजींच्या विचारांचा तत्त्वज्ञानाचा त्यांच्या मनावर प्रभाव आहे. शिकागोच्या धर्म परिषदेत स्वामीजींनी हिंदू धर्माची महती, हिंदू धर्मातील बंधुत्वाची भावना संपूर्ण जगाला पटवून दिली. त्यांच्या विचाराने प्रभावित झालेले असंख्य अनुयायी आजही केवळ अमेरिकेतच नव्हे, तर संपूर्ण अमेरिका खंडात आहेत. विवेकानंदांमुळेच हिंदू धर्माची खरी ओळख जगाला झाली.

या महामानवाच्या पुतळ्याचे दर्शन घेऊन आम्ही मंदिराच्या प्रार्थनागृहात गेलो. भव्य सभागृह! समोर गणेश, महालक्ष्मी, राधा-कृष्ण, भगवान शंकर, सिता-राम आदी देव-देवतांच्या मनोवेधक मुर्त्या विराजमान झाल्या होत्या. भटजींचा मंत्रोच्चार सुरू होता. सभागृहात मांडलेल्या खुर्च्यांवर हिंदू भाविक आसनस्थ झाले होते. सर्वत्र उदबत्तीचा आल्हादकारक सुगंध दरवळत होता. आम्ही रिकाम्या खुर्च्यांवर असनस्थ झालो. सभागृह भक्तांनी भरगच भरलेले! परंतु भटजींच्या मंत्रोच्चाराशिवाय सगळे कसे शांत व शिस्तबद्ध! इतकी निरव शांतता, स्वच्छता,

शिस्त आणि भक्तांमधील उत्कट भक्तिभाव भारतातील मंदिरात सुद्धा मी क्वचितच पाहिला असेन.

भटजींनी शास्त्रोक्त पद्धतीने पूजा पूर्ण केली. सर्वांना आरतीसाठी उभे राहण्याची सूचना आली.

‘सुखकर्ता, दुखहर्ता वार्ता विघ्नाची.’

या गणेशाच्या आरतीने प्रारंभ झाला. विविध देवतांच्या पाच आरत्या भक्तीपूर्ण वातावरणात, एक सूरात सामुहीकपणे गायल्या गेल्या. मंदिरातील वातावरण अधिक भक्तीमय बनले. त्यानंतर होता देवदर्शनाचा कार्यक्रम. सर्व भाविकांनी रांगेने जाऊन भक्तीभावे देवदर्शन घेतले. तीर्थ, प्रसादाचे वितरण झाले. तळमजल्यावरील हॉलमध्ये सर्वांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

भाविक रांगेने जाऊन महाप्रसादाचा लाभ घेत होते. महाप्रसाद देणारे भाविक आठ दिवस आधीच मंदिर व्यवस्थापनाकडे आपले नाव नोंदवितात. दर रविवारी असा कार्यक्रम असतो.

आठवडाभर आपल्या कामात व्यग्र असलेले भाविक रविवारी मंदिरात येऊन प्रार्थना करतात. त्यात विशेष करून अभियंत्यांचा सहभाग असतो. हे पाहून काहीसे आश्चर्य वाटले.

‘नव्या पीढीला देव-धर्म कांही उरलेलाच नाही,’

अशी नेहमीच ओरड ऐकू येते. परंतु येथे नेमकी उलट परिस्थिती आम्हाला पहायला मिळाली. आधुनिक विज्ञानाची त्यांनी कास धरली असली, तरी त्यांची अध्यात्मिक भावना कमी झालेली नाही, हेच यातून दिसून आले.

‘कॅनडात आलो तरी आम्ही आमची संस्कृती सोडलेली नाही. मंदिर हे देवाचे घर मानले जाते. आम्ही आठवडाभर काम हीच पूजा मानून आमच्या कर्तव्यात मग्न असतो. परंतू आठवड्याच्या शेवटी आम्ही मंदिरात येतो. येथे आल्यानंतर कामाचा ताणतणाव विसरून देवाच्या भक्तीत लीन होतो. त्यातून आमचे आत्मिक बळ वाढते, मानसिक स्वास्थ्य लाभते नि कार्यशक्तीही दुणावते. भक्तीत

मोठी शक्ती असते,' अशी भावना नरेश नावाच्या भारतीय अभियंत्याने आमच्याकडे बोलून दाखवली.

शिवाय आम्हाला इथे भेटतात स्वदेशी बांधव. त्यातून एकमेकांशी परिचय होतो. स्नेहभाव वाढीस लागतो, आम्ही एकमेकांच्या सुख-दु:खात सहभागी होतो, असे तो म्हणाला.

विदेशी संस्कृतीत वर्षानुवर्षे राहूनही या लोकांनी भारतीय, हिंदू संस्कृती जतन केली आहे. भारतीय आध्यात्माची भावना त्यांनी कायम जोपासली आहे, हे ऐकून आम्हाला धन्यता वाटली.

फिजीतील हिदू लोकांनीही कॅनडात अनेक हिंदू मंदिरे बांधली आहेत. डेल्टातील व्यंकटेश्वर महाविष्णू मंदिर याच समाजाने उभारले. आम्ही रहात असलेल्या ठिकाणापासून हे मंदिर अगदीच जवळ आहे. रोज सकाळी येथे भजनाचा कार्यक्रम होतो. आम्हीही या भजनात सामील होऊन तल्लीन होत असे. परंतु कोरोनामुळे आमचा हा आनंद फार काळ टिकला नाही. सरकारी आदेशमुळे मंदिराचे दरवाजे बंद झाले नि भाविकांच्या पदरी निराशा आली.

डेल्टातील साई मंदिरातही जाण्याचा आमचा नित्याचा कार्यक्रम असे, परंतु कोरोनामुळे हे मंदिरही भाविकांसाठी बंद झाले.

अशीच अनेक हिंदू देव-देवतांची मंदिरे मी टोरँटो, सरी, व्हँकुव्हरमध्ये पाहिली. युरोप, अमेरिका खंडातील देशात चर्चचा प्रभाव निश्चितच आहे, परंतु हिंदू लोकांनी आपली मंदिर संस्कृतीही कायम टिकवून ठेवली आहे, याचा आम्हाला कॅनडात अनुभव आला.

मंदिरांमध्ये भारतीय लोकांच्या गाठीभेटी झाल्या. बऱ्याच गोष्टींची त्यांच्याकडून माहिती मिळाली. कित्येक वर्षापासून हे लोक स्वदेशापासून दूर सातासमुद्रापार राहतात, तरीही त्यानी आपले भारतीयत्व सोडलेले नाही, आपल्या धार्मिक भावना, श्रध्दा त्यांनी अखंड जपल्या आहेत, याचा मला सार्थ अभिमान वाटला.

# ७. कॅनडातील भारत




**सरी (कॅनडा) बैसाखीतील एक दृश्य**

मी कॅनडातील विविध पर्यटन स्थळांना भेटी दिल्या. प्रत्येक ठिकाणी एखाद-दुसऱ्या भारतीय कुटूंबाची हमखास भेट व्हायची. तसा कॅनडा हा संमिश्र संस्कृतीचा देश. नवे जग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अमेरिका खंडातील विस्तारने सर्वात मोठ्या असलेल्या या देशात जगातील विविध देशांच्या लोकांनी येऊन वास्तव्य केले. येथे निर्विवादपणे गोऱ्या... इंग्रजांचे वर्चस्व असले, तरी चीनी व भारतीयांची संख्या निश्चितच नगन्य नाही. कॅनडातील हॅलिफॅक्स, सेंटजॉन, टोरेंटो, व्हँकुव्हर, सरी व डेल्टा शहरात मी कमी-अधिक काळ घालविला. मी जिथे, जिथे जाईन तिथे भारतीयत्व शोधण्याचा प्रयत्न करीत होतो. अधून-मधून भारतीय लोकांची भेटही व्हायची. त्यांच्याशी बोलून आपल्या माणसात आल्यासारखे वाटायचे. टोरेंटो, व्हँकुव्हर, सरी नि डेल्टा शहरात भारतीय, त्यातल्यात्यात पंजाबी लोकांची संख्या अधीक आहे. तिसऱ्या दौऱ्यात व्हँकुव्हरजवळील डेल्टा शहरात आम्ही रहात होतो. या शहरात ४० टक्के लोक भारतीयच आहेत. इथे फिरतांना प्रदेश वेगळा असला तरी, पंजाबी व हिंदी बोलणाऱ्यांची संख्या अधिक आढळून येते. येथील दुकानात,

हॉटेलमध्ये इंग्रजीबरोबरच हिंदीतही व्यवहार चालतात. त्यामुळे भारतातल्याच एका प्रांतात असल्यासारखे वाटले.

इथे रहाणारे लोक भाषा, प्रांतभेद विसरून भारतियत्वाच्या भावनेने एकत्र रहाताना दिसले. विदेशात राहूनही ते आपली संस्कृती जपतात. व्हँकुव्हर, सरी, डेल्टा परिसरात रहाणाऱ्या मराठी लोकांनी तर मराठी मंडळाची स्थापना केली आहे. संघटनेच्या माध्यमातून विदेशातही मराठीपण जपण्याचा त्यांचा प्रयत्न आहे.

पहिल्या भेटीतील पहिल्या आठवड्यात आम्ही हॅलिफॅक्समधील एका उपहारगृहात गेलो. एका भव्य व्यापारी संकुलात असलेल्या या उपहारगृहाचे नाव होते 'दी टेस्ट ऑफ इंडिया'! नावात कल्पकता नि दूरदृष्टी होती. भारतीय खाद्य संस्कृतीने उपहारगृहाची नाळ भारतीयांशी जोडली होती. एका भव्य हॉलमध्ये ग्राहकांना बसण्यासाठी टेबल, खुर्च्यांची व्यवस्थीत मांडणी केलेली. स्वच्छता व निटनेटकेपणा डोळयात भरण्यासारखा! मध्यभागी हॉल नि चारी बाजूना भारताच्या विविध प्रांतातील विविध खाद्यपदार्थांचे स्टॉल्स् .... सेल्फ सर्व्हीसचाच प्रकार! भारतातील विविध संस्कृत्या इथे एकत्र आल्या होत्या. कोणी होते मराठी, कोणी तमिळ, तेलगू, पंजाबी .... ! कॅनडातल्या भारतात आल्यासारखे वाटले.

टोरेंटो हे कॅनडातील सर्वात मोठे व औद्योगिक शहर. इथेही भारतीय व चीनी लोकांचीच संख्या अधिक. टोरेंटोत गेल्यानंतर त्याचा प्रत्यक्ष अनुभवही आला. शहरातील भारतीय वसाहतीच्या भागात आम्ही गेलो नि थक्कच झालो. इथे विदेशीपेक्षा भारतीय वातावरणच अधिक वाटले. बाजारपेठेतसुध्दा भारतीय पध्दतीची दुकाने थाटलेली! विदेशातील मॉल संस्कृती या भागात क्वचितच होती. रस्त्यावर, दुकानातून इंग्रजीपेक्षा हिंदी बोलणारे लोकच अधिक! येथील बॉंबे चौपाटी नावाच्या हॉटेलमध्ये आम्ही गेलो. खाद्यपदार्थ तर भारतीयच होते, शिवाय मालक, वेटर आणि ग्राहकसुध्दा हिंदीच बोलत होते. ऐकून बरे वाटले.

टोरेंटोमधील तीन दिवसाच्या वास्तव्यात फिरण्यासाठी आम्ही टॅक्सी केली. टॅक्सी चालक भारतीयच होता. २०-२५ वर्षापूर्वी इथे येऊन त्याचे कुटूंब स्थायिक

झाले होते. टोरेंटोमधील भारतीयांची निश्चित लोकसंख्या समजू शकली नाही, परंतु एकूण लोकसंख्येत त्यांचा वाटा निश्चितच नगन्य नाही. या शहराच्या आर्थिक प्रगतीत भारतीय लोकांचे मोठे योगदान आहे.

कॅनडातील वास्तव्यात मी अनेक गोष्टी पाहिल्या, जाणून घेतल्या. अनेक गोष्टी मला भावल्या, माझ्यावर प्रभाव टाकून गेल्या. परंतु जिथे जाईन तिथे माझं मन कांही तरी शोधीत होतं. नेमक काय हे उमगत नव्हत; परंतु पुढे हळुहळू सारं माझ्या लक्षांत आलं. ते कॅनडातील भारत शोधीत होतं.

प्राचीन काळापासून या नव्या जगताचा भारतांशी ऐतिहासिक संबंध असावा, असे मला सारखे वाटे. मात्र त्याचे नेमके कारण समजत नव्हते. भाषा बदलली की संस्कृती बदलते म्हणतात. मला इथे अगदी उलटा अनुभव आला. इंग्रजीच्या साम्राज्यात लोकांवर इंग्रजीचा प्रभाव निश्चितच आहे; परंतु भारतीय संस्कृतीला ते विसरलेले नाहीत. त्यांच्या नसानसात स्वदेशाभिमान आहे. कॅनडात फिरतांना अनेक भारतीयांशी गाठीभेटी झाल्या. त्यांच्या बोलण्यातून, कृतीतून स्वदेश प्रेम दिसून आले.

भारतात जात, धर्म, भाषाभेदातून अनेक वेळा संघर्ष होतात; परंतु इथे सगळे भेद विसरून केवळ स्वदेशीच्या भावनेतून सारे एकत्र येतांना दिसतात. संस्कृतीच्या माध्यमातून त्यांनी सहकाराची आणि संघटनेची भावना जोपासली आहे.

कॅनडात रहाणारे पाकिस्तानीसुध्दा भारतीयांशी तेवढ्याच आपुलकीने, आपली माणसे असल्याच्या भावनेतून रहातांना आढळून येतात, याचे कौतूक वाटते.

एक दिवस संध्याकाळी सौभाग्यवतींसह फिरण्यासाठी हॅलिफॅक्सच्या बीचवर गेलो. ऑगस्ट महिना होता, त्यामुळे अजून धरती गोठविणारी थंडी नव्हती. मात्र बोचरी थंडी अंगाला झोंबत होती. त्यात अटलांटिक महासागराच्या किनारपट्टीवर फिरण्यात एक आगळाच आल्हाद वाटायचा. गरम-गरम कॉफिचे घुटके घेत समुद्रकिनाऱ्यावरून फिरण्याची मजा कांही औरच!

तासभर टाईमपास केला नि घरी निघालो. चाळीशीतील एक सुंदर बाई आपल्या दोन मुलांसह आमच्या पुढे-पुढे जात होती. तिला पाहिल्यावर ती गोरीबाई नाही हे समजण्यास वेळ लागला नाही. भारतीय लोक कितीही गोरे असले तरी त्यांची ओळख लपत नाही. समोरची बाई भारतीय असावी असा माझा समज. आम्हाला पाहून ती थांबली नि कांहीशा सहानुभूतीच्या स्वरात म्हणाली,

'आर यु इंडियन ?'

भारतीय माणूस कुठेही गेला तरी त्याला भारतीयत्वाची ओळख करून द्यावी लागत नाही. त्यात माझ्या पत्नीने परिधान केलेली साडी हा भारतीयत्वाचा ट्रेडमार्कच होता. त्यामुळे आम्ही भारतीय असल्याचे ओळखण्यात अडचण येण्याचे कारण नव्हते. तिच्या प्रश्नावर मी म्हणलो,

'याऽ!'

त्याबरोबर ती हिंदीत बोलू लागली,

'अच्छा लगा अपको मिलके।'

'आप इंडियासे हो?' माझ्या प्रश्नावर तिने नकारार्थी मान हलविली नि म्हणाली,

'मै पाकिस्तानी हूं। लेकीन हम यहॉं इंडियन और पाकिस्तानी अपने आपको अलग नही मानते। भाई-बहन, भाई-भाई जैसेही रहते है।'

तिने कॅनडातील आपले बरेच अनुभव सांगितले. ऐकून बरे वाटले. हीच भावना पाकिस्तानमध्ये रहणाऱ्या लोकांमध्ये असती तर...

***

आम्ही सेंटजॉनमध्ये किल्ला (फोर्ट) पहायला गेलो होतो. सेंटजॉन नदीच्या शेजारी एका उंच टेकडीवर किल्याचे कांही अवशेष आहेत. टेकडीच्या पायथ्याजवळ एक शिलालेख दिसला. त्यावर 'इंडियन वार' असा कांहीसा उल्लेख आहे. तो वाचल्यानंतर भारताचा कॅनडाशी कांही ऐतिहासिक संबंध असावा असे वाटून गेले. हे "इंडियन वार' नेमके काय, याचा मी विचार करू लागलो. त्याविषयी जाणून घेण्याची तेवढीच उत्कंठा लागली. दोन दिवसानंतर कन्येसोबत सेंटजॉनच्या

सार्वजनिक वाचनालयात जाण्याचा योग आला. वाचनालयात कॅनडाच्या प्राचीन ईतिहासाच्या तीन सीडी (चित्रफीत) मिळाल्या. हॅलिफॅक्समध्ये गेल्यानंतर तिथल्या वाचनालयातून कॅनडाच्या प्राचीन इतिहासाची दोन पुस्तकेही आनली. सीडी पाहून व पुस्तक वाचून कांही गोष्टींचा मला उलघडा झाला.

कोलंबस समुद्रमार्गे भारताला यायला निघाला; पण योगायोगाने तो अमेरिका खंडाच्या किनारपट्टीवर येऊन पोहोचला. त्याने एका नव्या खंडाचा शोध लावला म्हणून लोक या खंडाला नवे जग म्हणू लागले. अमेरिका खंडाच्या शोधानंतर जगातल्या सगळ्याच देशातून..., बहूसंख्येने युरोपमधून लोक येऊन इथे स्थायिक झाले. परंतु त्याआधी कॅनडासह अमेरिका खंडात कांही आदिवासी लोक रहात होते. हेच अमेरिकेचे मूळ रहीवासी आहेत. ते भारत, आशिया व अफ्रिकाखंडातून आले असावेत, असा इतिहासकारांचा कयास आहे. कोलंबस इथे आला, तेंव्हा हा भारत देश असावा असे त्याला वाटले. म्हणूनच त्याने या मूळ रहीवाशांना ‘इंडियन' असे संबोधिले, असे येथील इतिहासकार म्हणतात. या मूळ रहीवाशांशी म्हणजेच इंडियन लोकांशी बाहेरून वास्तव्यास आलेल्या लोकांना संघर्ष करावा लागला. याचाच कॅनडाच्या इतिहासात ‘इंडियनवार' असा उल्लेख आहे.

इतिहास कांही असो, कॅनडा हे भारतीय लोकांचे आकर्षण ठरले आहे, हेच खरे!

***

डेल्टा शहर व्हँकुव्हर लगतचाच उपनगरी भाग. ब्रिटिश कोलंबिया (बीसी) राज्यातील व्हॅंकुव्हर एक महत्वाचे शहर. अमेरिकेची (युएस) उत्तर सीमा इथून कांही मिनिटाच्या अंतरावर आहे. निसर्ग सौंदर्याने नटलेल्या या शहराला ‘गार्डनसिटी' म्हणूनच ओळखले जाते. हे शहर भारतीयांचे, त्यातल्यात्यात पंजाबी लोकांचे मोठे आकर्षण ठरले आहे.

व्हॅंक्कुव्हर शेजारच्च्या 'सरी' नि 'डेल्टा' भागात भारतीय व त्यातही पंजाबी लोक मोठ्या संख़्येने राहतात. माझी कन्या संतोषी सध्या डेल्टा मध्येच रहाते. त्याच्या शेजारीच सरी आहे. सरी व डेल्टा म्हणजे भारतीय लोकांची त्यातल्या त्यात पंजाबींचीच जणू वसाहत. त्यामुळे बहूतेक आस्थापनावर इंग्रजीबरोबरच पंजाबीतही फलक लावलेले दिसतात. इथल्या लोकांची व्यवहारी भाषा इंग्रजी असली तरी बहूतेक लोक पंजाबी व हिंदीही बोलतात. त्यामुळे या भागात फीरताना भाषेची अडचण येत नाही. पंजाबी लोकांचे व्यक्तीमत्व, त्यांचा खास बनावटीचा पोशाख, डोकीवरची वैशिष्ट्यपूर्ण पगडी, स्त्रीयांचा पंजाबी ड्रेस याचे खास असे वैशिष्ट्य आहे. किंबहूना ती त्यांची ओळखच आहे. ते कुठेही गेले तरी आपली ओळख त्यांनी गमविलेली नाही. आम्ही सरी, डेल्टात सगळीकडे फिरलो, पंजाबी व अन्य भारतीय लोक अणि त्यांनी चालविलेले उद्योग, व्यवसाय येथे जागोजागी पहायला मिळतात. गोरे किंवा चीनी लोक इथे क्वचितच दिसायचे. आम्ही या भागात फिरायला गेलो की लोक आम्हाला पाहून हिंदीत बोलायचे.

इंडिया मे कहांके रहनेवाले हो ?

असा त्यांचा हमखास प्रश्न असायचा. आम्ही सहज इथल्या मॉलमध्ये गेलो. भारतातले सगळे पदार्थ इथे विक्रीसाठी उपलब्ध होते. दुकानातून इंग्रजीबरोबरच हिंदीही बोलली जात होती. मॉलमध्ये फिरताना एखाद-दुसऱ्या मराठी कुटूंबाचीही हमखास भेट व्हायची. या भागात भारतीय लोकांची संख्या अधिक असल्याने व्हँकुव्हरला नव्याने येणारे भारतीय लोक रहाण्यासाठी सरी, डेल्टाचीच निवड करतात.

व्हँकुव्हर परिसरात रहाणाऱ्या मराठी लोकांनी तर मराठी मंडळही स्थापन केले आहे. वेळोवेळी ते विविध कार्यक्रमांचे आयोजन करतात. त्यानिमित्ताने एकत्र येतात नि आपल्या संस्कृतीचे प्रदर्शन करतात.

२०२० च्या फेब्रुवारीमध्ये मी कन्येला भेटण्यासाठी पुन्हा कॅनडाला गेलो, त्यावेळी व्हँकुव्हरच्या मराठी मंडळाने रौप्य महोत्सव साजरा करण्याचा निर्णय

घेतला होता. परंतु देशभरात पसरलेल्या कोरोनाव्हायरसच्या महामारीमुळे कार्यक्रम रद्द करावा लागला.

सरीमधील बैसाखी उत्सवाचे खास आकर्षण असते. दुसऱ्या भेटीत या उत्सवाचा आनंद लुटता आला. व्हँकुव्हर, सरीमध्ये होणाऱ्या या उत्सवात केवळ शीखच नाही, तर इतर भारतीय आणि गोरे लोकही सहभागी होतात, कार्यक्रमाचा आनंद लुटतात. भारताबाहेर ईतक्या भव्य प्रमाणात होणारा हा एकमेव कार्यक्रम असेल. यावेळी सुशोभित फ्लोट्सची मिरवणूक काढण्यात येते, संगीताची त्याला साथ असते. रंगींबेरंगी कपडे परिधान करून लोक मिरवणुकीत उत्साहाने भाग घेतात. पवित्र गुरु ग्रंथसाहिबाची भक्तीभावाने मिरवणुक काढण्यात येते.

या कार्यक्रमाचे खरे नाव नगर कीर्तन आहे, याचा अर्थ रस्त्यावर वाद्य वाजवून निर्मात्याचे सवाद्य गुणगाण करणे असा होतो. हा एक आध्यात्मिक व धार्मिक मेळावा आहे.

अन्नदान हे या कार्यक्रमाचे वैशिष्ट! अन्न देणे ही लंगरची परंपरा आहे. सर्वजण समान पातळीवर एकत्र येऊन नम्रपणे अन्नदानाचा लाभ घेतात. सामाजिक मतभेद बाजूला ठेऊन कार्यक्रमात सहभागी होतात. आम्हीही त्याचा एक घटक बनलो व बैसाखीचा प्रसाद समजून अन्नदानाचा लाभ घेतला.

सरीत पंजाबींचा मोठा दबदबा आहे. गोरे लोक इथे यायला घाबरतात असे कुणीसे सांगितले. परंतु त्यांची दहशत वाटावी असा अनुभव मला तरी या भागात कुठेच जाणवला नाही. कॅनडात पंज़ाबी लोक इतक्या मोठ्या संख़्येने असण्याचे कारण मला समजले. माजी पंतप्रधान इंदिरा गांधींची हत्या झाल्यानंतर भारतात शिखांवर हल्ले होऊ लागले. त्यावेळी शिख लोकांनी मोठ्या संख़्येने कॅनडात स्थलांतर केले आणि ते इथेच स्थायिक झाले, असा इतिहास आहे. कारण कांही असो, पंज़ाबींची संख़्या कॅनडात लक्षणीय आहे, हे विसरून चालणार नाही. इंडिया म्हणजे पंजाबी अशीच सर्वसाधारण ओळख इथल्या लोकांना आहे.

# ८. सीएन टॉवर ...एक आधुनिक आश्चर्य!



मे महिन्यात कॅनडातील वातावरण आल्हादकारक होते. उन्हाळ्याला नुकताच सुरवात झालेली; पण आपल्याकडे असते तशी उष्णतेची तीव्रता नव्हती. उबदार हवामान आम्हा पती-पत्नीना चांगले मानवले. त्यामुळे कॅनडाला जाण्यापूर्वीची भिती मनातून पार निघून गेली. स्वच्छ, सुंदर वातावरणात मन रमून गेले होते. सुंदर निसर्गाने मनाला भुरळ घातली होती. उन्हाळा असला तरी अधून-मधून पावसाच्या सरी यायच्या नि पुन्हा ऊन पडायचे...भारतातल्या श्रावणासारखे वातावरण! त्यामुळे बाहेर फिरण्यात मोठी मौज वाटायची.

मी कन्येच्या घरी हॅलिफॅक्स मध्ये रहात होतो. मोठमोठी सरोवरे, तीन्ही बाजूनी पसरलेला विस्तीर्ण अटलांटिक महासागर, हॅमलॉक नि पॉईंट प्लीझंटसारखे सुंदर व हिरवेगार पार्क, पर्यटकांनी गजबजलेले बंदर....सगळ्या गोष्टी कशा मनाला रमविणाऱ्या नि खुलविणाऱ्या होत्या. बीचवर फिरण्याची मजा तर औरच! महासागरातील लाटांचा लपंडाव, नौकाविहार करणारे पर्यटक, महासागरात दूरवर तरंगत जाणारे एखाद-दुसरे जहाज, तेवढ्याच आनंदात समुद्रावर हवेत घिरट्या

घालणारे समुद्र पक्षी नि किनाऱ्यावरील रंगीबेरंगी जनसागर ... साऱ्या गमती-जमती पहाण्यात वेळ आनंदात निघून जायचा. त्यामुळे साडेतीन महिने कसे गेले समजलेच नाही. नोव्हास्कोशिया आणि न्युब्रुन्सविक प्रांतातील पर्यटनस्थळं पाहून मनाचा विरंगुळा तर झालाच, शिवाय ज्ञानातही भर पडली. मन प्रसन्न व प्रभावित झाले होते.

कॅनडाला येताना एका मित्राने सहज सल्ला दिला –

‘कॅनडाला निघालाच आहेस तर नायगारा धबधबा आणि टोरेंटो शहर जरूर पाहून ये.'

पण नेमक्या याच स्थळांना अजून जायचे राहिले होते. ही दोन्ही ठिकाणं ओंटारिओ प्रांतात येतात. हॅलिफॅक्सहून टोरेंटो सुमारे १,२६४ किलोमीटरवर आणि त्याच्यापुढे सुमारे १३० किलो मीटरवर नायगारा धबधबा. मी कन्येला या स्थळांबाबत सहज म्हणालो नि तिने विमानाचे तिकीट बुक करून टाकले.

अडीच तासाच्या विमान प्रवासानंतर टोरेंटोला येऊन पोहोचलो. प्रथमदर्शनीच शहराची भव्यता, स्वच्छता मनाला भावली. ही कॅनडाची राजकीय राजधानी नसली तरी आर्थिक राजधानी म्हणून ओळखली जाते. टोरेंटो म्हणजे कॅनडाचं वैभवच! इथे पोहोचताच मला प्रकर्षाने आठवण झाली ती मुंबईची! अनेकबाबतीत टोरेंटो म्हणजे कॅनडाची मुंबई असेच वाटून गेले. मुंबईची गर्दी इथे दिसणार नाही; परंतु उद्योग, व्यापार आदीबाबतीत या शहराचं मुंबईशी बरच साम्य आहे. इथले सुंदर व भव्य रस्ते, विस्तीर्ण ओंटारिओ सरोवर, टोलेजंग इमारती... साऱ्या गोष्टी नवख्या पर्यटकांचे लक्ष वेधून घेतात.

नायगारा म्हणजे निसर्गाचा अद्भुत चमत्कार, तर टोरेंटोतील शिल्पाकृती... त्यातल्यात्यात सीएन टॉवर म्हणजे मानवाच्या बुद्धिकौशल्याचा साक्षात्कार! सोन्याच्या अंग़ठीत हिरा शोभून दिसावा, त्याप्रमाणे सीएन टॉवर टोरेंटोच्या वैभवात भर घालणारा एक कृत्रिम हिराच!

कॅनडाचा इतिहास, संस्कृती आणि आधुनिक प्रगतीचे चित्र या शहरात पहावयास मिळाले. उत्तर अमेरिका खंडातील हे चौथ्या क्रमांकाचे व कॅनडातील

प्रथम क्रमांकाचे मोठे शहर. ओटावा कॅनडाची राजधानी असली तरी टोरेंटोचे स्थान देशाच्या इतिहासात वेगळेच आहे. टोरेंटो ....ओंटारिओ प्रांताची राजधानी तर आहेच, शिवाय कला, संस्कृती आणि प्रगतीचे माहेरघर म्हणून या शहराची ओळख आहे. या सगळया गोष्टी खऱ्या असल्या तरी शहराच्या वैभवात भर घातली आहे ती सीएन टॉवरने. मला टोरेंटो शहराचे आकर्षण वाटण्यामागे आनखी एक कारण होते नि ते म्हणजे इथली भारतीयांची लक्षणीय लोकसंख़्या. या शहराच्या जडण-घडणीत भारतीयांचा सिंहाचा वाटा आहे.

शहरातल्या पर्यटन स्थळांना भेट देण्यासाठी खासगी यात्री बसची व्यवस्था आहे. आम्ही डबलडेकर यात्री बसमधून शहरातील पर्यटनस्थळे पहायला निघालो. बसच्या वरच्या भागाचा टॉप (छत) खुलाच होता. त्यामुळे शहराचे मुक्त दर्शन घेण्यात कोणतीच अडचण नव्हती. शहरातील महत्वाच्या व उंच इमारतीची माहिती बसमधील गाईड ध्वनिक्षेपकावरून देत होता. महत्वाची पर्यटनस्थळे पहाण्यास प्रवाशाना वेळ देण्यात येत होती.

गगनभेदी इमारती सर्वांचे लक्ष वेधून घेत होत्या. गाईड त्यांचे महत्व विषद करीत होता. फर्स्ट कॅनेडियन प्लेस (११६५ फूट), कॉमर्स कोर्टवेस्ट (९४२ फूट), ट्रंपइंटर नॅशनल हॉटेल अँड टॉवर (९०८ फूट), स्कोशिया प्लाझा (९०२ फूट), टीडी कॅनडा ट्रस्ट टॉवर (८६२ फूट), टोरेंटो डोमिनियन बॅंक टॉवर (७३२ फूट) अशा एकापेक्षा एक टोलेजंग व ऐतिहासिक इमारती प्रेक्षकांना आकर्षित करीत होत्या. पण मला ओढ लागली होती ती सीएन टॉवर पहाण्याची !

आमची यात्री बस टॉवरच्या शेजारी थांबली नि आम्ही धावतच गेलो. ती गगनचुंबी इमारत पाहून प्रथमदर्शनीच आश्चर्याचा धक्का बसला. इमारत जमीनीपासून वरपर्यंत भाल्याप्रमाणे निमुळती होत गेलेली! तिचे उंच गेलेले शेवटचे टोक पहातांना डोकीवर टोपी असती तर ती निश्चितपणे खाली पडली असती.

‘वंऽडरफुल!'

शेजारचा गोरा एकदम उद्गारला. त्याबरोबर त्याच्याकडे माझे लक्ष गेले. माझ्याकडे पाहून तो पुन्हा म्हणाला,

'रियली, वंडरफुल स्कील ऑफ आर्किटेक्चर!'

'य्याऽ!'

मी प्रतिसाद दिला. त्याच्या बोलण्यात तथ्य होते. मानवाच्या बुद्धीकौशल्याचा हा एक अद्भुत नमुनाच होता. बाहेरून इतके कुतुहल निर्माण करणारी ही इमारत आतून कशी असेल? टॉवरच्या उंच टप्प्यावरून शहर व परिसर कसा दिसत असेल?... कल्पनेत रमण्यापेक्षा प्रत्यक्ष अनुभव घेण्याची ओढ लागली.

तिकिट काढून आम्ही रांगेने आत जाऊ लागलो. आत सोडताना सर्वांची कडक तपासणी करण्यात येत होती. सुरक्षेच्यादृष्टीने ते आवश्यकही होते. आम्ही तळ मजल्यावर आलो. त्याची भव्यता नि अंतर्गत रचना नवलाईने पहातच राहीलो. बाहेरून इवलासा वाटणारा तळमजला किती विस्तीर्ण! अंतर्गत रचना म्हणजे शिल्पकलेचा एक चमत्कार! गोलाकार वळणे घेत, तळघरातील विविध व आकर्षक स्टॉल्स पहात आम्ही वरच्या मजल्यावर गेलो. इथून वर जाण्यासाठी लिफ्टची व्यवस्था आहे. त्यातून थेट ३४६ मीटरवर (११३५.१७ फूट) असलेल्या स्कायपॉडवर आम्ही जाऊन पोहोचलो.

गोलाकार स्कायपॉडवर पर्यटकांची मोठी गर्दी होती. सारेच कुतुहलाने बाहेरचा परिसर पहात होते. मी सहज खाली नजर टाकली, तोच छातीत धस्सऽऽ झाले. तसे घाबरण्याचे कारण नव्हते. स्कायपॉडला सुरक्षित जाळी व काचेचे आवरण आहे. त्यामुळे कुणी खालीपडण्याची शक्यता नाही. गोलाकार स्कायपॉडवरुन सभोवतालचा परिसर पहात एक फेरी पूर्ण केली. शहराचे अनोखे दृश्य मनाला प्रसन्न करीत होते. याच टप्प्यावर हॉरिझोन रेस्टॉरंट आहे. याच्या खालच्या मजल्यावर ग्लास फ्लोअर (काचेच्या फरशा) व आऊट डोअर स्कायटेरेस बसविण्यात आले आहे. सीएन टॉवरचे हे एक वैशिष्ट्यच मानावे लागेल.

ग्लास फ्लोअर हा एक चमत्कार आहे. स्कायपॉडच्या कांही भागावर फरशी बसवावी त्याप्रमाणे काच बसविलेली आहे. मात्र त्याच्या खाली कशाचाच आधार नाही. या पारदर्शक काचेतून थेट जमीनीवरील इवलीसी घरे व रस्त्यावरून धावणारी वाहने नजरेस पडतात. काच फूटली तर....कल्पना न केलेलीच बरी ! पण गेली चार दशकं असा कोणताच प्रकार घडलेला नाही. काच आहे तशीच आहे. लोक बेदिक्कतपणे त्यावर नाचतात, बसतात, झोपतात नि कौतुकाने फोटो घेतात. पारदर्शक काचेमुळे त्यावर बसलेले लोक अधांतरी असल्यासारखे वाटायचे. आम्हीही त्याचा अनुभव घेतला. ग्लास फ्लोअर हे सीएन टॉवरमधील एक आश्चर्यच आहे.

टॉवरची एकूण उंची १,८१५ फूट (५५३ मीटर) असली तरी १,४६५ फूटावर (४४७ मीटर) स्कायपॉडचा दुसरा विशेष टप्पा आहे. तेथे जाण्यासाठी वेगळे तिकिट घ्यावे लागते. लिफ्टने आम्ही तिथेही गेलो. जमीनीपासून एवढ्या उंचीवर येण्याची आमची ही पहिलीच वेळ होती. महत्प्रयासानंतर ८,८४८ मीटर उंचीचे एव्हरेस्ट शिखर गाठल्यानंतर शेरपा तेनसिंगला झाला नसेल इतका आनंद आम्हाला झाला. खाली चौफेर नजर टाकली, तोच मनात धस्सss झालं. सौभाग्यवतीना तर चक्करच आली. पण सुरक्षा काचेमुळे खाली पडण्याची भिती नव्हती. तसा तिला धीर दिला नि तिच्या मनातली भिती घालविली. सभोवार टोरेंटो शहराच एक अनोख दृश्य पहायला मिळालं. जमीनीवरून दिसणाऱ्या टोलेजंग इमारती टॉवरवरून इवल्याशा वाटत होत्या. रस्त्यावरून धावणाऱ्या कारगाड्या खेळण्यातल्या गाड्या प्रमाणे दिसायच्या.

बाजूलाच असलेल्या विस्तिर्ण ओंटारिओ सरोवराच्या मध्यभागी सुंदर छोटे बेट होते, पाचूच्या बेटासारखे ते सुंदर नि तितकेच मोहक.... सारेच कसे मनाला वेड लावणारे!

बाकीच्या तीन दिशांना पसरलेली शहराची व्याप्ती तितकीच मनोवेधक! टॉवरवरून नायगारा धबधब्याचे विलोभनीय दृश्य नजरेस पडतं. परंतु ढगाळ

वातावरणामुळे आम्हाला त्याचा आनंद लुटता आला नाही. त्यामुळे मन कांहीसं खट्टू बनलं.

टॉवरच्या सभोती फिरून नयनरम्य दृश्य न्याहळण्यात बराच वेळ निघून गेला. मध्येच पावसाची रिमझिम आली नि आकाशातला काळा पडदा बाजूला हटला. एव्हाना सूर्यपश्चिमेला झुकला होता. मावळतीला सोनेरी किनार आली... आकाशाच्या अंगणात संध्येने सोनेरी सडा घालावा तशी! सुर्याचे रसरसशीत लालबिंब शहरापलिकडच्या डोंगरावरील गर्द वृक्षराजीला जणु प्रेभराने अलिंगण देत होते. शेजारच्या सरोवरातील आरशात न्याहाळून संध्या आपली शृंगार साधना करू लागली. स्वच्छ पाण्यातील सूर्याचे स्पष्ट प्रतिबिंब संथ लाटांबरोबर हिंदोळया घेताना रमणीय वाटायचे. या विलोभनीय दृश्यावरून नजर हटत नव्हती. एवढ्यात सूर्य ढगाआड लपला नि पूराच्या पाण्यासारखा काळोखही दाटू लागला. क्षितीजाची कडा काळया रंगाने साखळली. निसर्गाचे मनोवेधक दृश्य कुठल्याकुठे अदृश्य झाले. त्याबरोबर सभोवतालच्या निसर्ग सौंदर्यावर खिळून राहीलेली नजर बाजूला हटली.

आता माघारी परतण्याच्याच तयारीत होतो, तोच स्कायपॉडच्या खाली सहज नजर गेली नि एक थरारक दृश्य पाहून मनाचा थरकाप झाला. टॉवरच्या एका अरुंद काठावरून कांही लोक बेद्दिकत फिरतांना दिसले नि छातीत धस्सऽऽ झालं. टॉवरच्या खाली सहज नजर गेली तरी कमकुवत मनाचा माणूस बेशुध्द होऊन पडेल, इथे तर हे लोक टॉवर भोवती असलेल्या इवल्याशा काठावरून फिरत होते. एखाद्याचा तोल जाऊन खाली पडलाच तर.... प्रथम दर्शनी हे एक अविचारी साहस असल्याची भावना झाली. पण यात धोका असता तर आयोजकांनी तो स्वीकारलाच नसता असाही मनात विचार येऊन गेला.

ते खरेच होते. हा एक ‘एज्य वाकींग'चा प्रकार आहे. त्यात सुरक्षेच्या उपाययोजना असल्या तरी ‘येरा-गबाळयाचे हे काम नव्हे' हेच खरे! साहस दाखऊ इच्छिणाऱ्या धाडशी प्रवाशांसाठी दीडफूट रुंद काठावरून टॉवरच्या सभोती मुक्तपणे फिरण्याचा (एज्य वाक) हा एक अनोखा कार्यक्रम! ३६५ मीटर (११९७.५० फूट) उंचीवरचा हा प्रयोग धोक्याचा नसला तरी तेवढाच धाडशी आहे. एवढ्या उंचावरून

खाली पाहिले तरी चक्कर येईल, मग चालत जाणे तर बाजूलाच. अर्थात या कार्यक्रमात भाग घेणाऱ्या लोकांच्या कमरेला सुरक्षा दोरीने बांधलेले असते. त्यामुळे खाली पडण्याचा धोका नसला तरी मनाची तयारी मोठी असावी लागते. हा प्रयोग पाहूनच आम्ही गर्भगळीत झालो, मग भाग घेणे बाजूलाच!

टॉवरच्या ३५१ मीटर उंचीवर रेस्टॉरंट आहे. येथे भोजनाचा अस्वाद घेणाऱ्या प्रवाशानां सभोवतालच्या भव्य व सुंदर शहराचे दर्शन घेत एक आगळी मौज लुटता येते. सुमारे दीडतास आम्ही या साऱ्या गोष्टींचा आनंद लुटला नि शेवटी लिफ्टमधूनच तळमजल्यावर आलो. तिथे टॉवरसंबंधी एक माहितीपट पडद्यावर दाखविण्यात येत होता. त्यातून टॉवरची बरीच माहिती मिळाली. १९७३ मध्ये टॉवरच्या बांधकामाला सुरवात झाली. १९७५ मध्ये तो बांधून पूर्ण झाला. यासाठी सुमारे ४० महिन्याचा कालावधी लागला. १,५३७ कामगार इमारतीच्या पूर्णत्वासाठी रात्रं-दिवस कष्ट घेत होते, झटत होते. १९७६ पासून तो लोकांसाठी खुला झाला. १९७५ मध्ये जगातील सर्वात उंच इमारत म्हणून गिनिज पुस्तकातही त्याची नोंद झाली. (अर्थात पुढील काळात कांही टॉवरनी ही उंची मागे टाकली आहे.) 'अमेरिकन सोसायटी ऑफ सिव्हील इंजनिअर्स' संस्थेने १९९५ मध्ये अधुनिक जगातील सातवे आश्चर्य म्हणून सीएन टॉवरला जाहीर केले.

कॅनडातील १६ दूरदर्शन, एफएम आकाशवाणी आदी संपर्क माध्यमांचे हे प्रमुख केंद्र आहे. टोरेंटोला जाऊन शिल्पकला क्षेत्रातील हे आश्चर्य न पहाता येणं म्हणजे अरसिकताच ठरेल. शहराच्या कोणत्याही भागातून हा टॉवर स्पष्टपणे दिसतो. कॅनडा वासियांना जसा या वास्तूचा अभिमान आहे, तेसेच ते त्यांचे प्रेरणास्थानही आहे. टॉवरमधून आम्ही बाहेर आलो नि कांहीतरी वेगळं पाहिल्याचा मनाला आनंद झाला. शिल्पकलेचा एक विलक्षण नमुना नि तिथला अनोखा अनुभव मनात कायमचा घर करून राहीला आहे.

# ९.शतकाचा साक्षीदार!



कॅनडाच्या दोन्ही बाजूला पसरलेले विस्तीर्ण महासागर, किनारपट्टीवरील वैविध्यतेने नटलेली पर्यटनस्थळं, देशाच्या अंतर्भागातील शांत सरोवरं, गावाबाहेर नजरेपार पसरलेले हिरवेगार व उंच वृक्ष, शहरातील टोलेजंग व मनोवेधक इमारती, स्वच्छ, सुंदर रस्ते, त्यावरनं तेवढ्याच संथगतीने एका मागून एक धावणारी वाहानं, तितकेच सौजन्यशील नि कृतीशील लोक!.... सगळच कसं विलोभनिय! मनाला भुरळ घालणारं! नवख पण आपलसं वाटणारं!

कॅनडात मी जे पाहिलं, अनुभवलं ते कधीच विस्मृतीत जाणारं नव्हतं! मी जेंव्हा एकांतात बसतो तेंव्हा एक-एक गोष्ट माझ्या नजरेसमोरून तरळू लागते. माझ्याशी बोलू लागते. तिथल्या निसर्गाची किमया व निसर्गाशी अनुरूप मानवनिर्मित कलाकृती मनाला भुरळ घालतात, एक अनोखा आनंद देऊन जातात. त्यापैकीच एक अविस्मरणीय पर्यटनक्षेत्र म्हणजे अटलांटीक महासगराच्या

किनारपट्टीवरील पेगीची खाडी (पेगीज कोव्ह) व शतकाचा शाक्षिदार ठरलेले तिथले लाईट हाऊस!

महासागराचं आक्राळविक्राळ रूप पहायला मिळालं ते नोव्हास्कोशियातील पेगीज कोव्ह इथे. हॅलिफॅक्सच्या नैऋतेला अटलांटिक महासागराच्या किनारपट्टीवरील हे छोटसं गाव. ४३ किलोमीटर अंतर कापून तासाभरात आम्ही इथे येऊन पोहोचलो नि महासागराचं महाकाय रूप पाहून थक्कच झालो. किनाऱ्यापासून नजरेच्या पलिकडे सारे पाणीचपाणी! महासागराला किनाऱ्याची मर्यादा नसती तर...? वास्तवात असे घडत नाही, हेच बरे, नाहीतर...? कल्पना न केलेलीच बरी! पर्वताच्या उंची एवढ्या उसळणाऱ्या लाटा, त्यांना तेवढ्याच समर्थपणे थोपविणारी पाषाणाची किनारपट्टी, किनारपट्टीवरील लहान-मोठ्या बोडक्या खडकाळ टेकड्या, उंच टेकडीवर उभा राहून सागराच्या हालचाली पहाणारा शतकाचा साक्षिदार... लाईटहाऊस! निसर्गाचा हा चमत्कार पाहून मन थरारलं नि त्याच्या किमयेचं कौतूकही वाटलं.

आम्ही महासगराच्या किनाऱ्यावर पोहोचलो. निसर्गाचं ते अदभूत दृश्य पाहून थक्कच झालो. समोर अथांग पसरलेला सागर नि त्याला तितक्याच ताकदीने थोपवून धरलेली पाषाणाच्या टेकड्यांची किनारपट्टी! टेकडीवर झाडा-झुडपांचा कुठे मागमुसही नव्हता. अशी किनारपट्टी मी प्रथमच पहात होतो. जितकी सुंदर तितकीच धोकादायक.... टेकडीवर बसून महासागराचा खेळ पहाण्यात मन रमून जाईल; परंतु थोडीशी बेपर्वाईसुद्धा माणसाचा कर्दनकाळ ठरेल!

आम्ही पोहोचलो तेंव्हा महासागर कांहीसा शांत होता. निळसर संथ लाटा किनारपट्टीला येऊन हळूवारपणे बिलगत होत्या. प्रियकराच्या मिलनासाठी आसुसलेल्या प्रियसीने प्रेमभराने मिठी मारावी, अगदी तशाच. पण पाषाण हृदयी, भावनाहीन किनारा...पाषाणच तो! त्याला कशा समजणार तिच्या अंतरीच्या भावना! तेवढ्याच निष्ठूरपणे तो त्यांना दूर लोटीत होता. त्यामुळे प्रेमभंगाने अश्रु ढाळीत त्या पुन्हा सागर मातेच्या पोटात विलीन होत होत्या.

उथळ खडकावरून पाय सावरीत आम्ही हळुवारपणे पाण्याजवळ गेलो. किनारपट्टी लगतचा समुद्राचा तळ उथळ नव्हता, अंतही लागणार नाही इतका खोल! त्यामुळे पाण्यात पाऊल टाकणे तितकेच धोक्याचे होते. मग सागराच्या पाण्यात जाण्याचे साहस करणार कोण? मंद लाटांचा पाठ शिवणीचा खेळ पहात आम्ही तिथेच बसलो. बऱ्याच दिवसानंतर आकाश निरभ्र होते. डोकीवर सूर्य तळपत होता; परंतु सागरावरून येणाऱ्या थंड वाऱ्यांमुळे ऊन चांदण्यासारखे शीतल भासत होते.

पर्यटकांची बरीच गर्दी होती. सागरातील आणि किनाऱ्यावरील गमती-जमती पहाण्यात वेळ केंहा निघून गेला समजलेच नाही.

दुपार टळून गेली. अचानक सूर्य ढगाआड लपला. घोंघावणारा वारा जमीनीच्या दिशेने सुसाट वाहू लागला. त्याबरोबर महासागरातही खळबळ माजली. आतापर्यंत शांत असलेला रत्नाकर उसळ्या घेऊ लागला. लाटांनी उचल घेतली. लाटा तांडव करीत पुढे येऊ लागल्या, बघता-बघता त्या डोंगरा एवढ्या झाल्या.

त्या जेवढ्या गतीने येत; पाषाणहृदयी किनारा तेवढ्याच निष्ठूरपणे त्यांचा कडेलोट करी. प्रेमभंगामुळे बेभान झालेला महासागर लाटांना उचलून किनाऱ्यावर जोराने आपटीत होता. एव्हना एक भली मोठी जोराची लाट आली व खडकावर आदळली. त्याबरोबर तिची झालेली ठिकरे आमच्या अंगावर येऊन पडली. आम्ही सारे भितीने मागे हटलो.

कारवारला असतांना लाटांचे पाणी मी कित्तेक वेळा आंगावर झेलले होते, लाटेबरोबर पाण्यात पडून गटांगळयाही खाल्या होत्या. किंबहूना त्यात मोठी मौज वाटायची! पण तिथे समुद्र किनारा उथळ असल्याने धोका कमी. इथे नेमकी उलट परिस्थिती. काठावर उंच खडक आणि खाली खोल समुद्र! त्यामुळे पाण्यात जायचा प्रयत्न करणे म्हणजे धोका ओढवून घेण्यासारखेच! मन कांहीसे निराश झाले. महासागराचं ते आक्राळविक्राळ स्वरूप मी प्रथमच पहात होतो. पाहून भितीयुक्त आनंदही वाटला!

माजलेल्या हत्तीप्रमाणे महासागर अजूनही किनाऱ्यावर धडक्या देत होता. क्रोधाने फेसाळत होता. टेकड्यांच्या माथ्यावर उभे राहून लोक समुद्राचं हे वेगळं रूप कौतुकाने पहात होते, कॅमेऱ्यात बंदिस्त करीत होते. उंच टेकडीवरील लाईटहाऊस मात्र या साऱ्या गोष्टी तटस्थपणे पहात होते. 'रोज मरे, त्याला कोण रडे' अशीच त्याची गत झाली असावी. गेल्या शतकभरात अशा अनेक घटना त्यांने पाहिल्या होत्या नि त्याचे मन आता खट्टू बनले होते. सुखरूपपणे किनाऱ्यावर पोहोचल्याचा आनंद व्यक्त करणारे खलाशी, वादळात सापडून समुद्रात बुडणारी जहाजे, त्यांच्याबरोबर आक्रोश करीत जीवन संपविणारे खलाशी, खवळलेल्या वादळाला तोंड देत मासे पकडण्यासाठी धडपडणारे कोळी... ! या साऱ्या गोष्टींचा साक्षिदार म्हणजेच लाईट हाऊस!

***

"पप्पा, उद्या पेगीज कोव्हच्या लाईटहाऊसला जायचय.'

कन्या म्हणाली. लाईटहाऊस म्हणजे एखादे वीजगृह अशीच माझी कल्पना; परंतु इथे आल्यानंतर त्याचा अर्थ नि कार्य स्पष्ट झाले. पूर्वीच्या काळी संपर्क व्यवस्था किंवा दिशादर्शक यंत्रनाही नव्हती. त्यामुळे समुद्र किनाऱ्यावरील उंच भागावर मनोऱ्याच्या आकाराचे उंच गृह बांधले जायचे नि त्याच्यावर लाल दिवा तेवत ठेवण्याची व्यवस्था असायची. रात्रीच्या वेळी हे दिवे जहाजाना दिशादर्शक ठरायचे. धोकादायक किनारपट्टीवर सावधगिरीचा इशारा देण्याचे कार्यही लाईट हाऊसच्या माध्यमातून होत असे.

पेगीज कोव्हचे लाईटहाऊस पाहिल्यानंतर मला इजिप्तमधील "फेरोज ऑफ अलेक्झांड्रीया लाईटहाऊस'ची आठवण झाली. जगातील एक आश्चर्य म्हणून फेरोज लाईट हाऊसाचा उल्लेख कुठेतरी मी वाचला होता. सातपैकी एक आश्चर्य म्हणून ओळखल्या गेलेल्या या लाईटहाऊसविषयी मनात औत्सुक्यही होते. ते लाईटहाऊस पहायला मिळाले नाही; परंतु त्याच्या जागी किमान पेगीज कोव्हचे लाईट हाऊस पहायला मिळाले याचे समाधान वाटले.

पेगीज कोव्हची किनारपट्टीही तेवढीच धोकादायक आहे. यासाठीच १९१५ मध्ये इथे लाईटहाऊस बांधण्यात आले. लाईटहाऊसने शतक पूर्ण केले तरी, ते आजही तेवढ्याच सुस्थितीत आहे.

पेगीज कोव्हच्या धोकादायक धक्यावर अनेक दुर्घटना घडल्या, अनेक जहाजे बुडाली, महासागराच्या रुद्रावतारामुळे कित्तेकांना आपले प्राण गमवावे लागले. त्यांच्या दीनवाण्या आरोळ्या लाईटहाऊसने ऐकल्या असतील, पाण्यात बुडणाऱ्यांची वाचण्यासाठीची धडपड त्यांने पाहिली असेल. त्यांच्या किंकाळ्या ऐकून त्याचं मनही द्रवल असेल; परंतु जमिनीत घट्ट पाय रोवून तो उभा असल्याने त्यांच्या मदतीला तो कधी धाऊन जाऊ शकला नाही. किंबहूना लालदिवा दाखवून धोक्याचा इशारा देण्यापलिकडे तो काहीच करू शकत नाही. मात्र या साऱ्या घटनांचा तो शतकाचा साक्षीदार आहे.

***

एव्हाना वादळ शांत झाले. पाऊस येता-येता हवेत विरून गेला. आकाश निरभ्र झाले. सागर किनाऱ्यावरून फिरण्यात आता पुन्हा मौज वाटू लागली. आम्ही एका टेकडीवरून दुसऱ्या टेकडीवर जाऊ लागलो. एकएक टेकडी म्हणजे अखंड पाषाण! तिथे ना माती, ना तृण वा ना झाडे-झुडपे! एक अखंड बोडका खडकच तो! किनारपट्टीला सागराची शीतलता लाभली नसती तर...सारा प्रदेश ओसाड वाळवंट बनला असता.

टेकडीच्या माथ्यावर जाताना तेवढीच कसरत करावी लागत होती. झाडे-झुडपे नव्हती; परंतु जागोजागी शेवाळले होते. एकएक पाऊल तेवढेच जपून टाकावे लागत होते. चढतांना पाय घसरलाच तर.... ? कल्पनाच न केलेली बरी! त्यामुळे टेकडीवर जाण्याचा धोका कशासाठी पत्करायचा? असा एक विचार मनात येऊन गेला; परंतु निसर्गाची किमया पहाण्याची ओढ त्याहून अधिक होती. आम्ही सावधगिरीने पावले टाकीत टेकडीच्या माथ्यावर पोहोचलो. समोर लाटांचा पाठशिवणीचा खेळ सुरू होता. तो पहाण्यात मन रमून गेले. आधून-मधून

थंडवाऱ्याची झुळूक सर्वांगाला चाटून जात होती. दूरवर महासागरातून एक जहाज संथ गतीने तरंगताना दिसत होते. एखाद-दुसरा समुद्रपक्षी (सीगल) समुद्रावर घिरटया घालतांना दिसत होता. मघाचा तो महासागराचा रुद्रावतार नि आताचे ते रमणीयदृश्य... निसर्गाच्या किमयेचे हे गूढ न उकलणारेच होते. "माणसाने विज्ञानात कितीही प्रगती केली तरी, निसर्गापुढे तो हतबल आहे हेच शेवटी खरे!' असा मनात विचार येऊन गेला.

क्षणोक्षणी निसर्गाचं हे बदलतं रूप पहाण्यात मन रमून गेलं होतं. सागराच्या लाटांच्या छटावरून नजर हाटत नव्हती. हे अपूर्व, अद्भूत दृश्य पाहून मी मुग्ध होऊन गेलो. एवढ्यात-

‘किती वेळ इथेच बसणार....? चलाऽ!'

महासागराची बदलती रूपं कॅमेऱ्यात टिपण्यात मग्न झालेली कन्या म्हणाली नि आम्ही भानावर आलो. सायंकाळचे पाच वाजले होते. आता थांबता येणार नव्हते. बळेबळेच टेकडीवरून खाली उतरू लागलो. टेकडीच्या दुसऱ्या बाजूला असलेल्या छोट्याछोट्या परंतु विस्कळीत घरांकडे लक्ष गेले. छोटी असली तरी तितकीच निटनेटकी नि सुंदर घरं! मासेमारी करणाऱ्या स्थानिक लोकांची ही वसाहत! गावच नांव होतं "पेगीजकोव्ह!' कांहीस वेगळ वाटलं. योगायोगानं एका ग्रामस्थाची भेट झाली. त्याच्याशी झालेल्या चर्चेतून बरीच माहिती समजली. गावच्या नावामागे असलेली एक लोककथाच त्यांने कथन केली. तो म्हणाला,

‘देअर इस अ लीजेंड बिहाईंड दी नेम ऑफ धीस व्हीलेज' (गावाच्या नावामागे एक दंतकथा आहे.)

तो इंग्रजीतच सांगू लागला,

‘ऑक्टोबर महिना होता. वातावरणात सर्वत्र धुके पसरले होते. समुद्रात आणि किनाऱ्यावरही समोरचे कांहीच दिसत नव्हते. त्यातच सर्वांग गारठून टाकणारी थंडी. पहाटेच्या वेळीच महासागर खवळला, वादळ घोंघाऊ लागले. कापसाप्रमाणे धरतीवर बर्फ पडत होता. महासागरात हालचाली वाढल्या होत्या.'

तो मध्येच थांबला. त्याचा चेहरा गंभीर बनला. आठवणींचं वादळ त्याच्या अंतर्मनात उसळ्या मारीत असावं. त्याने एक दीर्घ श्वास घेतला नि पुढे म्हणाला,

"याच वेळी एक होडी किनाऱ्यापासून कांही अंतरावर आली. उसळलेल्या लाटांबरोबर ती हेलकावे घेत होती. होडीतील प्रवासी आकांताने आक्रोश करीत होते. किनाऱ्यावरील धक्यापर्यंत होडी पोहोचविण्याची त्यांची धडपड! धुक्याप्रमाणे पडणाऱ्या बर्फामुळे समोरचे स्पष्ट दिसत नव्हते. लाईटहाऊसचा लाल दिवाही कोसळणाऱ्या बर्फाच्या पडद्याआड लपला. घोंघावणाऱ्या वादळाच्या झोताबरोबर दुर्दैवाने त्यांची होडी शेजारच्या हॅलिबट खडकावर आदळली नि तिचे तुकडे-तुकडे झाले. ते पाण्यात बुडाले. त्यातूनही कांही जणांनी पोहत येण्याचा प्रयत्न केला; परंतु उसळलेल्या लाटांबरोबर तेही पाण्यात बेपत्ता झाले. मात्र त्यातील एक साहसी युवती खवळलेल्या समुद्रातूनही पोहत समुद्राच्या किनाऱ्यावर येऊन पोहोचली.'

ती मदतीसाठी आक्रोश करीत होती. किनाऱ्यावरच्या लोकांनी तिचा आक्रोश ऐकला नि ते धावत गेले. त्यानी तिला पाण्यातून बाहेर काढले. वादळ-वारा नि उसळणाऱ्या लाटांना टक्कर देत मोठ्या शौर्याने ती किनाऱ्यापर्यंत पोहोचली.

त्या युवतीचे नाव होते, मार्गारेट! तिच्या धाडसाचं लोक कौतुक करू लागले. ती जितकी सुंदर तितकीच प्रेमळ. लोक आवडीने तिला पेगी म्हणू लागले. आपल्या प्रेमळ स्वभावाने लोकांना तिने आपलसं केलं. ती कुठून आली, कुठे जाणार होती...माहित नाही. परंतु लोकांना ती आपली वाटू लागली. याच पेगीचे पुढे एका स्थानिक युवकाशी लग्न झाले नि ती इथेचे राहू लागली. तिच्या अनेक साहसी कथा सांगण्यात येतात. याच पेगीच्या नावाने लोकपुढे या गावाला पेगीज कोव्ह म्हणू लागले.'

त्याने कथा संपविली नि तो कांहीवेळ शांत झाला.

सुमारे ३५ कुटूंबे पीढ्यानपीढ्या इथे रहात असल्याचे सांगून तो म्हणाला,

"आज हे एक महत्वाचे पर्यटनस्थळ बनले आहे, मासेमारी हाच इथल्या रहिवाशांचा मुख्य व्यवसाय! इथल्या लॉबस्टरची (खेकड्यासारखा जलचर प्राणी) चव तुम्ही जरूर चाखा.'

हा महासागर आमचा जीवनसाथी आहे, साहेब! तो कधी आमच्यावर रागावतो, कधी खवळतो... तेवढ्याच विशाल अंतकरणाने आमच्या चुकाही पोटात घालतो. त्याचे मन जितके निर्मळ, तितकाच तो हृदयानेही विशाल आहे. तोच आमचा खरा अन्नदाता!'

त्यांने लाईट हाऊसकडे एक नजर टाकली नि म्हणाला,

‘हा आमच्या जीवनाचा साक्षीदार!'

त्यांने सांगितलेली कथा ऐकून आम्हीही भाराऊन गेलो. त्याचे आभार मानले नि शेजारच्या उपहारगृहात गेलो. तिथल्या लॉबस्टरच्या पिझाची चव अजूनही आमच्या जीभेवर आहे. गाडीत बसण्यापूर्वी माझी नजर पुन्हा एकदा विस्तीर्ण महासागरावर आणि त्याच्या क्रीडा तटस्थपणे पाहणाऱ्या लाईटहाऊसकडे गेली नि मुखातून नकळत शब्द बाहेर पडले-

शतकाचा साक्षीदार!

# १०. हॅलिफॅक्स बंदरावरील गमती-जमती



मी प्रथम समुद्र पाहिला तो... अरबी समुद्र! बी.एड्च्या शिक्षणासाठी एक वर्ष कारवारला होतो. रोज सायंकाळी बीचवर जायचो. दिवसभर उष्णतेने हैराण झालेल्या जिवाला तिथे कांहीसा गारवा मिळायचा. पुढे गोवा, मुंबईला जायचा अनेकवेळा योग आला नि अरबी समुद्राचे दर्शन वारंवार घडत गेले; परंतु महासागराचं महाकाय रूप पहायला मिळालं ते कॅनडामध्येच!

कॅनडाला जशी समुद्रकिनारपट्टी लाभली आहे, तसेच सरोवरांचेही वरदान आहे. हॅलिफॅक्सला तर 'सिटी ऑफ लेक्स' म्हणूनच ओळखले जाते. हॅलिफॅक्स बंदरावर अटलांटिक महासागराचं दर्शन घडलं नि एक अव्यक्त आनंद झाला. तसे महासागराचे महाकाय रूप इथे पहायला मिळाले नाही, कारण इथे महासागर जमिनीच्या अंतर्भागात शिरल्याने त्याला खाडीचे स्वरूप आले आहे. ही खाडी म्हणजे निसर्गरम्य परिसरात अवतरलेली जलपरीच जणू! त्याच्या मध्यभागी असलेले छोटे बेट म्हणजे तारुण्यात सळसळणाऱ्या जलपरीच्या भाळावरचा टिळाच शोभावा! त्यावरचा लाईटहाऊसचा सुंदर टॉवर तिच्या केशसंभारात माळलेला तुराच भासावा! नाजुक, निळसर लाटांमुळे तिचं सळसळणारं लावण्य अधिक खुलून दिसत होतं.

उसळणाऱ्या लाटा, चित्रपटात पाहिलेला वा पुस्तकात वाचलेला सागराचा रुद्रावतार यावेळी पहायला मिळाला नाही. सागराच्या पृष्ठभागावर सगळेच कसे संथ आणि शांत होते. छोट्याछोट्या लाटा पाठशिवणीचा खेळ खेळत होत्या. ते सुंदर दृश्य पाहून माझे मन आनंद सागरात डुबक्या घेत होते.

'हारबर वाक' वरून मनसोक्तपणे फिरत निसर्ग निर्मित हे अद्‌भूत दृश्य आम्ही पहात होतो. समुद्र आज शांत होता; पण किनाऱ्यावर मात्र जनसागर उफाळला होता. नाना देशाचे, नाना वेशाचे, नाना भाषा बोलणारे,... रंगीबेरंगी दृश्य मनाला मोहवित होते. त्यात नव्या ढंगात, नव्या रंगात, नव्या उमेदिने, नव्या संसारात पदार्पन केलेली नवी जोडपी अधिक! विविध संस्कृत्यांच्या संगमात जणू सगळे एकरूप झालेले. बहूसंख्य इंग्रजी बोलणारे... मराठी किंवा हिंदी बोलणारे कुणी आढळतील या आशेने माझे कान वेध घेत होते नि डोळे धुंडाळीत होते. तशी एक-दोन कुटूंबे भेटली नि आपुलकीचा उभारा मिळाला. विदेशात स्वदेशी लोक अनोळखी असले तरी ते आपले वाटू लागतात. संस्कृतीच्या रेशीम धाग्याने त्यांची नाळ आपल्याशी जोडलेली असते. त्या गर्दीतही आम्ही त्यांच्याशी संवाद साधला.ते कुटूंब होते नागपूरचे. मुलगा सॉफ्टवेअर कंपनीत नोकरीला होता. त्याला भेटावे, नवं जग पहावं म्हणून ते आले होते. एवढ्या मोठ्या जनसागरात आपल्याशी मराठी बोलल्याचे ऐकून त्यांनाही आनंद झाला. पुढे तर त्यांचा मुलगाही माझ्या कन्येच्याच आयबीएम कंपनीत नोकरीला असल्याचे समजले.

हॅलिफॅक्स बंदर भुगोलात वाचलं होतं, आज प्रत्यक्ष पहात होतो.किनारपट्टीशेजारी धक्यावर एक-दोन थांबलेली जहाजे, दूरवर समुद्रात पर्यटकांना फेरफटका मारून आनणाऱ्या होड्या, बंदराच्या किनारपट्टीवर हातातहात घालून मौज लूटणारी तरूण जोडपी, कॉफिचे घुटके घेत विविधांगी दृश्ये पहाणारे पर्यटक...सगळच कस वेगळ, नव-नव वाटत होतं. प्रदेश वेगळा, लोक वेगळे, त्यांची भाषा वेगळी. संस्कृती वेगळी....! सारं कस स्वप्नातल्यासारख! लहानपणी प्रथमच वडीलांच्याबरोबर बेळगावात आलो होतो नि शहरातलं दृश्य पाहून भांबावल्यागत झाल होतं. अगदी तसंच वाटलं! एका वेगळया अनुभवाच्या नि विचाराच्या तंद्रीत

असतांनाच कन्येने हाक मारली. माझे त्याकडे लक्ष नसल्याचे पाहून ती पुन्हा म्हणाली,

‘पप्पाऽ'

मी दचकून प्रश्नार्थक नजरेने तिच्याकडे पाहिले. ती म्हणाली,

‘पाण्यावरून तरंगणारी ती ग्रीन बस पाहिलीत?'

‘बस नि पाण्यात?' मी प्रश्न केला.

‘हो, बस-कम-बोट!' तिने पाण्यावरून तरंगणाऱ्या बसकडे बोट करून दाखविले.

बसच होती ती, पाण्यावरून तरंगणारी! मी कौतुकाने पाहू लागलो.

‘तीच बस आता जमिनीवर येईल नि रस्त्यावरून धाऊ लागेल,' ती म्हणाली.

सगळेच कसे नवलाईचे! कांही वेळाने ती बस जमीनीवर आली नि प्रवाशी बसप्रमाणे रस्त्यावरून धाऊ लागली. हिरव्या रंगाच्या या अनोख्या बसने लोकांना समुद्रात होडी बनून जलविहार घडविला नि जमिनीवर बस बनून रस्त्यावरून फेरफटका मारून आनला. बहूरुप्याप्रमाणे पाण्यात नि जमीनीवर रूप बदलणाऱ्या या बसचं मला कौतूक वाटलं. अर्थात हा जादूटोना नव्हता, तर विज्ञानाचा चमत्कार होता. या चमत्कारी बसमध्ये बसून एक वेगळा अनुभव घेण्याचा मोह आम्हालाही झाला; परंतु वेळेअभावी ही हौस पूर्ण करता आली नाही.

काठाला लागूनच पाण्यात झुलणाऱ्या फ्लोटींग ट्रॅककडे माझं लक्ष गेलं. कांही पोरं नि थोरंही त्याच्या शेवटच्या टोकापर्यंत गमतीने पळत होती. पाण्याच्या लहरीबरोबर झुलत्या पुलाप्रमाणे तो झुलत होता. त्यावरून फिरण्यात पर्यटकांना एक वेगळा अनुभव आणि आनंदही मिळत होता. फ्लोटींग ट्रॅक म्हणजे पाण्याच्या पृष्ठभागावर तरंगणारा लाकडी मार्ग! लोखंडी साखळीने किनारपट्टीला त्याला बांधल्याने तो किनाऱ्यालगतच पाण्यावर तरंगत होता. त्याच्यावरून चालतांना

झुलत्या पुलाप्रमाणे पर्यटकांना एक आगळा आनंद देत होता. आम्हीही त्यावर उतरलो नि त्याच्याबरोबर झुलण्याची मौज लुटली. एकिकडे दूरवर पसरलेला निळसर महासागर तर दुसरीकडे किनारपट्टीवर पसरलेला रंगीबेरंगी जनसागर! फ्लोटींग ट्रॅकवरून हे अद्‌भूत दृश्य आम्ही आळीपाळीने पहात होतो, त्यातून मन सुखावत होते.

हॅलिफॅक्सच्या मध्य वस्तीतही मी कधी एवढी गर्दी पाहिली नव्हती. अर्थात मुबईची गर्दी पाहिलेल्यांना इथली शांतता अस्वस्थ करील, पण एका मोठ्या दगदगीतून बाहेर पडल्याचा आनंदही देईल. शहरे मोठी पण लोकवस्ती विरळ असेच कांहीसे चित्र! सगळेच कसे आखीव, रेखीव नि नियोजनबद्ध! किनारपट्टीवर ही निरव शांतता नव्हती. लोटलेल्या जनसागरातून वाट काढत आम्ही पुढेपुढे जात होतो. एका कोपऱ्यावर तंतूवाद्याच्या तालावर इंग्रजी गीत गाणारा एक तरुण गायक दिसला. त्याचे सुरेल गायन रशीकांना डोलवित होते, त्याच्याशेजारी असलेल्या पात्रात लोक खुश होऊन पैसे टाकीत होते. आपल्याकडे गर्दीच्या ठिकाणी भिक्षा मागणारे लोक हमखास असतात. इथे असला प्रकार मला कुठेच दिसला नाही. अर्थात हा गायक भिक्षा मागत होता, असे मला मुळीच म्हणायचे नाही. तो आपल्या कलेचे प्रदर्शन करीत होता नि लोक खुशीने त्याच्या कलेचे मोल देत होते. एक प्रकारे त्याच्या कलेचा हा गौरवच होता. आणखी कांहीसे पुढे गेल्यावर एका गोऱ्या युवकाची नाजूक बोटे हार्मोनियमवर लिलया नृत्य करीत होती. त्यातून उमटणाऱ्या स्वरानी साऱ्यांना बेधुंद केले होते. लोक अधूनमधून टाळया वाजवून त्याच्या कलेला दाद देत होते.

या साऱ्या कलाविष्कारांचा आनंद घेऊन आम्ही पुढे गेलो, तोच मुला-मुलींचे कसरतीचे प्रयोग सुरू असलेले दिसले. लोक कुतूहलाने ते पहात होते. टाळ्या वाजवून त्यांच कौतूक करीत होते. आपल्याकडे यात्रातून असली दृश्ये पहायला मिळतात नि लोक त्याचा आनंद लुटतात; असाच कांहीसा प्रकार!

गोव्याच्या बीचवर विदेशी पर्यटकांना मी पाहिले होते, तसे कांही असभ्य, असंस्कृत प्रकार गोऱ्या युवक-युवतींचे इथेही असतील, असा माझा समज. आम्हा

भारतीयांप्रमाणे अंगभर वस्त्रे घातलेले लोक तसे कमीच; पण गोव्याच्या बीचवर विवस्त्र स्थितीत पाहिलेले विदेशी पर्यटक इथे पहायलाही मिळाले नाहीत.

कॅनडात अनेक स्थळांना भेटी दिल्या; परंतु हॅलिफॅक्स बंदराने मला एक वेगळीच मोहीनी घातली. त्यामुळे कधी विरंगुळा म्हणून, तर कधी स्वाभाविक ओढ म्हणून या बंदरावर आलो. प्रत्येक वेळी मला त्याचे वेगळेपण दिसले... कधी समुद्रात निसर्गाची विविधरूपं, तर कधी किनाऱ्यावर लोकांची कलाप्रदर्शनं !

बंदराविषयी अधिक जाणून घेण्याची मनात ओढ होतीच. बंदरावरचे माहितीफलक वाचून थोडीफार माहिती मिळालीही; परंतु तेवढ्यावरून मनाचे

समाधान झाले नाही. अटलांटिक महासागराच्या नोव्हास्कोशियाच्या किनारपट्टीवरील हे एक नैसर्गिक बंदर. गेल्या अडीचशे वर्षापासून या बंदरातून समुद्रवाहतूक चालू आहे. उत्तर अमेरिका खंडाचे मुख्य प्रवेशद्वार म्हणूनच त्याची ओळख! जगातील १५० देश या बंदराने जोडले आहेत. 'इंटरनॅशनल सी फेअरर्स वेल्फेअर अँड असिस्टन्स नेटवर्क' या अंतरराष्ट्रीय संस्थेने '२०१५ पोर्ट ऑफ दी ईयर' पुरस्कार देऊन बंदराचा गौरव केला आहे. यावरूनच या बंदराचे महत्व आमच्या लक्षात आले.

बंदराच्या एका बाजूला 'फार्मर्स मार्केट'आहे. कॅनडातील शेती अद्याप पाहिली नव्हती; किमान इथले कृषी उत्पन्न तरी पहायला मिळेल या आशेने आत गेलो. दोन मजली भव्य इमारत. त्यात शेतकऱ्यांनी पिकविलेला भाजीपाला, त्यावर प्रक्रीया करून तयार करण्यात आलेले पदार्थ, दूध, दुधापासूनच्या चीजवस्तूं, मासे, चिकन,...आदी. सारे स्टॉल्स व्यवस्थितपणे मांडलेले! कांही तयार खाद्य पदार्थही विक्रीसाठी ठेवले होते. साधारनपणे आपल्याकडे असतो तसाच भाजीपाल्याचा प्रकार! कॅबेज, फ्लॉवर, नवलकोल, बिन्स, भेंडी, बटाटे, दोडकी, रताळी...इत्यादी! ढबु मिरची आपल्याकडे असते त्यापेक्षा बरीच मोठी नि विविधरंगी, कांदे नि टोमॅटो म्हणजे नारळाएवढे मोठे, पहातच रहावे असे! आपल्याकडची भाजी मंडई म्हणजे अस्वच्छता नि कुजलेल्या पाल्याचा दुर्गंध! इथे मात्र कमालीची स्वच्छता, शिवाय

मार्केटची इमारतच वातानुकूलितत असल्याने भाजीपाला लवकर खराब होण्याची शक्यता कमीच. इथे ग्राहकांचीही मोठी गर्दी होती. आम्ही भाजीपाला खरेदी केला, कांही खाद्यपदार्थांचा आस्वाद घेतला नि विदेशातील एक वेगळा अनुभव घेऊन बाहेर पडलो.

***

कांही अंतरावरील बेडफोर्ड बेस हा सुद्धा हॅलिफॅक्स बंदराचाच एक भाग. दुसऱ्या दिवशी आम्ही फिरण्यासाठी म्हणून या ठिकाणी आलो. विशेषत: सायंकाळच्या वेळी इथे पर्यटकांची गर्दी म्हणता येणार नाही; पण बऱ्यापैकी वर्दळ असते. कांही स्थानिक लोकांनी हौस म्हणून लहान नौका विकत घेतल्या आहेत. विशेषत: सुटी दिवशी संध्याकाळच्या वेळी कुटूंबासमवेत ते इथे येतात नि विरंगुळा म्हणून नौका विहार करतात.

प्रतिवर्षी येथे एक जुलैला ‘कॅनडा दिन' साजरा केला जातो. याच दिवशी बीचवर विशेष कार्यक्रमांचे आयोजन असते. योगायोगाने कार्यक्रम पहाण्याची संधी मिळाली. त्यातून कॅनडाच्या संस्कृतीचे दर्शन घडले. त्याहीपेक्षा रात्रीच्या फटाक्यांच्या आतशबाजीने मन वेधून घेतले. स्थानिक लोक रात्रीच्या वेळी आपल्या होड्या घेऊन खाडीच्या मध्यभागी जातात व फटाके, हुक्के... आदींची एकाच वेळी आतशबाजी करतात. रात्रीच्या अंधाराला भेदून टाकणाऱ्या या आतशबाजीमुळे समुद्रावर आकाशगंगा अवतरल्याचा भास होतो.

***

बंदरावरचं दृश्य मनाला आनंद देणारं, सुखविणारं आणि ज्ञानात भर टाकणारं होतं. अर्थात आपण जे पहातो, अनुभवतो त्यातून बरच कांही शिकून जातो; परंतु हॅलिफॅक्स बंदरांत वेगळ असं कांहीस आम्हाला मिळालं. त्यात होत ज्ञान आणि मनोरंजनही; परंतु टायटॅनिक जहाजाच्या दुर्घटनेची कथा ऐकून मन जेवढ हेलावलं, तेवढच भारावून गेलं. वाटलं, बुद्धी-कौशल्याच्या जोरावर माणसानं आकाशाला गवसणी घातली तरी त्याच्या कर्तुत्वालाही कुठेतरी मर्यादा ही आहेच. निसर्गाच्या शक्तीपुढे मानवी बुद्धीकौशल्य अपुरे आहे, हेच खरे!

पहिल्या भेटीत बंदरावरील मेरिटाईम म्युझियम वेळे अभावी पहायला मिळाले नव्हते. दुसऱ्या वेळी खास यासाठीच आम्ही पुन्हा बंदरावर आलो. प्रवेशिका घेतल्या नि प्रथम खाडीत उभे असलेले जहाज पहावयास गेलो. जहाजाची बांधणी, इंज़ीन, अंतर्गत व्यवस्था पाहून मी थक्कच झालो. जहाज म्हणजे तरंग़ते घरच होते. स्वयंपाक घरातील सर्व सुविधा येथे उपलब्ध होत्या. पाकगृह, डायनिंग हॉल, बेडरूम, स्वच्छतागृहे... घरात असते तशीच व्यवस्था! जहाजाच्या आतील व्यवस्था व रचना पाहायची माझी ही पहिलीच वेळ. त्यामुळेच असेल कदाचित, या साऱ्या गोष्टींचे मला नवलच वाटले. त्यानंतर आम्ही मेरिटाईम म्युझियम पहायला गेलो.

म्युझियमच्या प्रवेशद्वारावर ठेवलेला आकर्षक लाईट हाऊसचा मॉडेल मन वेधून घेणारा होता. विविध प्रकारची प्रवाशी व मालवाहू जहाजे, लढाऊ जहाजे, वाफेचे इंजिन, पानबुड्या, जुनी शिडाची जहाजे, होड्या, समुद्र प्रवासात वापरावयाचे साहित्य, महासागरात बुडालेल्या जहाजांचे सापडलेले अवशेष... आदी. सगळ्याच गोष्टी अभ्यासनीय. पण सर्वापेक्षाही मन हेलावलं ते याच ठिकाणी दाखविण्यात आलेला टायटॅनिक दुर्घटनेचा माहितीपट पाहून!

हॅलिफॅक्स बंदरापासून कांही अंतरावरच आक्राळविक्राळ रूप धारण केलेल्या महासागरांनं हे मानवनिर्मित अजस्त्र जहाज गिळून टाकलं होतं. शेकडो निष्पाप जीवांना जलसमाधी मिळाली होती. वृत्तपत्रातील हे वृत्त वाचले होते. या दुर्घटनेवर आधारीत चित्रपटही पाहिला होता. त्यावेळी मनाची जशी अवस्था झाली होती, तशीच अस्वस्थ स्थिती माहितीपट पाहिल्यानंतरही झाली. हॅलिफॅक्स बंदर दुर्घटनाग्रस्तांचे मुख्य शोध केंद्र बनले. इथूनच दुर्घटनाग्रस्त जहाजाच्या शोधासाठी दुसरी दोन जहाजं रवाना करण्यात आली. ओळख न पटलेल्या दुर्घटनेतील सुमारे २०० जणांचा दफनविधी याच शहरात तीन ठिकाणी करण्यात आला. ती स्मशानभूमीही पहाण्याचा योग आला. तिथला माहिती फलक वाचून मनाचा पुन्हा थरकाप झाला. 'पराधीन आहे जगती पूत्र मानवाचा' हेच खरे!

# ११. मला भावलेलं सेंटजॉन




हॅलिफॅक्सहून चार तासाच्या प्रवासानंतर आम्ही सेंटजॉनला पोहोचलो. कॅनडातील प्रवास म्हणजे सुंदर निसर्ग सौंदर्याची मेजवाणीच! स्वच्छ, सुंदर रस्ते आणि रस्त्याच्या दुतर्फा हिरवीगार वनराई, दूरवर कुठेतरी पर्वत वजा टेकड्यांच्या रांगा, त्यांच्या माथ्यावर गोठलेला पांढरा शुभ्र बर्फ आणि त्यावर पडणाऱ्या सुर्यकिरणांचे परावर्तन होऊन निर्माण होणाऱ्या विविध रंगी छटा... सारेच कसे विलोभनिय, आनंद देणारे नि मनाला भुरळ घालणारे! प्रवासाचे चार तास केंव्हा निघून गेले समजलेच नाही. दुपारी तीनच्या सुमारास आम्ही सेंटजॉनला येऊन पोहोचलो. ठरल्याप्रमाणे एका हॉटेलसमोर आमची कार थांबली. अतुलच्या (जावईबापू) महाराष्ट्रीय मित्रांनी तिथेच आमचे स्वागत केले. आम्ही येणार असल्याचे त्यांना आधीच कळविले होते. अनोळखी प्रदेशात मराठी माणसं भेटल्याचा आनंद कांही वेगळाच असतो. एकमेकांचा परिचय करून घेतला नि दुपारच्या भोजणासाठी आम्ही हॉटेलमध्ये गेलो.

कॅनडाच्या न्युब्रुन्सविक राज्यातील सेंटजॉन हे प्राचीन, ऐतिहासिक व सांस्कृतिक शहर. आकाराने लहान; परंतु पाचुच्या बेटासारखे सुंदर! रस्त्यावर ना माणसांची गर्दी; ना गाड्यांचा गोंगाट. रुंद, स्वच्छ नि सुंदर रस्ते. त्याच्या दुतर्फा उंच व रंगरंगोटी केलेल्या निटनेटक्या इमारती. फुटपाथवरून क्वचितच चालत जाणारी

माणसं, पण रस्त्यावरून अविश्रांत संथ गतीने धावणाऱ्या गाड्या... सारेच कसे शांत नि शिस्तबद्ध!

'आम्ही स्वप्नांच्या दुनियेत तर नाही ना', असा प्रथमदर्शनीच भास झाला.

याच अनोळखी शहरात जावईबापूंची नोकरी होती. आठवड्यातून सुटीचे दोन दिवस ते हॅलिफॅक्सला जायचे. हॉटेलमध्ये दुपारचे भोजन आटोपून आम्ही फ्लॅटवर आलो. कंपनीतील त्यांच्या आनखी कांही भारतीय मित्रांची तिथे भेट झाली. त्यांच्याशी गप्पागोष्टी झाल्यानंतर आम्ही कांही वेळ विश्रांती घेतली. आता आठवडाभर इथेच आमचा मुक्काम होता.

उन्हाळयात संध्याकाळी साडेआठ-नऊनंतरच इथे सुर्यास्त होतो. फेरफटका मारण्याच्या निमित्ताने सहाच्या सुमारास आम्ही घराबाहेर पडलो. सेंटजॉन नदीच्या काठावर शहर वसले आहे. त्यामुळेच शहराचे नावही सेंटजॉन पडले असावे. शहर आणि परिसरात अनेक पर्यटन स्थळे आहेत. आम्ही सर्व प्रथम हारबर पॅसेजवर गेलो. नदी व सागराच्या संगमावरचं हे ठिकाण. सुरवातीलाच हरणासारख्या दिसणाऱ्या मुस प्राण्याच्या ब्रांझच्या पुतळयाने आमचे लक्ष वेधून घेतले. उत्तर अमेरिका खंडातील हा एक महत्वाचा प्राणी!

समुद्र किनाऱ्याच्या काठावरील हॉलिडे इन एक्सप्रेस हॉटेलपासून हारबर पॅसेजला सुरवात होते. आम्ही फेरफटका मारण्यासाठी त्यावर पाय टाकला नि डाव्या बाजूला असलेल्या फंडीच्या उपसागराची किमया पाहून थक्कच झालो. सेंटजॉन नदी इथेच समुद्राला येऊन मिळते. सागरातील गमती-जमती नि निसर्ग सौंदर्याचा पर्यटकांना आनंद लुटता यावा, यासाठीच हारबर पॅसेज बनविण्यात आला आहे. वेळ संध्याकाळची होती, परंतु अजूनही सुर्यकिरणानी समुद्राच्या पृष्ठभागावर सोनेरी झालर पांघरली होती. त्यामुळे समुद्राचे सौंदर्य अधिक खुलून दिसत होते. हे विलोभनीय दृश्य पहाण्यात मन रमून गेले, त्यामुळे गारठा शरीराला झोंबला तरी मनाला एक आगळी उभारी मिळत होती. एकिकडे विस्तीर्ण पसरलेला सागर तर दुसरीकडे सुंदर व टुमदार इमारती ...! एकिकडे निसर्गाची किमया तर, दुसरीकडे

मानवाच्या बुध्दी कौशल्यातून अवतरलेली वास्तूकला! दोघांची एकमेकावर मात करण्यासाठी चाललेली स्पर्धाच जणू! मनाच्या एकाग्रतेने नजरेच्या दुर्बिणीतून अंतकरणाच्या कप्प्यात हे दृश्य साठवून ठेवण्याचा प्रयत्न करीत होतो, तोच अचानक सूर्य ढगाआड लपला. आकाश ढगानी गच्च भरून आले नि सुर्यास्ताआधीच धरतीवर काळाकुट्ट अंधार पसरला. पावसाचे मोठमोठाले थेंब टप्प-टप्प समुद्राच्या पाण्यावर पडू लागले. त्यामुळे पाण्यात निर्माण होणारी सुंदर वलये मनमोहित करू लागली. वारा शांत होता. त्यामुळे समुद्रात लाटांच तांडव नव्हतं. अधून-मधून एखाद-दुसरी लाट संथ गतीने यायची नि किनाऱ्याच्या मगरमिठीत लुप्त व्हायची. लाटाचा पाठशिवणीचा हा खेळ पहाण्यात आम्ही रमून गेलो.

नुकताच कुठे हिवाळासंपून उन्हाळ्याला सुरवात झाली होती; परंतु आम्हा नवख्या प्रवाशांना गारठून टाकणारी थंडी अद्यापही वातावरणातून गेली नव्हती. हारबर पॅसेजवर लोकांची वर्दळही कमी नव्हती. अंगभर लोकरीचे कपडे घातलेले लोक गरम कॉफीचे घुटके घेत समुद्राच्या किनाऱ्यावर गमतीने फिरत होते. नव विवाहित गोरी जोडपी हातात हात घालून बेदिक्कतपणे फेरफटका मारीत होती. त्यांचा इंग्रजीतील संवाद आमच्या डोकीवरून जायचा. इंग्रजीचा शिक्षक असूनही त्यांच्या उच्चाराचे अलगद आकलन होण्यासारखे नव्हते. पण आम्हा अनोळखी माणसांशी सुद्धा "हाऽय, हॅलोऽ' करणारे त्यांचे शब्द नकळत आमच्या मनात आदरभाव निर्माण करीत. या नवख्या वातावरणाशी आम्ही नवखे पर्यटक एकरूप झालो नि त्यांच्या लाघवी बोलण्याने त्यांचे केंव्हा झालो समजलेच नाही.

शहराची माहिती व इतिहास सांगणाऱ्या पाट्या ठिकठिकाणी लावल्या होत्या. त्यावर लिहिलेली माहिती वाचून ज्ञानात भर पडत होती. सुंदर नि स्वच्छ वाटेवरून गप्पा-गोष्टी करीत जाणारे नवखे लोक.... त्यांची इंग्रजी बोलण्याची पद्धत, निर्भिड पण मनमोकळा स्वभाव माझ्या मनाला भावला. कधीच न पाहिलेलं सातासमुद्रापलिकडचं आगळ विश्व निरिखून जाणून घेण्यात वेळ केंव्हा निघून गेला समजलेच नाही.

समुद्रात धक्या शेजारी एक मोठे जहाज हवेत धूर सोडीत उभे होते. दूर अंतरावर आनखी एक जहाज बंदराकडे येताना दिसत होते. दुसऱ्या बाजुला किनाऱ्यालगत छोट्या-छोट्या होड्यांची रांग लागली होती. एखाद-दुसरी होडी पर्यटकांना घेऊन समुद्रात फेरफटका मारीत होती. नदी नि समुद्र एकरूप झाल्याने नदीचे पात्र कोणते आणि समुद्राला कुठून सुरूवात होते .... समजतच नव्हते.

वाढत्या संध्याकाळबरोबरच लोकांची वर्दळही वाढतच होती. बंदराशेजारी कॅनडाचा राष्ट्रीय ध्वज दिमाखात फडकत होता. लावण्यवतीच्या खोप्यात तुरा शोभावा असे छोटे परंतु सुंदर लाईट हाऊस किनाऱ्यावरच उभे होते. हॅलिफॅक्समधील पेगीच्या खाडीवरील लाईट हाऊस याआधिच पाहिले होते. त्यामुळे त्याच्या कार्याची माहिती ज्ञात होतीच. त्याच्या विरुद्ध बाजुला रस्त्या पलिकडे असलेल्या उंच व भव्य इमारती मन वेधून घेत होत्या. एका बाजुला खुल्या उपहारगृहात खवय्यांची गर्दी दाटली होती. बंदर परिसरात फेरफटका मारण्यास येणारे लोक गरम अल्पोपहार व कॉफीचा आस्वाद घेत होते. समुद्रावरून वाहत येणाऱ्या गार वाऱ्यांमुळे शरीराला थंडी झोंबत होती. त्यामुळे कॉफीचे घुटके घेत फिरण्यातली मजा कांही औरच!

हारबर पॅसेजवरील एका पाटीवरील बंदराची माहिती वाचली. न्यु ब्रुन्सवीकच्या फंडी उपसागराच्या किनारपट्टीवरील हे नैसर्गिक बंदर. याचे क्षेत्र ४५ हेक्टर (११० एकर) आहे. सॅम्युअल डी चांप्लेन १६०४ मध्ये नव्या जगाच्या शोधार्थ समुद्रप्रवासाला निघाला नि सर्व प्रथम त्याने या बंदराचा शोध लावला. पुढे हेच बंदर विकसित झाले नि इथून मालाची ने-आण सुरू झाली. मुख्य बंदराच्या शेजारीच "कोर्टनीबे' येथे जहाज बांधणी उद्योगही प्रगत झाला आहे. अति वेगाने जाणारे प्रसिद्ध 'मार्कोपोलो' (१८५१) जहाज येथेच तयार करण्यात आले आहे. पहिल्या महायुध्द काळात या बंदराला मोठे महत्व प्राप्त झाले होते.

* सीटी मार्केट

सेंटजॉनचं सिटीमार्केट पर्यटकांच आकर्षण असल्याचं आम्ही ऐकलं होतं. मुख्य रस्त्याच्या बाजुलाच असलेल्या एका भव्य इमारतीत आम्ही प्रवेश केला नि तिथलं दृश्य पाहून थक्कच झालो. प्राचीन इनडोअर मार्केट म्हणून त्याची ख्याती आहे. मार्केटच्या इमारतीला बाहेरून अद्यापही प्राचीन वास्तुकलेचं रूप आहे. मात्र आतील भागाला आधुनिकतेचा मुलामा दिला आहे. आपल्या मार्केट प्रमाणे तिथे ना गडबड, ना गोंधळ, ना गोंगाट! सगळ कसं शांत नि सुस्थितीत. ना मागामागी, ना सौदेबाजी! आपणास हवी ती वस्तु घ्यायची नि सोबतच्या गुडस् कार्टमध्ये ठेवायची. व्यापारी नि ग्राहकांमध्ये तितकाच प्रामाणिकपणा! मालाचा दर्जा उत्तम.... खराब मालाच्या विक्रीला इथे वाव नाही. त्यामुळे फसवाफसवीचा प्रकार ऐकायलाही मिळत नाही.

स्थानिक हस्तकला वस्तूपासून ते विविध खाद्य पदार्थांपर्यंत मानवी जीवनाला आवश्यक असलेल्या सर्वच गोष्टी इथे आकर्षकपणे मांडल्या होत्या. त्यांची खरेदी करण्यापेक्षा त्यांची आकर्षक मांडणी, तिथली स्वच्छता आणि नीटनेटकेपणा पहातच रहावा असा! मी खरेदीपेक्षा विरंगुळा म्हणून अनेक वेळा या बाजारपेठेत गेलो.

हॅलिफॅक्समधील विविध मॉल मी आधीच पाहिले होते. परंतु मॉल संस्कृतीपेक्षाही इथे कांहीसं वेगळेपण जाणवत होतं. इथल्या मार्केटला आधुनिकतेची झालर तर होतीच, शिवाय प्राचीन इतिहास आणि संस्कृतीचं त्याला वलय होतं.

भाजीपाला, फळे, मासे, मांस, धान्याचे प्रकार, मुलांसाठीच्या खेळण्या, सौंदर्यप्रसाधने, किराणा व स्टेशनरी साहित्य, मोबाईल, संगणक, दागिने, लहान-मोठी यंत्रे, भांडी, तयार कपडे, शालोपयोगी वस्तू, क्रीडा साहित्य... सारं एकाच संकुलात उपलब्ध होतं. वैविधता, गुणात्मकता, स्वादिष्टपणा नि विश्वासार्हता ही या मार्केटची वैशिष्ट्ये!

वस्तुंच्या प्रदर्शनाबरोबरच वैविविध्यपूर्ण सांस्कृतिक दर्शनही येथे घडले. ग्राहकांमध्ये गोरे इंग्रज व फ्रेंच तर मोठ्या संख्येने होतेच शिवाय चीनी व भारतीय ग्राहकही निश्चितच नगन्य नव्हते. फ्रेंच व इंग्रज नवीन वसाहत निर्माण करण्यासाठी इथे आले. इथल्या मूळ (रेड इंडियन) रहीवाशांशी त्यांनी संघर्ष केला नि ते इथेच स्थाईक झाले. त्यानीच प्राचीन काळी स्थापन केलेल्या बाजारपेठेचे अस्तित्व आजही कायम आहे. त्याचं प्राचिन स्वरूप जाऊन त्याला आधूनिक रूप मिळालं इतकच.

चार मजली या इमारतीतील व्यापारी दालनं पहात आम्ही दुसऱ्या दरवाजाने बाहेर पडलो. दोन तासाचा अवधी कसा गेला समजलेच नाही. व्यापारी संकुलातून बाहेर पडलो तो समोरच समुद्र! शहराच्या एका टोकापासून ते दुसऱ्याटोकापर्यंत व्यापारी संकुलाची इमारत पसरली आहे. यावरूनच त्याची भव्यता लक्षात येते.

# १२.थ्री सिस्टर्स



सेंट जॉनमध्ये आम्ही रहात असलेल्या इमारतीत रहाणारे, सॉफ्टवेअर कंपनीत काम करणारे मराठी युवक आता आमचे मित्र बनले होते. एक भाषा, एक देश या नात्याने विदेशातली आमची ओळख घट्ट बनली होती. न कळत आपलेपणा

निर्माण झाला होता. आम्ही दिवसभर पर्यटन स्थळाना भेटी देऊन यायचो नि ते ऑफिसची आपली ड्यूटी संपवून घरी परतायचे. मग रात्री चर्चेचा तास रंगायचा. कुठे गेलो होतो ? काय, काय पाहिले? कसे आहे.... ? यावर चर्चा रंगायची. एक दिवस त्यांनी मिस्कीलपणे हसत सहज विचारले,

'थ्री सिस्टर्स' पाहिलात का?'

त्यांच्या बोलण्यातील मिस्किलपणामुळे मी कांहीसा गोंधळलो. त्यांच्या बोलण्याचा रोख माझ्या लक्षात आला नाही. मात्र त्यामुळे मनाला उत्कंठा लागली. म्हणून मीच विचारले,

'थ्री सिस्टर्स!' ....काय भानगड आहे?

'भानगडबिनगड कांही नाही, बंदराशेजारी हा एक पॉईंट आहे. पहा आणि जाणून घ्या.'

सेंटजॉन नदीवरील भव्य पूल पार करून बंदराशेजारील नदीच्या दोन्ही किनाऱ्यावर आम्ही सलग दोन दिवस फेरफटका मारला होता. पण 'थ्री सिस्टर्स' पॉईंट आमच्या निदर्शनास आला नव्हता. त्यांच्या मिस्कील बोलण्यामुळे 'थ्री सिस्टर्स' भानगड जाणून घेण्याची ओढ लागली. संतोषीला याबाबत विचारले त्यावर 'आपण तिथे उद्या जाऊ' असे ती म्हणाली.

दुसऱ्या दिवशी आम्ही तिथे गेलोही. प्रिन्स विल्यम स्ट्रीट रस्त्याच्या शेवटच्या टोकावर एका उंचवट्यावर हे ठिकाण आहे. इथून दूरवर पसरलेला फंडीचा उपसागर स्पष्ट दिसतो. सेंट पेट्रीक स्क्वेअरच्या शेजारी एका खांबावर तीन लाल दिवे दाखवित संतोषी म्हणाली,

'याच त्या थ्री सिस्टर्स...!'

'लाल दिवे....थ्री सिस्टर्स ...'कांहीच अर्थबोध होत नव्हता. मी गोंधळून तिला प्रश्न केला.

'हे तर तीन लाल दिवे, यात एवढे काय आहे?' माझी कन्या विचारी नि तेवढीच भाऊकही आहे. ती म्हणाली,

'पप्पा, तुम्ही शिक्षक आहात. त्या तीन दिव्यांच्या मागे कांही इतिहास असू शकतो; तो जाणून घ्या. लाल दिव्यांच्या शेजारी असलेली माहिती वाचा म्हणजे लक्षात येईल.'

गोष्ट दिसायला साधी असली तरी त्याच्यामागे दडलेला इतिहास कांही वेळा मोठा असतो. तो जाणून घेतल्यानंतर त्या मागच्या लोकांच्या भावना नि त्याचे महत्व समजून येते. या तीन लाल दिव्यांच्यामागे अशीच एक कथा आहे. 'थ्री सिस्टर्स' (तीन बहिणीं) .... नावावरून कोणा तीन बहिणीची यामागे कथा असावी हे समजण्यास वेळ लागला नाही. तीन दिवे हे त्या तीन बहिणींचे जणू प्रतिकच आहे.

दिव्याच्या रुपात या तीन बहिणी शेकडो वर्षे उभा आहेत. महासागरात वादळ, वाऱ्यात अडकलेल्या प्रवाशांना दिशा दाखविण्याचे काम करीत आहेत. पर्यटन स्थळ म्हणून पहाण्यासरखे इथे विशेष कांही दिसणार नाही, परंतु एक स्मारक म्हणून त्याचे संवर्धन करण्यामागची भावना व उद्देश मला महत्वाचा वाटला.

मी तीन लाल दिव्यांच्या स्तंभाशेजारी गेलो. स्तंभावर असलेल्या तीन दिव्यांकडे निरखून पाहिले. पण केवळ दिवे पाहून कांही उमजण्यासारखे नव्हते. शेजारीच एक माहिती फलक दिसला. स्वाभाविक ओढीने मी फलकाशेजारी गेलो. तेवढ्याच उत्कंठेने त्यावर लिहिलेली कथा वाचली. इंग्रजी नि प्रेंचमध्ये कथा अगदीच थोडक्यात लिहिली होती. मी पुन्हा, पुन्हा ती वाचली नि जाणून घेण्याचा प्रयत्न केला. ती सत्य कथा कि दंतकथा हे सांगता येणार नाही; मात्र त्या मागचा उद्देश समाज प्रबोधनाचा होता नि आहे, हे लक्षात आले.

रात्रीची वेळ. तीन बहिणी महासागराच्या किनाऱ्यावर उभ्या होत्या. समुद्रात गेलेल्या आपल्या प्रियकरांची त्या आतुरतेने वाट पहात होत्या. एव्हाना सर्वत्र गडद आंधार दाटला. सोसाट्याचा वारा सुरू झाला. उफाळलेल्या वादळाबरोबर समुद्र किनाऱ्यावर येऊन धडकणाऱ्या लाटांचा भयंकर आवाज, त्यांच्या काळजाचा

थरकाप उडवून द्यायचा. त्यामुळे त्यांच्या मनात भितीचे वादळ घोंघाऊ लागले. त्या दीनवाने आपल्या प्रियकरांना हाका मारू लागल्या. अन्न-पाण्याविना त्यांच्या प्रतीक्षेत त्यांनी संपूर्ण रात्र कडाक्याच्या थंडीत जागून काढली.

समुद्रात गेलेल्या त्यांच्या प्रियकरांचे पुढे काय झाले, याचा कुठे स्पष्ट उल्लेख आढळला नाही. परंतु त्या काळात समुद्रात जाणे किती धोक्याचे होते. 'तुमचे लोक तुमची आतुरतेने वाट पहात आहेत, वेळेत नि सुखरुप परत या' हाच संदेश देण्याचा या कथेमागे उद्देश आहे हे निश्चित. हे तीन दिवे म्हणजे त्या तीन बहिणींचे प्रतिक आहे.

या दंतकथेत वास्तविक अंश असू शकतो. परंतु आज या लाल दिव्यांचा दिशादर्शक म्हणून वापर होत आहे. बंदराकडे येणाऱ्या जहाजाना रात्रीच्या अंधारात योग्य मार्ग दाखविण्याचे काम हे दिवे करतात. किनाऱ्यापासून तीन मैल दूर समुद्रात असलेल्या खलाशांना हे दिवे दिसतात. तिन्ही दिवे दिसल्यास आपण योग्य दिशेने जात असल्याची त्यांना खात्री होते. परंतु केवळ दोन किंवा एकच दिवा त्यांच्यादृष्टीस पडल्यास आपल्या मार्गक्रमणाची दिशा चुकल्याचे त्यांच्या निदर्शनास येते व ते योग्य दिशेला आपले जहाज वळवितात.

थ्री सिस्टर्स लॅपच्या जागी १८४२ मध्ये एका खांबावर एकच तेलाचा दिवा लावण्यात आला होता. पुढे १८४७ मध्ये सेंटजॉन गॅस कंपनीने नाविकांना दिशादर्शक म्हणून त्याच ठिकाणी एक गॅसचा दिवा उभा केला. एका पायलट बोटमध्ये प्राण गमविलेल्या खलाशांच्या स्मृतीप्रित्यर्थ सेंटजॉन आयर्न वर्क्सने १९६७ मध्ये त्याचे तीन दिव्यांमध्ये रुपांतर केले. आज समुद्रातून प्रवास करणाऱ्या खलाशांना 'थ्री सिस्टर्स' वरदान ठरले आहेत. समुद्र सपाटीपासून ४२ फूट उंचीवर हे दिवे आहेत. या आधी पाहिलेले लाईट हाऊस आणि थ्री सिस्टर्स दिव्यांच्या उभारणीचा उद्देश एकच ... दूरवर महासागरात गेलेल्या खलाशाना दिशा दाखविण्याचा आहे.

# १३.'रिव्हर्सिंग फॉल्स'ची किमया



उलट्या दिशेने वाहत असलेला पाण्याचा प्रवाह कोणी पाहिलाय ? त्याचे उत्तर कदाचित नाही, असेच असेल. परंतु मी मात्र त्याचे उत्तर 'हो' असेच देईन. उंच भागाकडून सखल प्रदेशाकडे वाहत जाणे हा पाण्याचा गुणधर्म! मग माझे उत्तर 'हो' कसे? असा प्रश्न सर्वांनाच पडणे स्वाभाविक आहे. मी एका मित्राला असे सांगितल्यानंतर त्याने मला वेड्यात काढले. त्यावर त्याचा विश्वासही बसला नाही, कुणाचाही बसणार नाही, पण हे सत्य आहे. कारण मी असा प्रवाह कॅनडात पाहिला आहे. सेंटजॉन शहराजवळच सेंटजॉन नदीत हा चमत्कार पहायला मिळतो.

हा प्रकार पाहिल्यानंतर कोण्या जादुगाराने केलेला नजर बंदीचा खेळ वाटावा; परंतु तसे कांही नाही. तर ती निसर्गाची किमया आहे. कॅनडामध्ये याला 'रिव्हर्सिंग फॉल्स' (उलटा धबधबा) म्हणतात. खरतर हा धबधबा नाहीच, तर तो विरुद्ध दिशेने वाहणारा पाण्याचा प्रवाह आहे. तो पाहिल्यानंतर एखाद्याला जादूचाच प्रकार वाटावा! निसर्ग नावाच्या जादूगाराने केलेली ही किमयाच म्हणा फार तर! मग

हे घडतेच कसे? मलाही सुरवातीला हाच प्रश्न पडला होता...पुढे मला त्याचे उत्तर गवसले.

आमचे एक सर म्हणायचे,

‘निसर्गाचे कांही नियम असतात, त्यानुसारच सर्व कांही घडते. निसर्गात घडणाऱ्या प्रत्येक घडामोडीला वैज्ञानिक कारण असते.’

मला त्याचे स्मरण झाले. प्रथम दर्शनी ‘रिव्हर्सिंग फॉल्स'चे नेमके कारण मला समजू शकले नाही. परंतु सरांनी सांगितल्या प्रमाणे त्याच्या कारणाचा माझे मन शोध घेण्याचा प्रयत्न करू लागले.

***

सेंट जॉन नदीवरील एका पूलाशेजारी आमची कार थांबली. इथेच हा ‘रिव्हर्सिंग फॉल्स’चा प्रकार आहे. नदीच्या काठावरील पायऱ्या उतरून आम्ही निरिक्षण स्थळी गेलो. पूलाखालून पाण्याचा प्रवाह संथ गतीने वाहत, फंडीच्या उपसागराच्या दिशेने चालला होता. माझी नजर ‘रिव्हर्सिंग फॉल्स'चा शोध घेऊ लागली, परंतु कुठेच कांही दिसेना. पाच-दहा मिनिटे सभोवतालचे निसर्गाचे रमणीय दृश्य पहाण्यात निघून गेली, एवढ्यात तो चमत्कार नजरे समोर आला, नाही घडला. नदीतून समुद्राकडे वाहणाऱ्या पाण्याला रेटत उलट्या दिशेने... नदीच्या पात्रात दुसरा एक पाण्याचा प्रवाह येत असल्याचे दिसले नि आम्ही आश्चर्याने पहातच राहिलो. एक भला मोठा पाण्याचा प्रवाह उलट दिशेने वाहत नदीच्या पात्रात येत होता. त्यामुळे नदी पात्रातील पाणी दोन्ही बाजूने दोन भागात विभागले गेले नि नदी पात्रात एक नयन मनोहारी दृश्य निर्माण झाले. नदीच्या पात्राच्या उलट दिशेने वाहणारे पाणी नि त्याच्या दोन्ही बाजूने आपल्या नित्याच्या दिशेने वाहत जाणारे पाणी... परस्पर विरुध्द दिशेने जाणारे पाण्याचे तीन प्रवाह! तासनतास पहातच रहावे असे विलोभनिय दृश्य!

पुढे पुलाच्या खाली रिंगन घालावे त्याप्रमाणे पाणी गोलाकार फिरू लागले नि डोळयांचे पारणे फीटले. १५ मिनिटे निसर्गाचा हा अद्भूत चमत्कार आम्ही पहातच

राहीलो. कांही वेळानंतर उलट दिशेने वाहत येणारा पाण्याचा प्रवाह मागे-मागे हटताना दिसू लागला. कांही वेळाने अदृश्य झाला.

मी विचारात पडलो. नदीच्या प्रवाहाच्याविरुद्ध दिशेने वाहत येणारा दुसरा पाण्याचा प्रवाह... गोंधळात टाकणारीच घटना होती. असे कसे घडले? याला कांही शास्त्रीय कारण? माझ्या मनात प्रश्न निर्माण झाले. रात्री घरी या विषयावर सर्वांशी चर्चा केली. शेवटी अतुलनी (जावईबापू) त्याचं समर्पक उत्तर दिलं नि माझ अस्वस्थ मन शांत झालं.

सेंटजॉन नदी, शहराजवळच फंडीच्या उपसागराला येऊन मिळते. समुद्राला सातत्याने भरती-ओहोटी येते. जगातली सर्वाधिक भरती (हाय टाईड) फंडीच्या उपसागरात येते. भरतीच्या काळात समुद्रातील पाणी नदीच्या पात्रात उलट दिशेने वाहत जाते नि 'रिव्हर्सिंग फॉल्स' तयार होतो. निसर्गाचा हा चमत्कार दाखविणारं ठिकाण सेंट जॉनमधील एक पर्यटन स्थळ म्हणून ओळखलं जातं. दरवर्षी हजारो पर्यटक येथे येतात नि निसर्गाच्या या चमत्काराचा आनंद लुटतात.

# १४.फोर्ट होवे



सेंटजॉन नदीपार करून आम्ही पलिकडे गेलो. शेजारच्या एका टेकडीवर किल्ला दिसला. आम्हा मराठी माणसांना किल्याचे मोठे आकर्षण! किल्ला म्हटला कि छत्रपती शिवाजी महाराज आणि त्यांच्या पराक्रमाच्या कथा नजरेसमोर उभ्या रहातात. त्यामुळे सेंटजॉनमधील किल्यावर जाण्याची स्वाभाविक ओढ लागली. टेकडीच्या पायथ्यापासूनच किल्यावर जाण्यासाठी पक्का रस्ता बनविला होता. आम्ही फिरत-फिरत पायीच जात होतो. रायगडचा आकाशाला गवसणी घालणारा गड दोन वेळा चढून गेलो होतो. त्याच्यापुढे हा किल्ला कांहीच नव्हता. आम्ही होवे गड चढू लागलो. बहूतेक पर्यटक आपापल्या वाहनातून गडावर जात होते. आम्ही

शिवरायांचे मावळे सभोवतालचा परिसर पहात पायीच गड पादाक्रांत करीत होतो. टेकडीवर सर्वत्र हिरवेगार गवत, ठिकठिकाणी हिरवी झुडपे. त्यातून सभोवार वळणे घेत टेकडीवर गेलेला सुंदर रस्ता...नयनरम्य दृश्य दिसत होते. निसर्ग सौंदर्याचा आनंद घेत आम्ही गडावरील ब्लॉक हाऊसशेजारी येऊन पोहोचलो.

ब्लॉक हाऊस लाकडीच असले तरी त्याची बनावट तितकीच मजबुत आहे. अडीचशे वर्षानंतरही ते सुस्थितीत आहे. किल्याच्या भिंतीचे केवळ अवशेस तेवढेच आज शिल्लक आहेत. इतिहास जागं करणाऱ्या दुसऱ्या विशेष गोष्टी इथे दिसल्या नाहीत. मात्र मनाला खिळवून ठेवणारं सभोवतालच दृश्य पाहून मन त्यातच हरपून गेलं.

अमेरिकेच्या क्रांतीनंतर अमेरिकेने सेंटजॉन शहराला १७७७ मध्ये वेढा दिला होता. अमेरिकेच्या संभाव्य हल्यापासून बचाव करण्यासाठी ब्रिटिशांनी हा किल्ला बांधला. किल्यावर सुरवातीच्या काळात आठ तोफा होत्या. शंभर सैनिक राहू शकतील अशी बराकी, दोन ब्लॉक हाऊस व किल्याच्या सभोवार आवाराची भिंत होती. किल्याच्या पूर्वेला पुढे आनखी एक ब्लॉक हाऊस बांधण्यात आले. इतिहासाची स्मृती म्हणून कॅनडा सरकारने त्याची जपणूक केली आहे एवढेच.

गड पाहून आम्ही शहराच्या मध्यभागी असलेल्या चौकात आलो. एका बाजुला मार्केट स्क्वेअर समोर उंच टॉवर क्लॉक होते. त्याच्या सभोती बांधलेल्या कठड्यावर चारी बाजुना बसलेल्या जेष्ठ नागरिकांचे पुतळे दिसले. चौकाच्या दुसऱ्या बाजुलाही कांही बाकावर बसलेल्या, तर कांही उभा राहिलेल्या स्त्री-पुरषांचे पुतळे दिसले. दूरून पाहिल्यास ही जिवंत माणसेच असावित असा भास होतो.

* ग्रेटफायर




अशाप्रकारची स्ट्रीट आर्ट आम्हाला सेंटजॉनमध्ये जागोजागी पहायला मिळाली. कुणी पेपर वाचत, कुणी चर्चा करीत बसल्याचे ते दृश्य होते. मात्र सर्वांच्या चेहऱ्यावर एक प्रकारची उदासिनता होती. त्यांच्या मनात कसलीतरी खंत असल्याचा भास व्हायचा, निर्जीव पुतळ्यात सजीव भाव ओतण्याची कला मुर्तीकाराने उत्तमरित्या साधली होती. असे करण्यामागे मुर्तीकाराचाही कांही उद्देश असावा. काय असावे त्यांचे दु:ख? मी मनात विचार करू लागलो. एवढ्यात संतोषीच म्हणाली,

‘पप्पा, हे पुतळे म्हणजे येथे घडलेल्या एका मोठ्या दुर्घटनेचे प्रतिक आहे.'

‘अशी काय असावी ही दुर्घटना! 'मनात विचार आला. तोच ती पुढे म्हणाली,

‘एकदा सेंटजॉन शहर आगीचे भक्ष्य बनले. आगीत अर्ध्या अधीक शहराची राखरांगोळी झाली. कित्तेकांना आपली घरेदारे गमवावी लागली, त्यामुळे ते बेघर बनले. कित्तेकांनी आगीत आपले उद्योगधंदे गमविले नि ते बेरोजगार बनले. त्यातून सावरणे त्यांना कष्टप्राय झाले. हीच चिंता या पुतळयांच्या चेहऱ्यांवर मुर्तीकाराने रेखाटली असावी.'

कन्येने घटनेची ओझरती माहिती दिली. पण त्याने माझे मन अस्वस्थ झाले. दुर्घटनेचे कारण, त्यात शहराचे झालेले नुकसाण... जाणून घेण्याची उत्कंठा लागली. सीटीमार्केटच्या प्रवेशद्वाराशेजारीच एक पार्क आहे. तिथे मी सकाळी मॉर्निंग वॉकला येत असे. एके दिवशी पार्कमधील एका बाकावर विश्रांती घेत होतो. तोच शेजारी एक गोरा येऊन बसला.

‘हॅलोऽ! हाऊ आरयु?' त्याने पृच्छा केली. अनोळखी माणसाशी सौजन्याने वागण्याची त्यांची रीत मला मनापासून आवडली होती.

‘गुडमॉर्निंग.... आय अँम फाईन' मी त्याला प्रतिसाद दिला.

बोलता-बोलता मी त्याच्याकडे सेंटजॉनमधील अग्नीतांडवाचा विषय काढला. विषय ऐकताच पन्नाशीतील तो गृहस्थ कांहीसा गंभीर बनला. ही दुर्घटना त्याने पाहिली नव्हती; परंतु आपल्या पूर्वजांकडून ऐकली होती, पुस्तकात वाचली होती.

‘ओऽ, इट वाज टेरिबल!' तो क्षणभर थांबला. परंतु माझी अधिरता पाहून गंभीर चेहऱ्यानेच तो म्हणाला,

‘१८५७ चा जून महिना आम्हा सेंटजॉन वासियांच्या जीवनात काळाकुट्ट ठरला आहे. २० जूनचा तो दिवस. दुपारचे अडीच वाजले होते. हेनरी फेअर वेथरच्या गोदामाला अचानक आग लागली आणि ती शहरात सर्वत्र पसरली. आगीचा अचानक उडालेला भडका पाहून लोक गोंधळले. एकामागून एक घर आगीच्या

भक्षस्थानी पडू लागले. लोक आरडाओरड करीत सैरावैरा पळू लागले. काय घडते आहे कुणालाच समजत नव्हते. जीव वाचविण्यासाठी पळून जाणे एवढाच मर्ग त्यांच्या जवळ होता. सगळेच असाह्य झालेले! कांही क्षणात होत्याचे नव्हते झाले. सुमारे २/५ शहर जळून खाक झाले. ८० हेक्टर (२०० एकर) परिसरातील आठ चर्च, सहा बॅंका, १४ हॉटेल्स, ११ स्कुनर्स (होड्या), चार लाकडी बोटीसह १,६१२ इमारती जळून भस्मसात झाल्या. यामध्ये १९ लोकांचा मृत्यु झाला व कित्तेक लोक जखमी झाले. आगीच्या ज्वाला इतक्या प्रचंड होत्या की ज्वालांचा प्रकाश शंभर किलोमीटर अंतरावरील फ्रेडरिक्टनवरूनही दिसत होता.'

एवढे बोलून तो शांत झाला.

'बट वुई कॅनेडियन्स फेसड् इट करेजीअसली. ...नाऊ वुई स्टुड अँज बिफोर बट मोर स्टेबल' तो म्हणाला. मला त्याचं शेवटच वाक्य भावलं. 'या दुर्घटनेला आम्ही धैर्याने सामोरे गेलो, आता पूर्वीप्रमाणेच किंबहूना त्यापेक्षा अधिक स्थीर झालो आहोत. 'हा त्याचा विचार कॅनडातील लोकांची माणसिकता व आलेल्या प्रसंगाला धैर्याने सामोरे जाण्याचं त्यांचं साहस दाखवितो. 'जे झालं, ते होऊन गेलं. त्याचा विचार करीत बसायचं नाही. पुन्हा जोमाने कामाला लागायचं' या निर्धारानं त्यांनी स्वत:ला सावरलं. शहराची पुनर्बांधणी केली. उद्योगधंदे पुन्हा उभारले. एके काळी आगीत भस्मसात झाल्याचा कुठे लवलेशही आता पहायला मिळत नाही.

आम्ही कॅनडात अनेक शहरं पाहिली, पण सेंटजॉन शहरात मला वेगळेपण दिसून आलं.... शांत, स्वच्छ नि सुंदर.... ! कॅनडातील एक सांस्कृतिक नि ऐतिहासिक शहर म्हणून त्याची ख्याती आहे. माणसं माणुसपण जपणारी व परिसर मन रमविणारा! आठ दिवस कसे निघून गेले समजलेच नाही. परत हॅलिफॅक्सला जातांना मागे कांही तरी राहील्याची मनाला सारखी रुखरुख लागली होती.

# १५. किंग्ज लँडिंग



सेंटजॉन आणि परिसरात आम्ही अनेक निसर्गरम्य स्थळे पाहिली. निसर्गाचे चमत्कार पाहून मन हरपून गेले. जादुगाराने आपल्या पोतडीतून अजब चिजे बाहेर काढून प्रेक्षकाना थक्क करून सोडावे, तसाच कांहीसा निसर्गाने येथे चमत्कार केला आहे, आपल्या अद्भुत कुंचल्यातून सौंदर्याची उधळण करून साऱ्यांनाच मोहिनी घातली आहे. कॅनडा प्रशासनानेही त्याचे संवर्धन करत, त्याला पुरक असे प्रकल्प राबवून निसर्ग सौंदर्य अधिक खुलविले आहे.

अशाच एका निसर्गरम्य स्थळी आम्ही गेलो. सेंटजॉन नदीच्या काठावर वसलेल्या या ऐतिहासिक व सांस्कृतिक व्यवस्थेचे नाव आहे किंग्ज लँडिंग! फ्रेडेरिक्टन एनबीच्या पश्चिमेस ३७ की.मी. अंतरावर हे ठिकाण आहे. सुंदर निसर्गाच्या सानिध्यात कॅनडाने आपल्या प्राचिन संस्कृतीचे, ईतिहासाचे येथे जणू सजीव प्रदर्शनच मांडले आहे. नव्या पिढीला आपल्या प्राचिन संस्कृतीचे ज्ञान व्हावे, ईतिहासाचे स्मरण करून त्यांनी भविष्याचा वेध घ्यावा, हाच या मागचा उदात्त हेतू!

आम्ही किंग्ज लँडिंगच्या स्वागत कक्षात गेलो. एका हॉलमध्ये किंग्ज लँडिगमधील देखाव्यांचे टीव्ही स्क्रीनवर प्रदर्शन करण्यात आले होते. पर्यटन

स्थळावरील विविध देखाव्यांची माहिती व संक्षिप्त ईतिहास .... साऱ्या गोष्टी पाहून मनाची उत्सुकता अधिकच वाढली. काऊंटरवर जाऊन तिकीटे घेतली नि आत प्रवेश केला. कांही अंतरावर छोट्याछोट्या इमारती दिसत होत्या. परिसरात लोकांची गर्दीही बरीच होती. यात एवढे पहायचे ते काय ?...मनात विचार येऊन गेला. परंतु प्रत्यक्ष अनुभूती घेतल्याशिवाय कोणत्याही गोष्टीचा पूर्वग्रह करून घेणे योग्य नाही!

प्रदर्शन स्थळी पर्यटकांना नेण्यासाठी घोडागाडी सज्ज होती. येथूनच कॅनडाच्या प्राचिन ईतिहासाचे दर्शन घडण्यास सुरवात झाली. पर्यटकांना नेण्यासाठी आधुनिक वाहनांऐवजी ऐतिहासिक घोडागाडीचाच मोठ्या कल्पकतेने वापर केलेला आहे. घोडागाडीतून आम्ही प्रदर्शनस्थळी गेलो. विविध इमारतीतून असलेल्या प्रदर्शनांचा नकाशा व कार्यक्रमांची माहिती सोबत होतीच. एका ठिकाणी विविध कालखंडातील युध्दाचे प्रत्यक्षिक दाखविण्याचा कार्यक्रम होता. आम्ही तिथे गेलो. अनेक प्रेक्षक हे अनोखे प्रात्यक्षिक पहाण्यासाठी आतुरतेने प्रतीक्षा करीत होते. प्राचीन, मध्ययुगीन व आधुनिक काळातील गणवेश धारण केलेल्या जवानांच्या तीन सशस्त्र तुकड्या सज्ज होत्या. अर्थात सैन्य दलात सेवा करणारे हे जवान नव्हते, तर युध्दाचे प्रात्यक्षिक दाखविणारे प्रशिक्षित कलाकार होते. तत्कालीन गणवेश घालून ते शस्त्र सज्ज होते. तिन्ही काळातील युध्दकलेची व शस्त्रांची प्रथम तोंडी माहिती देण्यात आली. त्यानंतर तिन्ही तुकड्यांनी गोळीबार करून तत्कालीन युध्द कौशल्याचे प्रदर्शन घडविले. कार्यक्रम साधाच, परंतु टप्याटप्याने युध्दकौशल्यात झालेल्या बदलाचे प्रत्यक्ष दर्शन घडविणारे ते माहितीपूर्ण मनोरंजन होते. अत्याधुनिक युध्दकलेपुढे त्याचे महत्व वाटणार नाही, परंतु आधुनिक कलाकौशल्याचा मनोरा प्रचिन संस्कृतीवरच उभा आहे, हे विसरून चालणार नाही.

ठिकठिकाणी असलेल्या विविध ईमारतीत विविध प्रकारचे प्रदर्शन व कार्यशाळा होत्या. इमारती मोठ्या शहरातील प्राचीन वस्तूसंग्रहालयाप्रमाणे भव्य नव्हत्या. कल्पकतेने तत्कालीन ईमारतींचीच येथे पुनर्स्थापना करून त्यात प्राचीन उद्योग व्यवसायांच्या प्रत्यक्षिकांचे प्रदर्शन मांडले होते. अर्थात जून्या ईमारती उचलून आणणे कसे शक्य आहे, असा समज होऊ शकतो, परंतु कॅनडातील घरे वैशिष्ट्यपूर्ण

आसतात. त्यांची बनावटही तशीच आगळी-वेगळी! भिंतीपासून ते छतावरील कौलांपर्यंत प्रामुख्याने लाकडाचाच वापर केलेला. बाहेरून साधी दिसणारी घरे आत अलिशान बंगल्याप्रमाणे सर्व सोईनी युक्त असतात. भिंती लाकडी साच्याने बनविलेल्या असल्या तरी दोन्ही बाजूने उत्तम प्रतिच्या प्लायवुडचे त्यांना आवरण असल्याने आपल्याकडील भिंती प्रमाणेच त्या दिसतात. अलिकडे या भिंतीना बाहेरच्या बाजूने व कौलांनाही फायबरचे आच्छादन घालण्यात येत आहे. बहूमजली इमारतीत कॉलमचा उपयोग करण्यात येत असला तरी तिथेही लाकडाचाच वापर अधिक असतो. त्यामुळे या घरांचे सुटे भाग कुठेही नेऊन घरांची पुनर्बांधणी करणे शक्य आहे. कांही घरे शंभर वर्षाची जुनी असली तरी अद्यापही नव्या घराप्रमाणे दिसतात. अर्थात त्यांची देखभालही तशीच करण्यात येते. थंडी, वारा व पावसाचा सतत मारा होऊनही या लाकडी घरांवर त्याचा विशेष परिणाम झाल्याचे दिसत नाही. येथे कांहीसे विषयांतर झाले तरी किंग्ज लँडिंगमध्ये जुन्या ईमारतींची पुनर्बांधणी करण्यात आल्याच्या पुष्टीसाठी ही माहिती आवश्यक आहे.

मध्ययुगीन काळातील इमारतींचा हा नमुना आहे. अशाच एका इमारतीत आम्ही गेलो. उपस्थित कलाकारांनी प्राचीन पध्दतीनेच आमचे स्वागत केले. कांही महिला सुतकताई व विनकाम करीत होत्या. १९ व्या शतकातील विनकाम संस्कृतीचे येथे प्रत्यक्षिक दाखविण्यात येत होते. हाताने विनण्यात आलेले कापड व वापरण्यात आलेल्या पोशाखाचे कांही नमुने आम्ही तेथे पाहिले. तिथले प्राचिन पध्दतीचे कांही पोशाख आम्ही गमतीने परिधान केले. कलाकारांनी विणकामाच्या प्रत्यक्षिकासह त्याकाळात वापरण्यात आलेल्या पोशाखाची माहिती दिली.

दुसऱ्या एका इमारतीत साधारणत: १८, १९ व्या शतकातील स्वयंपाकगृह व तत्कालीन स्वयंपाकाच्या भांड्यांचा संग्रह होता. तत्कालीन खाद्य संस्कृतीचे येथे प्रदर्शनही होते. चूल, धुरांडी, तांब्याची मोठमोठी भांडी पहावयास मिळाली. त्यांची बनावट आकर्शक आणि मजबूती कमालीची! आज अशा प्रकारच्या भांड्यांचा क्वचितच वापर होतो. कलाकारांनी आम्हाला प्राचीन खाद्य पदार्थांची माहिती दिली

व चुलीवर कांही पदार्थही बनवून दिले. त्यांची चव दिवसभर आमच्या जीभेवर रेंगाळत होती.

बाजूलाच एक जुनाट इमारत दिसली. जुन्या काळातील सुतारकामाची हत्यारे, शेतीची अवजारे, फर्निचर आदीचे तिथे जणू प्रदर्शनच होते. विविध प्रकारचे लाकडाचे ओंडकेही होते. सुतार कामासाठी कोणत्या हत्याऱांचा, कसा वापर करण्यात येत होता, याच्या माहितीसह प्रात्यक्षिकही करून दाखविण्यात आले. विविध प्रकारचे लाकूड व त्याचा वापर यांची अभ्यासपूर्ण माहिती देण्यात आली.

छपाईच्या कलेत टप्याटप्याने होत गेलेले बदल व प्रचीन छपाईची पध्दत याची एका ठिकाणी कार्यशाळाच होती. जुन्या छपाई यंत्रापासून ते अत्याधुनिक छपाई यंत्रापर्यंतचे तिथे प्रदर्शनच होते. विविध छपाई यंत्रांच्या माहितीसह आम्हास छपाईचे नमूने दाखविण्यात आले. हस्तलिखितापासून ते आजच्या संगणक युगापर्यंतची लेखन कला थक्क करून सोडणारी होती. जग आज प्रगत झाले. पाटी गेली, वही आली. कागदावरील सुंदर, वळणदार अक्षर आज माणूस विसरलाच जणू! विविध अक्षरांचे खिळे जोडून करण्यात येणारी छपाई आज ईतिहास जमा झाली. टंक लेखनही मागे पडले, संगणक आले नि सगळेच बदलले. आज तर संगणकावर टाईप करण्याचीही गरज उरलेली नाही. तुम्हाला हवे ते तुम्ही बोलत जायचे, मोबाईल किंवा संगणकावर ते आपोआप टाईप होत जाईल. कोणत्याही भेषेतील लेखन एका क्षणात भाषांतरीत करून मिळते. एका तासात हजारो पाने छापून तयार होतील. माणसापेक्षाही आज यंत्र शहाणे झाले आहे. (अर्थात माणसाच्या बुध्दी कौशल्यातूनच ही कला प्रगत झाली हे विसरून चालणार नाही.) इथल्या या प्रदर्शनातून बरेच काही शिकता आले.

एका ठिकाणी राजेशाही काळात वापरले जाणारे पोशाख, विविध शस्त्रे, त्यांनी वापरलेला पलंग, सिंहासन, राजेशाही वस्तूं यांचा संग्रह होता. रोजेशाही पोशाख घालून मी क्षणभर राजा झालो. भारतातही जूने राजवाडे, किल्ले यांचे जतन करण्यात आले आहे, परंतु कांही ठिकाणी केवळ त्याचे अवशेष उरले आहेत. राजेशाही शासनव्यवस्था जाऊन लोकशाही आल्यानंतर या साऱ्या गोष्टींचे विशेष

महत्त्व वाटत नसले तरी त्यातून त्या काळातील संस्कृती आणि ईतिहास आपल्या डोळासमोर उभा रहातो नि भविष्याची दिशा मिळते.

याशिवाय प्रचिन चर्च, तेथील प्रार्थनागृह, वापरण्यात आलेले फर्निचर, हस्तलिखीते, लेखनी... इत्यादी गोष्टी आम्ही पाहिल्या, माहिती जाणून घेतली. दुपारपर्यंत जेवढे पहाणे शक्य होते तेवढे पाहिले, जाणून घेण्याचा प्रयत्न केला. आज कॅनडाही प्रगत देशापैकीच एक आहे. परंतु आपली जुनी संस्कृती आणि ईतिहास जिवंत ठेवण्याचा त्यांचा प्रयत्न कौतुकास्पद आहे.

येथील कलात्मक वस्तूंचा संग्रह आणि त्यांचे जतन हा दैनंदिन व्यवसायाचा एक प्रमुख भाग बनला आहे. किंग्ज लँडिंग हे सर्वात पहिले आणि महत्त्वाचे सजीव संग्रहालय आहे. ‘त्यांना सांगा, ते विसरतील. त्यांना दर्शवा, त्यांना आठवेल. त्यांना सामील करून घ्या, त्यांना समजेल’, असे या संग्रहामागचे सोपे तत्व व उदात्त हेतू आहे.

किंग्ज लँडिंग ही एक कार्यशाळा आहे असे म्हटल्यास वावगे ठरू नये. येथे मेणबत्ती बनविणे, मधमाश्या पाळणे, लाकूडकाम आदी १९ व्या शतकातील विविध कामे आणि हस्तकलांचा त्यात समावेश आहे. विविध क्षेत्राचे विस्तृत ज्ञान असलेले, तत्कालीन वेशभूषा केलेले कलाकार पर्यटकांमध्ये नवचैतन्य निर्माण करतात. घरगुती वस्तूंच्या स्पष्टीकरणापासून ते विविध कालावधीतील कामकाजाचे प्रात्यक्षिक करून दाखवितात.

१९६० च्या उत्तरार्धात मॅक्टॅकव्हॅक धरणाने सेंटजॉन नदीच्या खोऱ्यात अनेक ऐतिहासिक इमारतींना पूराचा धोका निर्माण केला होता, तेंव्हाची ही निर्मिती आहे. १९ व्या आणि २० शतकाच्या न्यू ब्रुन्सविक सेटलमेंटचे प्रतिनिधित्व करण्यासाठी ७० हून अधिक पुनर्संचयित आणि पुनर्बांधित इमारती आणि इतर संरचना किंग्स लँडिंगमध्ये आहेत.

किंग्ज लँडिंग हे एक न्यु ब्रुंन्सविकचे प्रतिबिंब आहे, १८२० ते १९२० च्या कालावधीतील मूळ इमारती असलेल्या जिवंत ईतिहासाचे संग्रहालय आहे. किंग्ज

लँडिंग हे खरे गाव नाही, पूर्वीही नव्हते, परंतु न्यू ब्रुंन्सविक आणि प्रिन्स विल्यमच्या आसपासच्या क्षेत्रातील प्रामुख्याने तेरा वसाहतीतील इमारती एंग्लो-अमेरिकन निष्ठावंतांनी स्थायिक केल्या आहेत. स्कॉटिश, आयरिश आणि इंग्रजी लोक येथे सर्वप्रथम स्थायिक होते. हे फ्रेडरिक्टन (न्यू ब्रुन्सविक) पासून अंदाजे ४० किमी पश्चिमेस आहे.

हा प्रकल्प मूळतः १९६० च्या उत्तरार्धात सुरू झाला आणि आजपर्यंत चालू आहे. दर वर्षी नवीन इमारती त्यात जोडल्या जात आहेत. मूळ ऐतिहासिक इमारतींचे स्थलांतर करून येथे त्यांची सुस्थितीत स्थापना करण्यात आली आहे.

डझनहून अधिक घरे, त्यातील बहुतेक मूळ इमारती साइटवर स्थापित आहेत. घरांमध्ये कर्मचारी अभ्यागतांचे स्वागत करतात, दररोजच्या कामासाठी जातात, विविध काळातील जेवण शिजवतात आणि त्या काळातील सुयोग्य वेशभूषा करतात. गतकाळ प्रेक्षकांच्या नजरेसमोर उभा करण्याचा त्यांचा प्रयत्न असतो.

तेथे "ट्रेड्स" इमारती देखील आहेत. स्थानिक माणसांच्या मालकीची ही दुकाने आणि व्यवसाय आहेत. कारागीर दुकानांमध्ये विक्रीसाठी वस्तू आणि सेवा पुरवतात. संकुलात बरीच कोठारे आहेत. पशुधनाची जोपासना करण्यात आली आहे. यामध्ये कोंबड्यांपासून ते घोडे आणि बैलांपर्यंतच्या प्राण्यांचा समावेश आहे. प्राण्यांना केवळ शोसाठीच नव्हे तर व्यावहारिक उद्देशाने साइटवर ठेवले जाते. कोंबडी अंडी देतात, गायी दूध देतात आणि घोड्यांचा उपयोग गावाच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकाला असलेल्या गाड्या खेचण्यासाठी केला जातो.

दर आठवड्याच्या शेवटी, तिथे विशेष कार्यक्रम असतात. न्यू ब्रुन्सविकच्या इतिहासातील विशिष्ट घटनांचे सादरीकरण करून प्रेक्षकांचे मनोरंजन केले जाते. साइटवरील बऱ्याच उपक्रमांमध्ये पर्यटकांना सामील होण्यास प्रोत्साहित केले जाते, प्रश्न विचारण्यास, मते मांडण्यास वाव दिला जातो.

## १६. भारतीय आजोबाची विदेशी नात

कॅनडाचा पहिला दौरा संपवून ऑगस्टअखेरीस परत आलो. तिथल्या आठवणी, तीन महिन्याच्या वास्तव्यात आलेले अनुभव.... मनाच्या कप्यात साठवून ठेवले होते. अधूनमधून ‘त्या' स्मृतीपटलावर यायच्या नि मन तिथल्या आठवणींच्या साम्राज्यात गढून जायचं. पहिला विदेश दौरा अनपेक्षितपणेच घडला होता. पुन्हा असा योग येईल असे वाटले नव्हते. महिनाभर भेटलेल्या लोकांना तिथले अनुभव व पाहिलेल्या गोष्टींचे कथन करीत होतो. एका कनिष्ठ महाविद्यालयात नि एका माध्यमिक शाळेत ‘कॅनडातील सृष्टी सौंदर्य, स्वच्छता नि संस्कृती' या विषयावर व्याख्यानही झाले.

भुतकाळाच्या पडद्या आड विदेशातल्या साऱ्या स्मृती सोडून वर्तमानात वावरत होतो. नित्याच्या कामात रुळलो होतो. तोच एक दिवस संतोषीचा फोन आला. तसा तो रोजच सायंकाळी यायचा, खुशालीच्या गप्पा-गोष्टी व्हायच्या ... पण आजचं बोलणं विशेष होतं, मनाला सुखविणारं, अनोखा आनंद देणारं!

‘पप्पा, एक गुड न्युज आहे.' ती म्हणाली.

‘गुड न्युज'चा अर्थ सर्व सामान्य माणूस आज बरोबर ओळखतो. पण माझ्या लक्षात ही गोष्ट आली नाही. म्हणून मी-

‘काय बर?' असा कुतूहलानेच प्रश्न केला.

‘अहो पप्पाऽ! तुम्ही आजोबा होणार!'

तिच्या बोलण्यात कृतकृततेचा समाधानयुक्त आनंद होता. मलाही एक अव्यक्त आनंद झाला.

‘अभिनंदन! बाळा, आरोग्याची काळजी घे.' मी तिला सल्ला दिला नि स्वयंपाक घरात गुंतलेल्या सौभाग्यवतीना हाक मारून म्हणालो,

‘ऐकलत का! तुम्ही आता आजी होणार!'

तिने हातातले काम तसेच सोडले नि माझ्या हातातला मोबाईल जणू हिसकावूनच घेतला. कन्येच्या विवाहाला चार वर्षे झाली होती. तिला आजी होण्याची ओढ लागली होती. त्यामुळे ती त्यांना सारखी विचारायची" गुड न्युज कधी देणार?" म्हणून. तिच्या प्रश्नाचे उत्तर संतोषीने आज दिले होते. आपल्या कानानी ऐकण्याची तिला उत्कंठा लागली होती. यासाठी संतोषीला तिने पुन्हा प्रश्न केला,

'दिदी, काय म्हणाली, पुन्हा सांग ....'

'अग मम्मी, तू आता आजी होणार! फेब्रुवारीत कॅनडाला पुन्हा येण्याची तयारी कर!'

कॅनडाचा साडेतीन महिन्याचा प्रवास पूर्ण करून नुकताच कुठे भारतात परत आलो होतो, तोच पुढील सहा महिन्यात पुन्हा कॅनडाला परत जाण्याचा योग आला. या सहा महिन्यात एक गोष्ट घडली होती. जावईबापूना दुसऱ्या कंपनीत नोकरी मिळाल्याने उभय पती-पत्नी हॅलिफॅक्सहून व्हॅंकुव्हर शहरात रहावयास आले होते. हॅलिफॅक्स अटलांटिक महासागराच्या किनारपट्टीवर तर, व्हॅंकुव्हर पॅसिफिक महासगराच्या किनारपट्टीवर....युएसच्या सीमे लगत आहे. त्यामुळे या निमित्ताने कॅनडाचा वेगळा भाग पहावयास मिळणार होता. कॅनडा जगात विस्ताराने दुसऱ्या क्रमांकाचा देश! नैसर्गिक वैविध्यतेबरोबरच सांस्कृतिक वैविध्यतेने नटलेला! हॅलिफॅक्स व व्हॅंकुव्हरमधील प्रमाणवेळेत सुमारे तीन तासाचा फरक आहे. यावरून एकाच देशातील या दोन्ही शहरातील अंतर लक्षात येते.

आम्ही फेब्रुवारीच्या अखेरीस कॅनडाला जायला निघालो. यावेळी एअर इंडियाऐवजी लुफ्तानसा कंपनीच्या विमानाचे तिकीट बुक केले होते. सोबत सौभाग्यवतींबरोबरच जावईबापूंच्या मातोश्रीही होत्या. कॅनडाच्या पहिल्या दौऱ्यात विमान प्रवासाचा अनुभव घेतलाच होता. त्यामुळे विमान प्रवासाचे औत्सुक्य वजा भिती आता मनात नव्हती. मात्र या वेळेचा हवाईमार्ग वेगळ्या दिशेने होता. पहिला प्रवास व्हाया लंडन, तर दुसरा व्हाया फ्रॅंकफर्ट. त्यामुळे आनखी एका अंतरराष्ट्रीय विमानतळावरील दृश्य आम्हाला पहावयास मिळणार होते. मात्र यावेळी कन्या

किंवा जावई आमच्या सोबत नव्हते. पहिल्या प्रवासाच्या अनुभवातून आम्हालाच प्रवास पूर्ण करावयाचा होता. त्यामुळे नाही म्हटले तरी मनात कांहीशी धुगधूग होतीच. पहिल्याप्रमाणे यावेळीही फ्रॅंकफर्ट विमानतळावर कॅनडाचे विमान चुकले तर? एक अनामिक भिती मनात होतीच, परंतु तसे कांही घडले नाही. पुढील विमान पकडण्यासाठी फ्रॅंकफर्ट विमानतळावर चार तासाचा अवधी होता. लंडनप्रमाणेच फ्रॅंकफर्ट विमानतळही भव्य, तितकेच सुंदर नि स्वच्छ! एका टर्मिनलवरून दुसऱ्या टर्मिनलवर जाण्यास सुमारे अर्धा तास लागला. विमानतळावर संमिश्र संस्कृतीचे दर्शन घडत होते. त्यात गोऱ्या लोकांची संख्या अधिक. चीनी व भारतीय प्रवाशांची संख्याही निश्चितच नगन्य नव्हती. इंग्रजांचा रुबाब मात्र त्यांच्यात नव्हता. विमानतळावर एक-दोन भारतीय जोडपी आम्हाला भेटली. त्यांच्याशी बोलण्यात, विमानतळावरील रंगीबेरंगी दृश्य पहाण्यात वेळ निघून गेला.

मुंबई ते फ्रॅंकफर्ट आणि फ्रॅंकफर्ट ते व्हॅंकुव्हर असा हवाई प्रवास करून आम्ही दुपारीच पोहोचलो. यावेळेच्या प्रवासात विमान प्रवासाचे नाविन्य राहीले नव्हते. पूर्वानुभवाला नव्या अनुभवाची जोड देत सुमारे २२ तासाचा प्रवास पूर्ण केला होता. विमानतळावरील तपासाचे सर्व सोपस्कार पूर्ण झाल्यानंतर लगेज ताब्यात घेऊन आम्ही विमानतळावरून बाहेर आलो. जावईबापू विमानतळाबाहेर आमची प्रतीक्षा करीत होते. कारगाडीच्या डिक्कीत लगेज टाकले नि घरी जायला निघालो. सभोवतालचा डोळे दिपविणारा निसर्ग, डोकीवर टोपी परिधान करावी त्याप्रमाणे माथ्यावर बर्फाचे शुभ्र आछादन असलेले पलिकडचे डोंगर, रस्त्याच्या बाजुलाच दिसणारी नितळ पाण्याची भव्य सरोवरे, रस्त्याच्या दुतर्फा रंगीबेरंगी पाना-फुलानी बहरलेले वृक्ष, स्वच्छ नि सुंदर रस्ते, त्यावरून धावणाऱ्या कारगाड्यांच्या रांगा, भव्य, आकाशाला गवसणी घालणाऱ्या सुंदर इमारती... सारेच कसे डोळयांचे पारणे फेडणारे! प्रवासातला कंटाळा विसरून सारे कसे बेभान होऊन पहात होतो. तळमजल्यावर असलेल्या पार्किंगला येऊन कार थांबली नि आम्ही भानावर आलो. स्वप्नरंजनात रमलेल्या व्यक्तीला अचानक हाक मारावी नि त्याचा स्वप्नभंग व्हावा, तसेच कांहीसे झाले.

डिक्कीतून बॅगा घेतल्या नि कन्येच्या घरी जाऊ लागलो. नातीला पहाण्याची उत्सुकता होतीच. कित्तेक दिवसानंतर घरात नवी पाहूणी आली होती. वयाने साठी ओलांडली तरी नात्याने प्रथमच आजोबा झालो होतो. इवलासा तो जीव मोबाईलमधील व्हिडिओत पाहिल्यापासून तिला जवळ घेण्याची, गोंजारण्याची,तिचे कोडकौतुक करण्याची मनाला ओढ लागलीच होती. आम्ही घरात पाऊल टाकताच संतोषी तिला लाडीकपणे म्हणाली,

'परीचे आजी-आजोबा आऽले.... आजी-आजोबा आऽले!'

गरोदरपणाच्या काळात आपल्याकडे मुलगा कि मुलगी याची तपासणी करून घेण्यास कायद्याने बंदी आहे. परंतु कॅनडात नाही. तिथे जन्मापूर्वीच मुलगा कि मुलगी याची तपासणी करून डॉक्टर रिपोर्ट देतात नि बाळाच्या जन्मापूर्वीच त्याचे नाव डॉक्टरांकडे नोंद करता येते. माझ्या नातीचे 'स्पृहा' असे नाव नोंद केले होते. परंतु तिचे आई-बाबा तिला लाडाने 'परी' म्हणूनच बोलवित होते. पंधरा दिवसाचा इवलासा जीव तो, त्याला काय माहीत, आम्ही तिचे आजी-आजोबा म्हणून!

"आलोलोलोलोऽऽ, माझं बाळ ते! म्हणत मी तिला हळूवार उचलून घेतले,' लुकलुकत्या डोळ्यांनी ती पहात होती. मी गमतीने म्हणालो,

"भारतीय आजोबाची, विदेशी नात.'

आम्ही भारतीय असलो तरी माझी नात जन्माने कॅनेडियन झाली होती.

# १७. पर्यटकांच आकर्षण – कॅपिलानो ब्रीज



निसर्गाच्या विविध चमत्काराबरोबरच कॅनडातील मानव निर्मित कलाकौशल्ये पाहून आम्ही भाराऊन गेलो. विज्ञानाची कास धरत मानवाने केलेले अदभुत चमत्कार थक्क करून सोडणारेच होते. कॅपिलानो ब्रीज हे त्यापैकीच एक! कॅपिलानो ब्रीज पहायला जायचय म्हणून कन्येने सांगितलं, तेंव्हा त्याबद्दल विशेष वाटले नाही. भारतात नदीवरील अनेक लहान-मोठे पूल पाहिले आहेत, असाच एखादा पूल असेल अशीच आमची कल्पना! परंतु एखाद्या गोष्टीचा प्रत्यक्ष अनुभव घेतल्याशिवाय त्याच्याविषयी अनुमान काढणे म्हणजे निव्वळ मुर्खपणाच! कॅपिलानो ब्रीजच्या बाबतीत माझे नेमके असेच झाले.

कॅपिलानो ब्रीज म्हणजे मानवी कौशल्याचा अद्भुत चमत्कार असल्याची अनुभूती आम्ही त्याला प्रत्यक्ष पाहिल्यानंतर झाली. मती गुंग करणारीच ही स्थापत्य कला आहे. तिथले दृश्य पाहून निसर्गाच्या किमयेचे नि त्यात भर घातलेल्या कृत्रिम

कल्पकतेचे कौतुक वाटले. कॅपिलानो सस्पेंशन ब्रिज, ट्री टॉप्स अँडव्हेंचर आणि रोमांचक नवीन क्लिफ वॉक अशा तीन चित्तथरारक सौंदर्याने मन भारावून गेले. इतिहास, संस्कृती आणि निसर्ग अद्वितीय आणि थरारक पद्धतीने ईथे प्रस्तुत केला आहे.

गोकाकच्या घटप्रभा नदीवर बांधलेला ब्रिटिश कालीन झुलता पूल मी पाहिला होता. शालेय जीवनात त्याचे तितकेच नवलही वाटले होते. तसाच हा कांहीसा प्रकार. परंतु त्याचं वेगळेपण आणि वैशिष्ट्य तो प्रत्यक्ष पाहिल्याशिवाय लक्षात येत नाही.

ब्रिटिश कोलंबिया राज्यातील उत्तर व्हॅंकुव्हर जिल्ह्यात कॅपिलानो नदीवरील हा पूल जगातलं आनखी एक आश्चर्य मानायला कुणाची हरकत असण्याचं कारण नाही. अरुंद अशा या पूलावरून केवळ पदयात्रिनाच जाण्याची मुभा आहे. १४० मीटर (४६० फूट) लांब व नदीपासून ७० मीटर (२३० फूट)

उंचीवरील हा झुलता पूल पर्यटकांच आज आकर्षण बनला आहे. प्रतिवर्षी जगातील सुमारे आठ लाख पर्यटक या ठिकाणाला भेट देऊन एक वेगळा अनुभव पाठिशी घेऊन जातात.

*****

कॅपिलानो ब्रीजशेजारच्या पार्किंगवर आमची गाडी येऊन थांबली. शेजारीच असलेल्या कौंटरवरून तिकीटे घेतली नि रस्त्यापलिकडे असलेल्या कॅपिलानो नदीकडे आम्ही गेलो. पर्यटकांची लागलेली रांग पाहून कुतूहलात भर पडली. समोरच्या स्वागत कमानीने आमचे स्वागत केले, कमानीवरील सुंदर नक्षीकामातून कॅनडाच्या संस्कृतीचे दर्शन घडले नि मनही मोहीत झाले. कांहीसे पुढे गेलो नि तो अद्भूत चमत्कार दृष्टीस पडला. बाळाला झोक्यात घालून झुलवावे, त्या प्रमाणे हा झुलता झुला पर्यटकांना हिंदोळ्या घालीत होता, साऱ्यांना एक अनोखा आनंद देत होता. पूलाच्या झोक्याबरोबर कांहीजण लटपटत होते, तर कांही जण पूलावरील लोखंडी दोरखंडाचा आधार घेत पुढे-पुढे जात होते.

नदीच्या काठावरूनच ही गंमत पहाण्यापेक्षा प्रत्यक्ष अनुभव घेण्याची ओढ लागली. धडधडत्या छातीनेच आम्ही पूलावर पाऊल टाकले. लोकांच्या पावलांच्या हालचालीबरोबर पूल झुलू लागला. एक वेगळा अनुभव घेत पूलाच्या हिंदोळ्याबरोबर लटपटणारी पावले सावरीत आम्ही पुढे, पुढे जाऊ लागलो.

पूलाच्या मध्यभागी आलो नि सहज खाली नजर गेली, त्याबरोबर छातीत धस्सsss झालं. नदी तुडूंब भरलेली नव्हती; परंतु पात्रातील पाण्याच्या पातळीचा अंदाज येत नव्हता. पाणी संथ गतीने वाहत होते. दुतर्फा असलेल्या गर्द वृक्षांनी नदीची गहनता अधिक जाणवत होती. हिरव्यागार शेतातून सळसळत नागीन जावी, तशी वेडी-वाकडी वळणे घेत नदी वृक्षांच्या दाट गर्दीतून वाट काढीत पुढे, पुढे जात होती.

पूलाच्या दुतर्फा मजबूत जाळी असल्याने कोणी खाली पडण्याची शक्यता नाही. परंतु...

‘पूलच खाली कोसळला तर...?'

एक निरर्थक भिती मनात येऊन गेली. मजबूतीमुळेच कित्तेक वर्षापासून हा पूल पर्यटकांचे ओझे लिलया सहन करीत त्यांचे मनोरंजन करीत आहे, एक अनोखा आनंद देत आहे.

पूल पर्यटकांना झुलवत होता, सभोवारचा निसर्ग खिदळत होता. नजरेच्या टप्यापर्यंत सर्वत्र हिरवेगार, पर्नभारित उंच वृक्ष मन वेधून घेत होते! फडफडत मुक्तपणे संचार करणारे पक्षी, निर्भयपणे फिरणारी हरणाची पाडसं...सगळच कस नयनरम्य, मनाला खुलवणारं दृश्य! त्याची छायाचित्रे कॅमेऱ्यात टिपत, झुलत्या पूलावरून झुलत ४६० फूट लांबीचा पूलाचा टप्पा पार करून आम्ही नदीच्या दुसऱ्या काठावर येऊन पोहोचलो.

पुढे जे कांही पहायला नि अनुभवायला मिळालं ते त्याहून वेगळ, मन तृप्त करणारं होतं.

- ट्रीटॉपअ‍ॅडव्हेंचर



ट्री टॉप अडव्हेंचरचा एक वेगळा अविस्मरणीय अनुभव आम्हाला इथे घेता आला.

कॅपिलानो सस्पेन्शन ब्रीज पार्कमधील ट्रीटॉप अ‍ॅडव्हेंचर हा एक नवखा प्रकार पर्यटकांना आनोखा आनंद देऊन जातो. टोलेजंग इमारतीत जीना चढून जाण्याचा अनुभव नवीन नाही. पण इथे आम्ही चढणार होतो झाडावर.... एका झाडापासून दुसऱ्या झाडाला जोडलेल्या जीन्यावरून....उंच, उंच ... झाडाच्या शेंड्यापर्यंत ! एक आगळा आनंद देणारा अ‍ॅडव्हेंचरचा हा प्रकार!

पार्कमध्ये आकाशाला गवसणी घालणारे भव्य वृक्ष साऱ्यांचे लक्ष वेधून घेतात. डॉग्लास-फर जातीचे हे वृक्ष ३०० पेक्षाही अधिक वर्षे वयाचे असावेत असा अंदाज आहे. एका सरळ रेषेत उंच-उंच गेलेल्या या वृक्षांचा शेंडा जमिनीवरून नजरेस पडत नाही. मग या झाडांच्या शेंड्यापर्यंत चढून जाण्याची कल्पना हा एक कल्पना विलासच ठरावा.

परंतु इथे ही कल्पना वेगळया पध्दतीने साकार केलेली आहे. एका झाडा पासून दुसऱ्या झाडापर्यंत चढता पूल बांधून त्यावरून वरपर्यंत जाण्याचा हा प्रयोग

उत्तर अमेरिका खंडात एकमेव असावा. २००४ मध्ये तो निर्माण करण्यात आला. एका वृक्षापासून दुसऱ्या वृक्षापर्यंत उंच-उंच नेणाऱ्या झुलत्या पूलांची ही मालिकाच आहे. सात झुलते पूल जुन्या उंच वृक्षांना वैशिष्ट्यपूर्णरित्या जोडले आहेत. पर्यटकांना ११० फूट (३३.५ मीटर) उंचीपर्यंत या पूलावरून जाता येते. पूलाने जोडलेल्या वृक्षांभोवती प्लॅटफॉर्म तयार करण्यात आले आहेत. त्यावरून सभोतालच्या निसर्ग सौंदर्याचे निरिक्षण करता येते.

ट्रीटॉप ॲडव्हेंचर वॉक हा माझ्या जीवनातील एक अविस्मरणीय अनुभव होता. कॅपिलानो नदीवरील झुलता पूल पार करून आम्ही दुसऱ्या काठावर आलो. समोरच झाडाना जोडणाऱ्या पूलावरून गमती-जमती करीत, कॅमेऱ्यात निसर्गाची छायाचित्रे टिपीत जाणारे प्रवासी दिसले. त्या बरोबर हा आगळा अनुभव घेण्याची आम्हालाही उत्कंठा लागली. जोडपूलावरून एक वेगळा अनुभव घेत आम्ही जाऊ लागलो. पुढील वृक्षाच्या अधिक उंचीवर जाण्यासाठी पूलावरच बनविलेल्या पायऱ्यावरून वृक्षाभोवती बनविलेल्या निरिक्षण प्लॅटफॉर्मवर आम्ही जात होतो. एका ठिकाणी आम्ही ११० फूटउंचीपर्यंत जाऊन पोहोचलो. निरिक्षण प्लॅटफॉर्मवरून वर नजर टाकली, वृक्ष अजूनही बराच उंच होता. निसर्गाच्या किमयेला कृत्रिम कौशल्याची जोड मिळाल्याने त्याच्या सौंदर्यात अधिक भर पडली होती. सभोवार सहज नजर टाकली, निसर्गाने सर्वत्र सौंदर्याची लयलूट केली होती. वृक्ष पर्णभराने अलंकृत झाले होते, पानानी गजबजले होते. पानातून लपतछपत खाली येणारे सूर्यकिरण जमीनीवरील तलावातील जलतरंगाशी क्रीडा करीत होते. भर ऊन्हातही चांदण्यासारखी वाटणारी शीतलता मनाला उभारी देत होती. वृक्षांवर नानारंगांच्या पक्षांचा चिवचिवाट सुरू होता. त्यात पूलावरून ये-जा करणाऱ्या पर्यटकांचा गलबलाट मिसळला होता. माझ्यासारख्या अननुभवी व्यक्तीला एवढ्या उंचीपर्यंत थेट झाडावर चढणे अशक्य कोटीतली गोष्ट! कल्पकतेने तयार केलेल्या मानव निर्मित अनोख्या पूलामुळे झाडावर चढण्याचा आनंद तर लुटता आलाच; शिवाय निसर्गाची किमया वेगळ्या अंगाने निरखून पहाता आली. आता पुढचा प्रवास परतीचा होता.

पुढे ट्री बॉटम वॉकिंग सुरू झाले. एक आगळा नि अविस्मरणीय अनुभव पाठिशी घेऊन आम्ही परत नदीच्या काठावर आलो.

- क्लीफ वॉकिंग



नदीवरील झुलत्या पूलावरून आम्ही परत नदीच्या पहिल्या काठावर आलो. नदीचे पात्र एका खोल दरीसारखे आहे. नदीचा पहिला काठ उंच कड्यासारखा, अखंड खडकाचा बनला आहे. कड्यावरून चालत जाण्याचा रोमांचकारी अनुभव पर्यटकांना मिळवून देण्यासाठी क्लीफ वॉकिंगचा २०११ पासून एक नवीन प्रकार सुरू करण्यात आला आहे. कड्यावरून चालण्याची कल्पनाच अशक्य कोटीतील व स्वप्नवत वाटावी! पण ती इथे वेगळ्या पध्दतीने साकार करून पर्यटकांना एक नवा अनुभव मिळवून दिला आहे. नदीच्या पहिल्या काठावर उंचचउंच कडा, कड्याला लागूनच जाणारा झुलता पूल, पूलाच्याखाली, खोल दरीसारख्या पात्रातून वाहत जाणारी नदी... सगळच कस अशक्यप्राय वाटाव ! नदी काठावरील उंच ग्रानाईटच्या नैसर्गिक कड्याला जोडून गेलेला झुलता पूल

अभियांत्रिकी कलेचा एक आधुनिक नमुनाच आहे. क्लिफ वाकिंग पूलावरून आम्ही धडधडत्या छातीने चालत जाऊ लागलो. उजव्या बाजुला उंचचउंच कडा, पूलाखाली घोंघावत जाणारी नदी, त्यात झुलणारा पूल.... मनात धडकी भरली. एक आगळा-वेगळा अनुभव घेत, निसर्ग सौंदर्याचा आनंद लुटत आम्ही पुढे-पुढे जात होतो. एका जागी पूलाला जोडून नदीच्या मध्यापर्यंत गेलेला निरिक्षण पॉईंट होता. एका विशिष्ट प्रकारच्या काचेच्या पारदर्शक फरशीवरून आम्ही त्या पॉइंटवर गेलो. पारदर्शक काचेमुळे खालून पहाणाऱ्याला आम्ही हवेतूनच चालत असल्यासारखे वाटावे. मात्र त्यावरून 'ओझ्याने काच फुटलीच तर..... थेट नदीच्या प्रवाहात जाऊन पडायचे!'

मनाचा थरकाप झाला. अशाच प्रकारची काच टोरेंटो येथील सीएन टॉवरमध्ये आम्ही पाहिली होती. त्याच्यावर उड्या मारून तिच्या मजबूतीचा अनुभव घेतला होता. त्यामुळे भिती कांहीशी कमी झाली.

निरिक्षण पॉईंटवरून खाली नदीतील पाण्याकडे डोकाऊन पहिले. इथे नदीचे पात्र उथळ होते. त्यामुळे पाणी घोंघावत वेगाने खाली धाव घेत होते. समुद्रातील वादळाचा रुद्रावतार तिथे नव्हता; परंतु मानवी मनाला भेडसावणारी गती त्यात निश्चितच होती. नदीपलिकडचं दृश्य विलोभनीय होतं. हिरवेगार जुनाट वृक्ष एकमेकाशी स्पर्धा करीत आकाशाला गवसणी घालीत होते. मनातल्या संमिश्र भावनासह आम्ही पुढे जाऊ लागलो. ४८६ मीटर लांबीचा क्लिफ वॉकिंगचा टप्पा आम्ही पूर्ण केला. कड्याच्या माथ्यावर जाण्यासाठी बनविलेल्या पायऱ्यावरून वाटेतील गमती-जमती पहात आम्ही पहिल्या प्रवेशद्वारावर आलो. एव्हाना अचानक सुर्य ढगाआड लपला. पावसाला सुरवात झाली. लगबिगीने पार्किंगवर उभी असलेली कार गाठली नि पुढच्या प्रवासाला लागलो.

ट्री टॉप ॲडव्हेंचर आणि ल्किफ वॉकिंग या साऱ्याच गोष्टीनी मन प्रभावित झालं होतं. निसर्गाचा समतोल राखून वैज्ञानिक क्लृप्ती लढविलेली पाहून कौतुक वाटलं. त्यातून पर्यटकांच मनोरंजन करून कॅनडाने आपल्या कलाकौशल्याचं येथे

प्रदर्शन घडविलं आहे. उत्तर अमेरिका खंडातील अशा प्रकारचं हे पहिलंच पर्यटनस्थळ आहे. पार्कने मानाचा पर्यावरण पुरस्कारही प्राप्त केला आहे.

चित्रपट व दुरदर्शन वाहिन्यांचेही कॅपिलानो झुलता पूल, कॅपिलानो ब्रिज पार्क, क्लिफ वॉक ब्रीज आकर्षण बनले आहे. मॅकगिव्हर, स्लायडर्स, दी क्रो, स्टेअर वे टू हेवन, साईक या सारख्या गाजलेल्या दूरदर्शन वाहिन्यांचे चित्रिकरण इथेच झाले आहे.

व्हॅंकुव्हरच्या उत्तर किनारपट्टीवरील पहाडी प्रदेशातून कॅपिलानो नदी उत्तरेकडून दक्षिणेकडे वाहत जाते. व्हॅंकुव्हर प्रदेशातील नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याचे ही नदीच मुख्य स्त्रोत आहे. कॅपिलानो पानलोट क्षेत्रातून नदी वाहत जाते.१९५४ मध्ये नदीवर क्लिव्ह लॅंड धरण बांधण्यात आले आहे. उन्हाळयात बर्फ वितळून तर पावसाळयात पावसाच्या पाण्यामुळे नदीला बाराही महिने पाणी मिळते.

# १८. धास्तीतला प्रवास

....

चार वर्षात तीन वेळा कॅनडाला जाण्याचा योग आला. पहिल्या दोन प्रवासात अनेक गोष्टी पाहिल्या, जाणल्या नि समजूनही घेतल्या. तिसरा प्रवास योगायोगोनेच घडला, पण कायमचा स्मरणात राहीला. आलो दोन महिन्यासाठी, राहिलो म्हणण्यापेक्षा अडकलो पाच महिने! ना कुठे जाता आले, ना कांही पहाता आले. नजरकैद होते ना अगदी तसाच प्रकार! पण ही नजर कैद नव्हती... ती होती सावधगिरी... एका महामारीपासून बचाव करून घेण्याची!! तसे सरकारी फर्मानिच निघाले म्हणा ना... 'सावधान!' कोरोना येतोय… नाही आलाच! चीनमधून निघाला नि हा, हा म्हणता जगभर पसरला. मनुष्य जातीचा कर्दनकाळ! त्याने ज्याना पकडले ते बघता, बघता निघून गेले... कायमचे!! जे मागे राहीले ते जिवंतपणी मरण यातना सहन करीत... महामारीच्या धास्तीत !!

गाव-घर, देश सोडून साता समुद्रापलिकडे आम्ही आलो होतो, अनोळखी देश... अनोळखी माणसं ! कन्या, जावई वगळता कोणीच परिचयाचे नाही. त्यातच ही भयावह स्थिती... मनात धास्ती बाळगूनच काळ कंठत होतो. तसे आम्हीच नाही तर, सारे जग भयभीत झाले होते. असे कांही होईल, हे ध्यानी-मनीही नव्हते. आधी समजले असते तर, कदाचित या वेळी हा प्रवास घडलाही नसता.

हे ऐकून वाचकांना वाटेल, असा काय राक्षस मागे लागला? हो, राक्षसच म्हणा ना ! कोरोनारुपी महाभयंकर राक्षस! साऱ्या जगाला त्याने पछाडले, काम-धंदे सोडून लोक घरात बसले. त्याला रोखण्यासाठी साऱ्या जगानेच टाळेबंदी (लॉकडाऊन) पुकारली नि अंतरराष्ट्रीय वाहतूक व्यवस्थाच ठप्प झाली. आंतरराष्ट्रीय विमान सेवाही बेमुदत बंद पडली. एकिकडे महामारीची भिती नि दुसरीकडे मायदेशी परतण्याची ओढ ... पाच, पन्नास किलोमीटर अंतरावर राहिलो असतो तर, या वयातही धूम ठोकली असती... कारागृहातून फरार झालेल्या

कैद्यावाणी! परंतु आम्ही आलो होतो सातासमुद्रापलिकडे ... हजारो मैल दूर! हवाई मार्गाशिवाय दुसरा पर्यायच नव्हता.

ईकडे आड, तिकडे विहीर, अशीच गत. त्यामुळे प्रवासाच्या आनंदापेक्षा मनात धास्तीच अधीक! एक-एक दिवस मोजतच काढावे लागले.

यावेळी मन तसे कॅनडाला जाण्यास राजी नव्हते. सौभाग्यवतींचा तर विरोधच होता. 'आताच कुठे तिघेही (कन्या, जावई व छोटी नात) दोन महिने राहून गेलेत, मग इतकी घाई कशाला? जाता येईल वर्षभरानंतर, म्हणजे थोडे भेटल्यासारखेही होईल ....' असा तिचा विचार.

अर्थात तिचेही बरोबर होते. माझ्या मुलाच्या लग्नाच्या निमित्ताने दोन महिन्यापूर्वीच ते येऊन गेले होते. परंतु कन्येचा आम्हा उभयताना कॅनडाला येण्याचा आग्रह कायम होता. त्याचे असे झाले, कॅनडाचे अधिकृत नागरिकत्व मिळाल्याने त्यांनी तिथेच स्थाईक होण्याचा निर्णय घेतला. व्हँकुव्हर शेजारील डेल्टामध्ये त्यांनी घर खरेदी केले. घर नि त्यात नव्याने थाटलेला आपला संसार पहाण्यासाठी येण्याचा तिचा आग्रह होता. आम्ही ऐकत नसल्याचे पाहून तिने माझ्या छोट्या नातीला पुढे केले. तिचा सकाळ-संध्याकाळ आम्हाला व्हँकुव्हरला येण्याचा आग्रह कायम होता. आमच्याशी ती खोटा-खोटा रुसवाही धरू लागली. व्हिडिओ कॉलवर बोताना,

'तुम्ही येणाल नसाल तल मी बोलणालच नाय तुमच्याशी...'

म्हणत ती फूगून बसू लागली. तिच्या बालहट्टापुढे आम्हाला नाईलाजास्तव कॅनडाला येणे भाग पडले.

तिच्या जन्माच्या वेळी फेब्रुवारी २०१६ मध्ये आम्ही कॅनडाला गेलो होतो. तिला समजू लागल्यापासून प्रत्यक्ष अशी तिची गाठभेट झालीच नव्हती. व्हिडिओ कॉलवर तिला पहायचो, तिच्याशी गप्पागोष्टी करायचो एवढेच! आता आपल्या मामाच्या लग्नाच्यानिमित्ताने ती प्रथमच भारतात येऊन गेली होती. परंतु लग्नाच्या घाईत तिचे कोड-कौतुकही करता आले नाही. लग्नानंतर पंधरा दिवस सासरी पुण्याला नि सुटी संपताच कॅनडाला परत...! त्यामुळे आम्हालाही त्यांना भेटल्यासारखे वाटलेच नाही.

नातीचा जन्म तसा कॅनडाचा, सभोवतालचा परिसर ईंग्रजी ! त्यामुळे तिला मराठी कसे येते, आसाच सर्वांपुढे प्रश्न! परंतु वयाच्या चौथ्या वर्षी लुबड्या, बोबड्या पण अस्खलीत ईंग्रजीबरोबरच मराठीतही ती बोलायची.

त्याचे झाले असे.... वयाच्या एका वर्षानंतर तिला डे-केअरमध्ये ठेऊन कन्या नि जावईही आपल्या नोकरीवर जायचे. नोकरीवर जाणाऱ्या पालकांच्या सोईसाठी कॅनडात लहान मुलांसाठी डे-केअरची व्यवस्था आहे. अर्थात हा एक प्रीस्कूलचाच प्रकार! डे-केअरमध्ये मुलांची देखभाल चांगली केली जाते, बालपणापासूनच त्यांच्यावर चांगले संस्कार केले जातात. बाल्यावस्थेतच ती डे-केअरमध्ये वाढल्याने ईंग्रजी बोलू लागली. अर्थात तिचे आई-बाबाही ईंग्रजी माध्यमातून शिक्षण घेतलेले, परंतु आपल्या मातृभाषेचा तिला विसर पडू नये, म्हणून ते तिच्याशी मराठीतच बोलायचे. परिणामी ती मराठीही बोलण्यास शिकली. आमच्याशी व्हिडिओ कॉलवर ती मराठीतच संभाषण करते.

आम्ही २०२० च्या फेब्रुवारी २३ ला कॅनडातील डेॅल्टा (व्हॅंकूव्हर) ला येऊन दाखल झालो. कांही दिवस शेजारच्या अमेरिकेला जाऊन यायचे, असा यावेळी विचार होता. परंतु सारेच फसले. मनात असूनही घराबाहेरही पडता आले नाही. कोरोनारुपी महाराक्षस सर्वत्र दबा धरून बसलेला! कॅनडाला येताना ‘तो’ चीनच्या सीमेतच घुटमळत होता. तो जगभर पसरेल हे ध्यानी-मनीही नव्हते. आम्ही येऊन कुठे आठवडा झाला, तोच जगातील साऱ्याच देशात त्याचे संक्रमण वाढले. चीनप्रमाणेच ईटली, स्पेन, अमेरिका, ईंग्लंड, फ्रान्स, जर्मनी या प्रगत देशात त्याने थैमान घातले. मग अमेरिकेच्या शेजारी असलेला कॅनडा त्याला अपवाद कसा ठरणार! आम्ही रहात असलेले डेल्टा व व्हॅंकुव्हर शहर कॅनडातील ब्रीटिश कोलंबिया (बीसी) प्रांतात व अमेरिकेच्या सीमेवरच आहे. बीसीच्या कांही भागात कोरोनाने कांही लोकांचा बळीही घेतल्याचे वृत्त होते. अर्थात अमेरिकेच्या तुलनेत कॅनडातील त्याचा संहार तसा अगदीच नगन्य ! सुरवातीला भारतातही त्याचा तितकासा जोर नसल्याच्या बातम्या होत्या. परंतु मेच्या मध्यावर भारतातही भयावह परिस्थिती निर्माण झाली. त्यामुळे मन विचलित झाले.

दमट व थंड हवामानात या सांसर्गिक रोगाचा प्रसार अधिक होतो, अशी चर्चा होती. आम्ही आलो त्यावेळी कॅनडातील वातावरण कांहीसे असेच होते. पहिल्या पंधरवड्यात ढगाळ व दमट हवामान, अधून-मधून पावसाच्या सतत सरी पडायच्या. घराबाहेर थंडी चांगलीच झोंबत होती. त्यामुळे आत वार्मर, त्यावर आंगरखा व गरम जॅकेट घालूनच बाहेर पडावे लागे. त्यात कोरोनाव्हायरसची भिती. त्यामुळे मनाचा थरकाप व्हायचा. मनात नको ते विचार येऊन जायचे. परंतु आता ईलाज नव्हता. पुढे विदेशातील लोकांवर भारत सरकारने निर्बंध घातले. अतरराष्ट्रीय विमानसेवा साऱ्याच देशांनी बंद केली. विदेशातून येणाऱ्या प्रवाशांना १५ दिवसाचे क्वारंटाईन अनिवार्य करण्यात आले. त्यामुळे कन्या व जावई आम्हा उभयतांना परत भारतात सोडण्यास राजी नव्हते. तिथे वेगळे रहाण्यापेक्षा ईथेच रहा ना, असा त्यांचा आग्रह. त्यामुळे परिस्थिती निवळेपर्यंत रहाण्याचा निर्णय झाला.

कॅनडानेही देशांतर्गत विमान सेवा चालू ठेऊन अंतरराष्ट्रीय विमान सेवा बेमुदत बंद ठेवली. परिणामी आमचा परतीचा प्रवास बेमुदत लांबला. कोरोनाच्या भितीपोटी बाहेर फिरता येत नव्हते. लोकांनीही स्वयंघोषित बंद पाळला. रस्त्यावरून एखाद-दुसरी कार धावताना दिसे. कॅनडात लोक नियमांचे पक्के, त्यामुळे मोजक्याच ठिकाणी पोलिसांचा पहारा दिसायचा. पाय हालके करण्यासाठी घराशेजारी फिरतांनाही मनात धुगधूग असायचीच.

वाटेत कोणाशी हस्तांदोलन करू नका, कोणी भेटले तरी त्यांच्यापासून अंतर ठेऊनच चाला, कोणत्या गोष्टीला हात लावू नका, घरी आल्यावर गरम पाणी व साबणाने हातपाय स्वच्छ करा, अशा प्रसारमाध्यमातून सतत सूचना यायच्या. जावई व कन्याही याच सूचनांचे सतत स्मरण करून द्यायचे.

युरोप, अमेरिका खंडात कोरोनाचा प्रादुर्भाव अधिक वाढल्याने भारतातून मित्र व नातलगांचे सारखे फोन येत. सारे जण परिस्थितीची चौकशी करून जपून रहाण्याचा सल्ला देत. कोरोनाचे थैमान वाचून नि ऐकूण मनाचा थरकाप व्हायचा. सुखरूप, सुरक्षितपणे स्वदेशी जाऊन पोहोचेन का? याचीच मनात धास्ती असायची. परत जायचे मार्गच बंद झाले. कोरोनाच्या धास्तीने दिवस घरातच कुंठत काढावे

लागत. दूरदर्शनचे कार्यक्रम, बातम्या पहात, आधूनमधून वाचनात वेळ घालवयचा. त्यात घऱातली बोलकी बाहूली (माझी नात) आमचे मनोरंजन करायची. तिचे बोबडे बोल मनाला सुखावित, तिचे बालहट्ट पुरे करण्यासाठी लहानात लहान होऊन तिच्या सोबत खेळावे लागे. त्यामुळे मानावरील ताण कांहीसा हलका होई व दिवस निघून जाई.

पुढे कॅनडापेक्षाही भारतातील परिस्थिती गंभीर बनली. कोरोनारुपी भस्मासुराचा नाश करण्यासाठी जगातील तज्ञ डॉक्टर रात्रंदिवस प्रयत्न करू लागले. परंतु पहिले तीन महिने त्यावर उपाय सापडला नव्हता. त्यामुळे कोरोनाग्रस्तापासून अलिप्त राहून त्याचा प्रसार रोखणे हाच लोकांपुढे एकमेव उपाय! त्यामुळे जगातील साऱ्या देशांनी कांही पारंपरिक उपायांबरोबरच क्वारंटाईनचाच पर्याय निवडला.

आमच्या लहानपणी आजी जुन्या काळातील प्लेगच्या गोष्टी सांगायची. त्याची आता आठवण झाली. कोरोनाप्रमाणेच प्लेगच्या रोगावर त्याकाळात औषध नव्हते. एकदा जगभर अशीच प्लेगची साथ आली नि लोक किड्या-मुंग्यासारखे पटापट मरू लागले. त्यांचा अंत्यविधी करण्यासही कोणी नव्हते. अनेक कुटूंबे गाव-घर सोडून बाहेर जाऊन राहीली. सारी गावे ओस पडली, आजी या गोष्टी एखाद्या कसदार कथाकाराप्रमाणे रंगवून सांगायची. कोरोनामुळे आज तशीच परिस्थिती निर्माण झाली होती.

इटलीमध्ये एकाच दिवसात आठशे जणांचा कोरोनाने संहार केल्याचे दूरदर्शनवर दृश्य पाहून मनाचा थरकाप झाला. पुढे स्पेन, जर्मनी, अमेरिका, इंग्लड देशातही लोक हजारोच्या संख्येने मरू लागले. जगात सर्वाधिक प्रगत अमेरिकेत तर परिस्थिती हाताबाहेर गेली. प्रगत देशांची स्थिती अशी तर लोकसंख्येने गजबजेल्या आपल्या देशाची गत काय होईल, अशी मनात भिती वाटायची. देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईतल्या बातम्या दूरदर्शनवर पाहून मनाचा थरकाप उडायचा. मन विचलीत व्हायचे. निसर्गावर मात करणारा मानव अनेक महिने या भस्मासुरावर उपाय शोधू शकला नव्हता. शेवटी 'पराधीन आहे जगती पुत्र मानवाचा' याची पुन्हा एकदा प्रचिती आली.

जग तांत्रिकदृष्ट्या आज लहान बनले आहे. माणूस कांही तासात जगाच्या कानाकोपऱ्यात जाऊन पोहोचतो. लाखो मैलावर असलेल्या व्यक्तिशी शेजारी बसून गप्पागोष्टी कराव्यात, त्याप्रमाणे तो बोलतो. कांही अंतरावर झालेल्या कौरव-पांडवांच्या महायुध्दाचे वर्णन संजयने आंधळया धृतराष्ट्राला केल्याचा महाभारतात उल्लेख आहे. या काल्पनिक कथा विज्ञानाने आज प्रत्यक्षात साकार केल्या आहेत. अशी आचंबित करणारी प्रगती विज्ञानाने साधली असली, तरी कोरोनापुढे माणूस हतबल झाल्याचे चित्र होते. निसर्गावर कितीही मात करण्याचा प्रयत्न केला तरी माणूस त्याच्यापुढे हतबल आहे, हेच पुन्हा एकदा स्पष्ट झाले.

डेल्टा परिसरात भारतीय लोकांची वस्ती अधिक असल्याने येथे हिंदू देव-देवतांची मंदिरे आहेत. आम्ही रहात असलेल्या ठिकाणाजवळच विष्णू व साई मंदिर होते. पहिले कांही दिवस या मंदिरात जाऊन वेळ घालविला. तेथील भजनात तल्लीन झालो. भारतीय लोकांनी विदेशातही आपल्या धार्मिक व अध्यात्मिक भावना, परंपरा कायम जपल्याचे पाहून त्यांचे कौतुक वाटले. परंतु कोरोनारुपी राक्षस मागे लागल्याने सारेच बिघडले. मंदिरात जाण्यातही धोका निर्माण झाला. देवांपेक्षा दानवच अधिक शिरजोर झाला. कोरोनारुपी राक्षसाचा पराभव करण्यात देवही हतबल झाले. त्यामुळे भक्तांनी मंदिरांचे दरवाजे बंद करून देवानाही कोंडून ठेवले. संकटकाळात देवाला पाण्यात ठेवल्याचे मी पाहिले, ऐकले होते. येथे देवांना मंदिरात कोंडल्याचा प्रकार जगभर घडत होता. मंदिरे, चर्च, मशीदी बंद झाल्या. धर्मभेद बाजूला सारून सारेच एक झाले. कोरोनाची साखळी तोडण्यासाठी लोकांनीही स्वत:ला घरात कोंडून घेतले. मग आम्ही तरी त्याला अपवाद कसे असणार! फिरण्यामागचा धोका ओळखून आम्ही घर सोडलेच नाही.

कॅनडापेक्षाही शेजारच्या अमेरिका (युएस), चीन, ईटली, स्पेन, फ्रान्स देशात कोरोनाने लाखो लोकांचा संहार केला, मग लोकसंख्येने गजबजलेला आमचा देश याचा मुकाबला कसा करणार? असा मनात विचार यायचा. वैद्यकीय सुविधांची उणीव, लोकांचे दारिद्र्य, त्यात लोकांत साक्षरतेचा अभाव! तरीही प्रगत देशांपेक्षा कोरोनाचा संहार रोखण्यात भारताने मिळविलेले यश दिलासादायक होते. भारत

सरकारने कोरोनाचा फैलाव रोखण्यासाठी टाळेबंदी बरोबरच इतर कांही उपाययोजना हाती घेतल्या होत्या. सरकारच्या या प्रयत्नाना सहकार्य म्हणून आनखी कांही दिवस दूर रहाण्यास काय हरकत आहे, असा एकवेळ मनात विचार येऊन गेला.

कॅनडा सरकारचेही कोरोनाला रोखण्यासाठी प्रयत्न सुरू होते. शेजारच्या अमेरिकेपेक्षा कॅनडातील त्याची दहशत कमी होती. एका कार्यक्रमाच्या निमित्ताने युकेला गेलेल्या कॅनडाच्या पंतप्रधानांच्या पत्नीलाही या काळाने गाठले. वृध्दाश्रमात रहाणारे कांही जेष्ठ नागरिक युरोप प्रवासावर गेले असता त्यांनाही कोरोनांची लागण झाली. त्यात नऊ जणांचा बळी गेला. त्यामुळे कॅनडातील लोक धास्तावले. कॅनडा सरकारने लागलीच उपाययोजना हाती घेतल्या. लोकांच्या सुरक्षेसाठी संचारबंदीचे आवाहन केले. सर्व आयटी कंपन्याच्या कर्मचाऱ्यांना घरातूनच काम देण्याचे फर्मान निघाले. सॉफ्टवेअरमध्ये काम करणारे जावई व कन्याही आता घरातून काम करू लागले.

अर्थात कोरोनाने लोकांना एक चांगला धडा दिला होता. लॉकडाऊनमुळे गाड्या थांबल्या, कारखान्यांची खडखड बंद झाली. वीजेची मागणी घटली. इंधनाची बचत झाली. परिणामी अपघाततही कमालीची घट झाली. पर्यावरणातील प्रदुषणाची पातळी घटली. रात्रं-दिवस कामात गुंतलेले लोक आपल्या लोकांसमवेत कांही दिवस घरात घालवू लागले. त्यातून सहकाराची भावना वाढीस लागली. लोकांना स्वच्छतेचे महत्त्व समजले.

परंतु लॉकडाऊनमुळे लोकांच्या नि सरकारच्याही उत्पन्नात घट झाली. असेच सुरू राहिले तर खायचे काय, असा प्रश्न लोकांपुढे निर्माण झाला. त्यातून कांही दानशूर उद्योगपती सरकारच्या व लोकांच्या मदतीला धावले. केंद्र सरकारने आपला राखीव निधी बाहेर काढला. लोकांच्या मदतीसाठी विविध योजनांची घोषणा केली. लहान व मध्यम उद्योग-धंद्यांना ऊर्जा देण्यासाठी आर्थिक मदतीची घोषणा केली. परंतु या गोष्टी किती दिवस चालणार. लोकांचे दैनंदिन व्यवहार सुरू करणे क्रमप्राप्त होते. कोरोनाच्या संवेदनशील भागात लॉकडाऊन चालू ठेऊन व्यवहार, वाहतूक पूर्ववत चालू ठेवण्याचा निर्णय केंद्र आणि राज्य सरकारनीही

घेतला. दहशतीतच नियमाचे पालन करीत व खबरदारीच्या उपाययोजनासह भारताचाच नाही तर संपूर्ण जगाचा व्यवहार हळूहळू सुरू झाला.

परंतु अंतरराष्ट्रीय विमान सेवेला अजूनही ग्रीन सिग्नल मिळाला नव्हता. दरम्यान, विदेशात अडकलेल्या भारतीयाना परत आनण्यासाठी भारत सरकारने 'वंदे भारत मिशन' योजनेंतर्गत कॅनडात टप्याटप्याने विमाने सोडली. पहिल्या दोन टप्यात आम्हाला तिकीट मिळू शकले नाही. सुदैवाने तिसऱ्या टप्यात तिकीट बुक झाले नि आम्ही भीतभीतच मायदेशी परतलो. विमानातील व विमानतळावरील मार्गसूचीचे पालन हे एक स्वतंत्र प्रकरणच होईल. बंगळूरच्या विमानतळावर कोरोना चाचणीसाठी आमचे नमुने घेण्यात आले. वयाच्या मुद्यावर १४ दिवस होम क्वारंटाईनची सूचना देऊन घरी जाण्याची परवानगी मिळाली. त्याबरोबर आम्ही सुटकेचा निश्वास सोडला. आम्हाला बेळगावला घेऊन जाण्यासाठी मुलगा संतोष कारगाडीसह आधीच विमानतळावर येऊन दाखल झाला होता. त्याच्या कारमधून घर गाठले.

स्वदेशात अजूनही कोरोना भस्मासूराचे थैमान सुरूच होते. त्यात आमचे १४ दिवसाचे घरातच विलगिकरण! सहा महिन्यानंतर स्वगृही आलो तरी, कोणी भेटावयास आले नाही, आम्हीही क्वारंटाईनचा काळ संपेपर्यंत कोणाला भेटू शकत नव्हतो. याच दरम्यान, शेजारीच कोरोनाच्या मृत्यूची एक-दोन प्रकरणे घडली. हे पाहून मनाचा थरकाप उडाला. दरम्यान, दहा-बारा दिवसात कोरोना चाचणीचा मोबाईलवर अहवाल आला. आम्हा उभय पती-पत्नींचा अहवाल निगेटिव्ह होता. मनातील भीती पार निघून गेली. कोरोना नियमांचे पालन करीत घरातच सांभाळून राहू लागलो. या कोरोनामुळे आमचीच नाही तर संपूर्ण मानव जातीचीच जीवनशैली पार बदलून गेली.

## ई साहित्य प्रतिष्ठानचे हे सोळावे वर्ष

## बी.बी देसाई ऊर्फ़ मनोहर यांचे हे दुसरे पुस्तक.

बी.बी देसाई ऊर्फ़ मनोहर हे बेळगाव येथील साहित्य व सांस्कृतिक वर्तुळातील एक सुपरिचित नाव. त्यांचे विविध प्रकारचे लेखन नियमित रित्या प्रकाशित होत असते. बेळगाव तसेच महाराष्ट्रातील अनेक साहित्य संस्थांतून त्यांचा सत्कार व पुरस्करण झाले आहे व होत असते. त्यांना आपली पुस्तके जास्तीत जास्त लोकांपर्यंत नेणारे आणि प्रकाशनप्रक्रिया सुलभ असणारे प्रकाशन हवे होते. त्यांनी ई साहित्यची निवड केली.

बी.बी देसाई ऊर्फ़ मनोहर यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्य-च्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले(९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(१५), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(९), डॉ. नितीन मोरे **(५०)**, अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(१२), अनंत पावसकर(४), मधू शिरगांवकर (८), अशोक कोठारे (दहा हजार पानांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (१०), डॉ. वृषाली जोशी(**५०**), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे(३३), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(६) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट(२), अरुण

कुळकर्णी(१२), जगदिश खांदेवाले(६) पंकज कोटलवार(६) डॉ. सुरुची नाईक(३) डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे(१३), श्याम कुलकर्णी(१८), किशोर कुलकर्णी, रामदास खरे(४), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक(४), मंगेश चौधरी, प्र. सु. हिरुरकर(३), बंकटलाल जाजू (३), प्रवीण दवणे, आर्या जोशी, डॉ. सरोज सहस्त्रबुद्धे (७), अरविंद बुधकर (४), जयश्री पटवर्धन(४) श्रीरंग कौलगी, यशवंत कदम(६), पांडुरंग सूर्यवंशी(३) सुधीर कारखा्नीस, मिलिंद कपाळे, मुकुंद कर्णिक (३). श्रीराम काळे (२) शैलेश पुरोहित(४) बी बी देसाई(२) असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये। विशेषीं लोकीं "ई"यें।

दृष्टादृष्ट विजयें। होआवे जी।

esahity@gmail.com

www.esahity.com

**9869674820** (for free books on whatsapp)